म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र. 203




REFBK-0008821

मुख्य विक्रेते : दादर बुकडेपो, रानडे रोड, दादर.

# कुलाबा वर्णन

लेखक :

प्रिं. वि. कृ. जोशी

एम्. ए., एस्. टी. सी.

दा. क्र. ८८०९

प्रकाशक :

नारायणराव कुळकर्णी मेमोरियल वेलफेअर सोसायटी,

२० हमाम स्ट्रीट, फोर्ट, मुंबई १.

REFBK 0008821

REFBK-0008821

किं. १ रु.

विजया दशमी

१९५४

मुद्रक :—
एम्. एन्. कुळकर्णी
नारायणराव कुळकर्णी मेमोरियल
वेलफेअर सोसायटी,
२० इमाम स्ट्रीट, फोर्ट मुंबई १.

अखिल कुलाबेकर जनतेस
सादर समर्पण

वि. कृ. जोशी
लेखक

मुद्रणस्थळ :
मुरली प्रिंटिंग प्रेस,
रानडे रोड, दादर, मुंबई २८

# दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.

मुख्य कचेरी :— थोरले बाजीराव रस्ता, पुणें २

## भां ड व ल

| | | |
|---|---|---|
| अधिकृत ... | ... | रु. ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | | रु. ३२,००,००० |
| वसूल झालेलें ... | ... | रु. १६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | रु. ७,००,००० |
| एकूण खेळतें ... | ... | रु. ४,२५,००,००० चे वर |

★ बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

★ बँकेच्या सर्व शाखांवर व कलकत्ता, मद्रास वगैरे शहरांवर सवलतीच्या दरानें ड्राफ्टस् दिले जातात.


## शा खा :

मुंबई ( फोर्ट, गिरगांव, दादर ) कल्याण, पुणें ( डेक्कन जिमखाना व खडकी) नाशिक, चाळिसगांव, धुळें, जळगांव, नागपूर, रत्नागिरी. कोपरगांव, हुबळी, सोलापूर, कोल्हापूर, द. हैदराबाद, सांगली, अमरावती, ठाणें व हरिहर [ म्हैसूर सं. ]

दसऱ्याच्या मुहूर्तावर कुलाबा जिल्ह्यांतील पहिलीच शाखा **पनवेल** येथें सुरू होत आहे.

चिं. वि. जोग
मॅनेजर

संथ प्रवाही




# कॅमल इंक

★ कॅम्लीसॉल युक्त ★

सहा आकर्षक रंगांत मिळते

● कॅम्लीन लिमिटड, मुंबई १६ ●



# डोंगरे बालामृत

*अशक्त मुलांना शक्तिवर्धक औषध*

के. टी. डोंगरे आणि कं. लि. मुंबई ४.


शाखाः— कानपूर, बंगलोर.

प्लेटो ८८

व्हॅक्युमॅटिक पेन

एक नावाजलेलें

प्लेटो




PLATO
REGD

प्लेटो '६६'
रेग्युलर सेल्फ
ॲरोमॅटिक रु. ४ प्रत्येकी

प्लेटो '८८'
व्हॅक्युमॅटिक
रु. ४-१२-० प्रत्येकीं

प्लेटो '५५'
गोल्ड प्लेटेड व गोल्ड निब
सहित प्रत्येकीं रु. १५

# म्हात्रे पेनची निर्मिती.

इतर प्रकारच्या पेनांसाठीं लिहा: एकमेव विक्रेते

## धी बेस्ट फाऊन्टन पेन डेपो

आनंद भुवन, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई २.

# HOMOEOPATHY

The leading house in Western India for genuine and reliable Homoeopathic and Biochemic medicines, globules, bottles, corks and other physicians' requisites.

*Books:—*

American, English, and Indian publications.

*Price list free on application*

ROY & COMPANY,

**Princess Street, Bombay 2,**

**It will pay you to**

***INSURE WITH***

# HINDUSTAN CO-OPERATIVE INSURANCE SOCIETY LTD.

( *Head Office:-* CALCUTTA )

**TOTAL ASSETS EXCEED Rs. 25 Crores.**

**ASSURANCE IN FORCE Rs. 93½ Crores**

*For particulars please apply to:*

BOMBAY BRANCH,

DADABHOY NAVROJI ROAD, FORT,

**INDIA'S LEADING LIFE OFFICE**

# GERMAN SPECIFICS

*Available Again after 12 years*

**"DIABETONIT"**

*The Effective Anti-Diabetic*

*Administered orally
*Minimizes sugar both in the urine and in the blood.

**"STEINONIT"**

*An Effective Remedy for* Gall-Stones.

*Obviates the necessity of an operation.
*Full course taken within a day

---

"Two Steeple" Brand German Record Syringes fitted with Jena Glasses.

---

**Specify for your Home**


* "**Mermaid**" and "**Chakra**" White Zinc Paints
* "**Chakra**" Architectural Finishes
* "**Muromatte**" Oil bound Distempers.
* "**Sunfast**" and "**Holmco**" Dry Distempers.

**For Industries**


* Red Lead, Red Oxide and Zinc Chrome Primers
* "Chakra" and "Mermaid" Industrial Finishes
* "Wrinkletone" and "Hammertone" Finishes.

## HARDCASTLE WAUD & Co., Ltd.


Alice Buildings,
Dr. Dadabhoy Nowroji Road,
BOMBAY 1.




HAND CART




FACTORY TRUCK



HAND TRUCK



SACK TRUCK



WATER TROLLEY

**राष्ट्रीय उद्योगधंद्यांना उत्तेजन द्या,**
**छोट्या धंद्यातील कामकरी वर्गास**
**मदत करा.**

# के. आय. एस.

# इंडस्ट्रिअल सर्व्हिस.

के. आय. एस. ट्रकस् व ट्रॉलीज धरायला नाजुक रस्त्यावरून धावायला सुगम, रबर टायरच्या चाकामुळें रस्त्यांची मोडतोड कमी, सुटसुटीत चालणे व विशेष म्हणजे ह्या ट्रकस् हाती धरायला नाजुक आमची कंपनी हातगाड्या व ट्रकस् बॉक्स गिऱ्हाईकांच्या गरजेनुसार तयार करून देते.

## रबर टायर्सच्या हातगाड्या पासून फायदे.

१ गाडी ओढतांना कमी शक्ती खर्च करावी लागते.

२ रबरटायरच्या उपयोगामुळें हातगाडीचा एकूण तयार करण्याचा तोडमोडीचा सर्वच खर्च कमी येतो. व कमीत कमी माणसे जास्तीत जास्त काम रबरटायरच्या हात गाडी पासून घेऊं शकतात.

३ माणसाला गाडी ओढण्याचा विशेष त्रास न होता त्याला जास्तीत जास्त भाड्याने वजनदार सामान ओढून कमी श्रमांत जास्त पैसे मिळविता येतात.

४ ह्या गाडीमुळें सडकेवर हादरे बसणें थांबते. ह्यामुळें गाडीची मोडतोड होण्याची शक्यता कमी असते त्यामुळें एकूण खर्चातच बचत होते.

५ हातगाडी वाहणाऱ्यास कमी श्रम पडतात

**" इंडस्ट्रियल सर्व्हिस "**

२० हमाम स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.
[ कुळकर्णी टेलिफोन : 38445]

# भारतांतील ग्रामीण जनतेत उमंग आणि उत्साह निर्माण करण्याचा एकमेव मार्ग

भारतांतील ग्रामीण जनतेला अधिक चांगल्या वातावरणांत राहण्यास मिळणें अत्यावश्यक आहे. आणि म्हणूनच आपल्या देशांतील खेड्यांची पुनर्रचना करून तीं ग्रामीण जनतेला राहाण्यास योग्य बनविणें जरूर आहे. कॉंक्रीटच्या साहाय्यानें ही गोष्ट कशी साध्य करून घेतां येते तें 'अवर व्हिलेजिस ऑफ टुमारो' या सचित्र पुस्तकांत अगदीं सविस्तर विशद केलें आहे. घरांचे प्लॅन तयार करणारे, समाज कार्यकर्ते, समाज विकास योजनांचे संघटक, ग्रामपंचायती, जिल्हा लोकलबोर्डें व म्यु. बरो या सर्वांना सारखेच उपयुक्त असें हे पुस्तक आहे. त्याच्या इंग्रजी प्रतीची किंमत रु. १/ आहे. भारतीय भाषांतील पुस्तकाची किंमत ८ आणे आहे. प्रत्येक पुस्तकास टपाल हंशील १० आणे जादा पडतें. पुढील कुपन भरून तुमची प्रत त्वरित मागवा.




एसीसी

दि सिमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया लि.

दी कॉंक्रीट असोसिएशन ऑफ इंडिया
१, क्वीन्स रोड, मुंबई १.


'अवर व्हिलेजिस ऑफ टुमॉरो' या पुस्तकाची/मराठी भाषेतील प्रत/प्रती मला पाठविण्याची कृपा करावी पुस्तकाची किंमत व टपालहंशील साठीं रु.... - मनिऑर्डरने/पोस्टल ऑर्डरनें पाठविले आहेत.

नांव ...

पत्ता ...

SISTA'S C.il 127 Marathi.

# PLEASE REMEMBER US ON A GOOD OCCASION




We will render the eating services to keep your guests happy and gay!

'GREEN & GOLD' ICE-CREAM

Varieties of SWEET DRINKS

We shall also undertake to serve all sorts of preparations on your order. Our men in uniforms will add grandeur to the occasion and render the service.


CATERING CONTRACTORS ON ALL AUSPICIOUS OCCASIONS.

(*We undertake Harbour Trips & Catering arrangements*)

## B. L. Simalgaonkar


(Estd. 1928)

41, Jijibhoy Dadabhoy Lane, Fort, BOMBAY 1.


LIPTONS
WHITE LABEL
TEA
कडक
आणि
स्वादिष्ट
रुचीकरितां
व्हाईट लेबल चहा
LWLX 36 MAR

# "जहाज" छाप मिश्रखतें व सुपरफॉस्फेट

D M C



यशस्वी बोधचिन्ह

आपलें उत्पादन हमखास वाढविण्याची इर्षा असणाऱ्या दर एक शेतकऱ्यांनीं फक्त **अंबरनाथच्या** नामवंत कारखान्यानीं **"जहाज" छाप मिश्रखतें** वापरावींत.

## अंबरनाथचा कारखाना आघाडीवर

कर्नाटकपासून तो थेंट गुजराथपर्यंत असंख्य शेतकऱ्यांनीं या कारखान्याचीं हजारों टन **मिश्रखतें** व **सुपरफॉस्फेट** वापरून आपलें उत्पादन वाढविलें आहे.

## 'जहाज' छाप मिश्रखतांचे विशेष

- **किंमतींत माफक**
- **पीकवार मिश्रखत**
- **प्रत्येक मिश्रखतांत नायट्रोजन फॉस्फरस व पोटॅश**

## शेतीच्या यशाची गुरुकिल्ली सुपरफॉस्फेट

पाण्यांत विरघळून पिकांस त्वरित लागू पडणारें खात्रीचें
सुपरफॉस्फेट फक्त अंबरनाथला तयार होतें

---

**दि धरमसी मोरारजी केमिकल कं. लि.**

**प्रॉस्पेक्ट चेंबर्स, दादाभाई नौरोजी रोड, मुंबई १.**

मुंबईत मध्यवस्तींत, मध्यमवर्गीयांची

राहाण्या–भोजनाची सोय


# श्रीकृष्ण बोर्डिंग हाऊस

[ लॉजिंग व बोर्डिंग ]

| | |
|---|---|
| शाखा नं. २<br>१ ली गल्ली हिंदुकॉलनी,<br>दादर. टे. नं. ६०२७८ | ट्रॅम नाका, गिरगांव,<br>मुंबई ४.<br>टे. नं. २७४१८ |

---

## अरुण सोइंग मशिन




अरुण सोइंग मशिन मॉडेल TA-1 [रोटरी हूक] ही मशिन अतिशय जलद चालीची, बिलकूल आवाज न करणारी व चालण्यास कमालीची हलकी असल्यामुळें शिंपी लोकांना फार आवडते. पुष्कळ ठिकाणी ह्या मशिनला अंब्रेला मशिन म्हणून ओळखतात. ही मशिन जपान या देशांत तयार झालेली असून शिवणकामाच्या धंद्याला अतिशय उपयुक्त आहे.

**पेडणेकर आणि कंपनी, लि.**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी

१७२ गिरगांव रोड, मुंबई नं. ४

तारेचा पत्ता: PEDNECO, Bombay.

फोन नं. २२७३८

# सर्व प्रकारची पुस्तकें

इंग्रजी, मराठी, गुजराती अगर हिंदी

शाळा व कॉलेज यांना लागणारी

त सें च

सर्व तऱ्हेची स्टेशनरी

गरीब व श्रीमंत यांना खरेदी करण्यास सुखकर

या करितां भेट द्या,

लिहा अगर फोन करा

( फोन ६१०११ )

# दादर बुक डेपो

रानडे रोड, दादर, मुंबई २८ ( प. रेल्वे )

' कुलाबा वर्णन या प्रकाशनाचे अधिकृत विक्रेते '

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे स्थळप्रत
अनुक्रम १०३७५ दि:
क्रमांक २०३ नों: दि:

# प्रस्तावना

आमच्या कुलाबा जिल्ह्यांतील रहिवासी श्री. वि. कृ. जोशी यांनी जन्मभर केलेलें शिक्षणकार्य, प्रत्यक्ष त्यांतून निवृत्त झाल्यावरहि चालविलें आहे. ' कुलाबा वर्णन ' हा छोटेखानी ग्रंथ याचीच साक्ष देत आहे.

अशा पुस्तकांचा उपयोग प्रत्यक्ष शाळांतील विद्यार्थ्यांनाच होतो असें नाही. तर ज्यांना समाजाची प्रगति घडून यावी म्हणून थोडी तरी आस्था आहे त्यांनाहि हें पुस्तक उपयोगी पडल्याशिवाय राहणार नाही.

येथें आपण राहतों तेथील खडान् खडा माहिती आपणांला असली पाहिजे. इंग्रेजादि युरोपीय लोक या प्रकरणीं अतिशय दक्ष असतात. त्यामुळें हिंदुस्तानाविषयीं माहिती अशा मंडळींनी लिहून ठेविलेली आपणांस इतकी विपुल आढळते कीं आज आपल्याला या प्रकरणीं जें ज्ञान आहे तें एरवीं कधींच मिळालें नसतें. युरोपियन प्रवासी, व्यापारी, शिपाई, मुत्सद्दी, पाद्री सर्वांनी अशी माहिती जमवून प्रसिद्ध केलेली आहे. पुढें इंग्रजांचा प्रत्यक्ष अंमलच जेव्हां या देशावर बसला तेव्हां तर त्यांनी जिल्हावार माहितीकोश –ग्याझिटीअर्स–प्रसिद्ध केले. हे कोश नसते तर आपली फार केविलवाणी स्थिति झाली असती.

म्हणून श्री. वि. कृ. जोशी यांनी प्रसिद्ध केलेल्या कुलाबावर्णनाचें मी स्वागत करतों आणि इतरांनीं तसें करावें असें सुचवितों. पुस्तक लहानसरच आहे. त्यांत जिल्ह्याविषयीं विविध प्रकारची माहिती थोडक्यांत दिली आहे. गांवोगांवच्या साक्षेपी मंडळींना माझी विनंति आहे त्यांनी प्रत्येक गांवाचें असें वर्णनपुस्तक तयार करावें. प्राथमिक शाळेंतील चौथ्या ईयत्तेपर्यंत पोंच-लेल्या विद्यार्थ्यास आपल्या गांवाची सविस्तर आणि जिल्ह्याची ठोकळ माहिती एवढें तरी ज्ञान असावयास पाहिजे. हा प्रयत्न व्हावा म्हणजे 'गांव करील तें राव करणार नाही' ही म्हण सार्थकीं लागेल.

असे ग्रंथ जितक्या आकर्षक पद्धतीनें लिहिले आणि सजविले जातील तितका त्यांचा उठाव अधिक होतो. चित्रें, नकाशे भरपूर द्यावेत. पण त्याला प्रथम खर्च पुष्कळ करावा लागतो.

तसेंच माहितीची विभागणी आणि मांडणी जर कुशलतेनें केली तर सहजच मन रमून जातें आणि पाहिजे तें चटकन सांपडते. त्याचप्रमाणें अशा पुस्तकांतली माहिती **बिनचूक** असावी लागते. तींत प्रमाणबद्धता हि पाहिजे.

या पुस्तकांत प्रसंगानें जी माहिती दिली आहे तिच्याशी जेथें आमच्या माहितीची तफावत पडते त्यांतील कांही स्थळें येणें प्रमाणें:—

पृ. १० — राजमाचीला 'कोंकण दरवाजा' हें वर्णन शोभतें. तें 'नांव,' नव्हे.

,, ,, शिवाजी उत्सव प्रारंभ १५९६-१५९३ नव्हे.

पृ. १२ — 'पन्हाळा' महाराष्ट्राची राजधानी होती असें म्हणतां येणार नाही.

' अपरांत हेंच आपलें राज्यक्षेत्र ' असें शिवाजी जाणत नव्हता व म्हणत हि नव्हता.

पृ. १२ — सिंहगड शके १५६९ त बापूजी देशपांडे नव्हेकर याचे मार्फतीनें शिवाजीनें मिळविला असें वास्तविक आहे.

पृ. १२ — ' मुरुंबदेवाचा डोंगर ' याचा शिवाजीनें शके १५६२ त राजगड केला याच वर्षी म्हणजे वयाच्या बाराव्या वर्षी शिवाजीच्या नांवें ३६ गांवांचा मोकासा होऊन त्याच्या कार्यास येथेंच प्रारंभ झाला.

पृ. १६ — रायगड राजधानी कां केली तें सभासदानें सांगितलेंच आहे. फुटीर, –विट्रून'–हे व्यर्थ मनचे तर्क कशाला ?

पृ. १७ — घरंदाज घराण्यांतील हि अनेकांनी शिवाजीला साहाय्य केले. कंक, ढमढेरे, बांदल, जेधे, लोहोकरे, हणमंते हे सारे शिवाजीचे पक्षपाती घरंदाजच होते. विरुद्ध तर पुष्कळच होते.

,, खरें म्हणावयाचें तर शिवाजी हाच मराठी आरमाराचा संस्थापक होता.

पृ. १९ — शिवाजीचे हात तर पुष्कळच होते पण त्यांत तानाजी हा पायदळी हशमांचा एक शूर व कर्ता सरदार होता ' उजवा ' म्हणण्यानें निघणारा अर्थ तानाजीच्या चरित्राला लागू पडणारा नाही.

पृ. २२—खंडेराव रास्ते ' इंग्रजांचा ' सुभेदार कसा असेल ?

पृ. २६ व पृ. ४२—नेताजी पालकराचा व चौकचा संबंध काल्पनिक समजावा.

एक सूचना करावीशी वाटते. रायगडच्या राज्याभिषेकाचें वर्णन केलें त्या पेक्षांहि सेखोजी, तुळाजी, कान्होजीप्रभृति आंग्रे मंडळीच्या पराक्रमाचें वर्णन अधिक उपयुक्त व स्फूर्तिदायक ठरेल. सिद्दी सातांशीं झालेलें युद्ध, शिद्दी कसा अजिंक्य राहिला, सारंग मंडळीचें महत्त्व काय, मायनाक भंडारी कोण. कोळी सरपाटील, चौलचे धर्माधिकारी, शैव कवी, यांचे उल्लेखहि अधिक उद्बोधक झाले असते. नांगावचा फार महत्त्वाचा शिलालेख, अक्षी प्रभृति गांवीं इतस्ततः पडलेले शिलालेख, पोलादपुरीं 'शिवभारतकार' परमानंद गोसावी यांचा मठ होता व त्यांनीं शिवाजीला 'पूर्णसाम्राज्य' देणारा आशीर्वाद कसा दिला, चौलचंपावतीच्या विशालनगरीचें उद्बोधन, बेनेइस्रा-एल-समाज, वगैरे विषयीं कांहीं ओळी गाळतां येण्यासारख्या नाहींत. वेळ पडली तर शिवतर घळीचा मोठा उतारा किंवा रामदास-शिवाजी भेटीचा वाद यांचा संकोच केला असता तरी चाललें असतें. नवी आवृत्ति निघावी, निघेल तेव्हां विचार व्हावा. इतर जिल्ह्यांबाबत, गांवाबाबत अशी पुस्तकें निघतील तितकीं हवीच आहेत. मी जन्मानें बिरवाडकर, माझ्या जिल्ह्याचें हें कुलाबा-वर्णन मला विशेषच प्रिय वाटलें तर तें साहजिकच होय.

आश्विन व॥ ८
१८७६
पुणें.

दत्तो वामन पोतदार

# लेखकाचें निवेदन

रजपुतांची कर्मभूमि मेवाड व पुण्यक्षेत्र 'चितोडगड', त्याचप्रमाणें मराठ्यांची कर्मभूमि महाराष्ट्र व पुण्यक्षेत्र 'रायगड'. मराठी राज्याच्या राजधानीनें ज्या जिल्ह्याला भूषविलें तो 'कुलाबा जिल्हा' किती भाग्यवान समजला पाहिजे! या रायगडावर जेष्ठ शु॥ १३ शी शके १५९६ (६ जून १६७४) रोजीं गोब्राह्मणप्रतिपालक, चातुर्वर्ण्यरक्षक शत्रुसंहारक, प्रजापालक, मातृभक्त, गुरुभक्त, संतचरणासक्त, महापराक्रमी हिंदुराजा श्रीशिवराय यास अभिषेकोत्सव अत्यंत उल्हासांत झाला. कित्येक शतकांत असा सोन्याचा दिवस एखादाच येतो. शिवरायाचा हा राज्याभिषेकोत्सव म्हणजे कार्यकर्त्या वीरमुत्सद्यांच्या पराक्रमाचा गौरव होता. ही गोष्ट या जिल्ह्यांत घडली.

श्री. कान्होजी आंग्रे यानीं इंग्रज, डच, व पोर्चुगीज आरमारांपाशीं यशस्वी झुंज देऊन खालील पराक्रम केले.

इ. स. १७१२ 'ॲन क्येंच' जहाज पकडलें. चौन मारला गेला. त्याच्याकरतां रु. ३०,००० ची मागणी केली होती.
,, १७१६ घेरीयावरील स्वारी, इंग्रजाचा पराभव.
,, १७१७ कान्होजीनें इंग्रजांचे 'ससेक्स्' नांवाचें मोठें जहाज पकडलें. मुंबईकर इंग्रजांना तो अपमान निमूटपणें सहन करावा लागला.
,, १७१९ खांदेरी येथें 'मन्युएल डिकेस्ट्रो रसेल' व 'स्टील' मारले गेले.
,, १७२२ कुलाब्यावरील हल्ला, 'कर्नल मॅथ्यूज' जखमी झाला, 'कर्नल ब्रेथवेट' मारला गेला.
,, १७२४ विजयदुर्गाजवळ डच लोकांचा पराभव.
,, १७२७ इंग्रजांचें 'डरबी जहाज पकडलें.
,, १७२६–२९ सिद्दी पालगड घेण्याची धडपड करतो.
,, १७२९ पालगड घेतला.

या सर्व गोष्टी कुलाबा जिल्ह्यांत झाल्या. श्री कान्होजीराव आंग्र्यांचें मुख्य ठिकाण 'कुलाबा' किल्ला. या किल्ल्यावरून 'कुलाबा' हें या जिल्ह्याचें नांव पडलें.

**मराठ्यांचें कार्य:**— याप्रमाणें दुही, राष्ट्रीय भावनेचा अभाव, अव्यवस्था व दुर्दैव यामुळें मराठी साम्राज्य मोडकळीस आलें, व पाश्चिमात्यांच्या शास्त्रांवर पुरेसें स्वामित्व न मिळविल्यानें त्यांच्या सैन्याचा नाश झाला बाकी मराठ्यांनीं हिंदुस्थानच्या इतिहासांत अभिमान धरण्याजोगी चिरस्मरणीय कामगिरी केली. मुसलमानी संस्कृतीची लाट परतविण्याचें कार्य रजपूत, शीख, विजयनगरचें हिंदुराज्य व मराठे यानीं केलें. त्यांस रजपुतांस मुसलमानांपुढें हार खावी लागली. विजयनगरचा नाश झाला शीखानीं तोंड दिलें, परंतु हिंदुत्वाचें रक्षण करण्याऐवजीं त्यांनीं निराळाच धर्म स्थापन केला. मराठ्यानीं मात्र हिंदुत्वाचें रक्षण करून इस्लामी संस्कृतीची लाट परतवून लावली. उन्नतीचे व अवनतीचे फेरे सर्वांवरच येतात, परंतु मराठ्यांचा उज्वल इतिहास त्याना भविष्य कालाच्या भाग्योदयाचा विसार देऊन गेलेला आहे यांत शंका नाहीं.

कुलाबा जिल्ह्यासंबंधीं विशेष माहिती मुंबई प्रांतांतील फारशा जिल्ह्यातील लोकांना असेल असें वाटत नाहीं. "कुलाबा" या नांवाचें गांवही कुलाबा जिल्ह्यांत नाहीं. अशा परिस्थितींत या जिल्ह्याचें महत्व जिल्ह्याबाहेरील लोकांना पटावें व जिल्ह्यांतील लोकांना महाराष्ट्रांत आपल्या जिल्ह्याचें स्थान कोणतें व आपल्या पूर्वजांनीं कोणत्या गुणांमुळें तें स्थान प्राप्त करून घेतलें होतें हें समजावें व ते गुण पुनः प्राप्त करून घेण्याची खटपट त्यांनीं करावी हा हें लहानसें पुस्तक लिहिण्याचा हेतू आहे.

"कुलाबा वर्णन" यासारखें पुस्तक लिहितांना अनेक पुस्तकांतून माहिती गोळा करणें क्रमप्राप्त आहे. ज्या पुस्तकांतून अशा तऱ्हेची माहिती

या पुस्तकाकरतां गोळा केली आहे त्या पुस्तकांची व त्यांच्या लेखकांची नांव या पुस्तकाच्या शेवटीं दिली आहे. पुस्तकांतून घेतलेल्या माहितीचें ऋणें आभारपूर्वक येथें नमूद करीत आहे. हें पुस्तक लिहिण्यास उत्तेजन दिल्याबद्दल मी श्री. भालचंद्र नारायण कुळकर्णी यांचा व मार्गदर्शन गेल्याबद्दल श्री. टी. व्ही. पर्वते, डेप्युटी डायरेक्टर ऑफ पब्लिसिटि मुंबई यांचा आभारी आहे.

या पुस्तकाच्या मुद्रणाची व प्रकाशनाची सर्व जबाबदारी श्री. नारायणराव कुळकर्णी मेमोरिअल वेलफेअर सोसायटीनें आपल्या अंगावर घेतल्याबद्दल मी त्या सोसायटीचा आभारि आहे.

श्री. नानासाहेब पुराणिक, पनवेल, यांनीं पनवेल शहराबद्दल उपयुक्त माहिती पुरविल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

श्री. जी. एन्. मालाडकर यांनीं मुखपृष्ठावरील डिझाइन करून दिल्या-बद्दल मी त्यांचा आभारी आहे.

पंडित महामहोपाध्याय दत्ता वामन पोतदार, पुणें, यांनीं या पुस्तकाला प्रस्तावना लिहिल्याबद्दल मी त्यांचा फार आभारी आहे.

या जिल्ह्यांतील मूळचे रहिवाशी पूज्य विनोबाजी भावे, (मूळगांव गागोदें, ता. पेण.) स्वामी केवलानंद (पूर्वाश्रमींचे नारायण शास्त्री मराठे, ता. रोहे.) कवि व नाटककार राम गणेश गडकरी, (कर्जत), व प्रबोधनकार श्री. केशव सिताराम ठाकरे, (पनवेल) यांचा उल्लेख पुस्तकांत करावयाचा राहिला तो या ठिकाणीं आदरपूर्वक करीत आहे.

१४ व्या प्रकरणांतील सूचना महाडचे श्री. सुरेंद्रनाथ गोविंद टिपणीस यांच्या आहेत.

अशा तऱ्हेचें पुस्तक लिहिण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग असल्या कारणानें त्यांमध्यें कांहीं चुका, दोष, व अपुरेपणा असणें स्वाभाविक आहे. अशा गोष्टी वाचकांनीं माझ्या नजरेस आणल्या तर, या पुस्तकाची दुसरी आवृत्ती काढण्याची वेळ आली तर त्या आवृत्तीमध्यें त्यां नाहींशा करण्याचा मी प्रयत्न करीन.

२१ जी, भवानी शंकर रोड,
दादर, मुंबई २८.

विष्णु कृष्ण जोशी,
लेखक.

## प्रकाशकाचे निवेदन

कुलाबा जिल्ह्याबद्दल वाटणाऱ्या ममत्वबुद्धीनेंच 'कुलाबा-वर्णन' या लहानशा पुस्तकाच्या प्रकाशनाची जबाबदारी नारायणराव कुळकर्णी मेमोरिअल सोसायटीनें आंगावर घेतली व यथाशक्ती पार पाडली आहे. या पहिल्याच प्रयत्नांतील अनेक उणीवांची व दोषांची जाणीव प्रकाशकांस व लेखकास आहे. परंतु अशा प्रकारच्या माहिती देणाऱ्या पुस्तकांची जरूरी त्यामुळें सर्व कुलाबेकरांस पटेल अशी उमेद वाटते. या प्रयत्नाचें स्वागत कुलाबेकरांकडून व मुंबईत रहिवास करणाऱ्या त्यांच्या नातेवाईकांकडून व ऋणानुबंधीयांकडून झाल्यास यापेक्षांहि अधिक उपयुक्त पुस्तकांचें वेळोवेळीं प्रकाशन करण्याची इच्छा आहे.

प्रकाशक.

जो लोककल्याण,
साधावया जाण,
कष्टीतसे प्राण,
त्या सौख्य कैंचें!

# Late Mr. Narayanrao Kulkarni



Birth: 1882 Died: 11-11-1933

Great loss to all, that ever did him see,
Great loss to all, but greatest loss to me.

— **Bhalchandra**

*S. K. Patil*, M. P.
*President*
BOMBAY PRADESH CONGRESS COMMITTEE

TELEGRAMS . CONGRESS
TELEPHONES. 73111 (*Congress*) 42959 (*Personal*) 37576 (*Residence*

CONGRESS HOUSE
Bombay 4.

२३–९–१९५४

नारायणराव कुळकर्णी मेमोरीयल वेलफेअर सोसायटीनें चालविलेल्या लोकोपयुक्त सेवाकार्याचें जवळून अवलोकन करण्याचें भाग्य मला वेळोवेळीं लाभलें आहे हें नमूद करण्यास आनंद वाटतो. हॉलिडे होम आणि स्टूडन्टस् होम या नावांची दोन वसतीगृहें सोसायटीतर्फे सारल व्हिलेज आणि अलिबाग येथें चालविलीं जात आहेत. त्यांची व्यवस्था अधिक कार्यक्षमतेनें पार पाडण्यासाठीं संस्थेला पैशांची अत्यंत निकड आहे. तरी शिक्षणप्रेमी आणि दानी लोक मुक्तहस्तानें आर्थिक सहाय्य देऊन संस्थेच्या कार्याला अधिक उत्तेजन देतील अशी मला उमेद आहे.

सोसायटीची मी अंतःकरणपूर्वक भरभराट चाहतों.

(सही) एस. के. पाटील

## नारायणराव कुळकर्णी मेमोरिअल वेल्फेअर सोसायटी

मुंबई शहरांत समाजसेवक म्हणून प्रसिद्ध असलेले श्री. नारायणराव कुळकर्णी यांच्या निधनानंतर त्यांचें स्मारक म्हणून स्थापन झालेल्या या संस्थेनें कुलाबा जिल्ह्यांत समाजसेवेचें कार्य विविध प्रकारें करावें म्हणून बरीच खटपट कित्येक वर्षें चालविलेली आहे. अलिबाग येथें विद्यार्थ्यांच्या सोयीसाठीं एक वसतीगृह काढावें म्हणून कोंकण एज्युकेशन सोसायटीच्या अलिबाग इंडस्ट्रिअल हायस्कुलच्या चालकांशीं सोसायटीनें पत्रव्यवहार केला. कामथ बागेपाशीं पांच गुंठे क्षेत्रफळाची जागा मिळावी म्हणून यत्न केला. परंतु तो निष्फळ झाल्यामुळें सध्यां खाजगी जागेंतच ' मधुकुंज ' येथें हें वसतीगृह चालू केलें आहे. श्री. देवरूखकर व सौ. मनोरमाबाई देवरूखकर यांची त्यांवर देखरेख आहे.

प्रथम योजना अशी होती कीं एका निनांवी दात्यानें या वसतीगृहाची इमारतच बांधून द्यावी. पण ही योजना ठरल्यावर बरीच कालक्रमणा झाली व परिस्थिती बदलली आणि ही योजना सिद्धीस जाणें दुर्घट झालें. त्यामुळें रु. १५००० रक्कम या कामासाठीं सार्वजनिक देणग्यांनीं व वर्गण्यानीं उभारणें जरूर झालें आहे ही सोसायटी पब्लिक ट्रस्ट कायद्याखालीं नोंदविण्यांत आलेली आहे. त्यामुळें संस्थेला जातिधर्मनिरपेक्षपणें कोणालाही मदत करतां येईल.

अलिबागनजीक सारळ येथें सोसायटीनें एक सुटीच्या दिवसांत सहलीसाठीं जाण्याकरितां ' हॉलिडे होम " म्हणून चालविलें आहे. मुंबई शहरांत राहणाऱ्या व सेवानिवृत्त झालेल्या लोकांना ग्रामीण जीवनाचा आस्वाद घेतां यावा, गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबाना हवापालट करण्याची सोय व्हावी असा यांत उद्देश आहे. आतांपर्यंत अनेकांनीं या योजनेचा फायदा घेतला आहे. मुंबईहून सारळपर्यंत सुमारें दोन तासाचा समुद्रांतील प्रवास व तेंथ गेल्यावर निसर्गसान्निध्यांत घडणारा निवास यामुळें थोड्या तासानंतरहि हुषारी वाटून

परत मुंबईस आल्यावर संस्थेला धन्यवाद देणारे लोक आतांपर्यंत आढळले आहेत.

शाळा-कॉलेजांच्या सुटींत या ठिकाणीं सहली नेण्यांत येत असतात आणि वृत्तपत्रांतून व अन्य मार्गानें प्रचार करून विद्यार्थी वर्गाचें लक्ष सारळ-कडे वेधलें जातें. खेडेगांवातील या कॅम्पची वैशिष्ट्यें अनेक आहेत. रेवस बंदराजवळ ते आहे, मध्यवर्ती ठिकाणी आहे. याव्यतिरिक्त कनकेश्वराचे टेकडीवर सहज पायीं चढणें या ठिकाणाहून शक्य होतें व सुटीचा वेळ जवळच्याच नैसर्गिक सृष्टिसौंदर्यांत घालणाऱ्यास ही जागा अत्यंत आकर्षक अशीच आहे.

ग्रामीण विकासकार्याकडे लक्ष पुरवावें म्हणून सोसायटीची इच्छा आहे कीं या सारळच्या विश्रांतिधामाच्या आसपास एक विकासकार्यकेंद्र निर्माण करावें. चार महिने पावसाळ्यांत शेतीचें काम करून दिवाळीनंतर शेतकरी मोकळे होतात. व पुढील आठ महिने त्यांना म्हणण्यासारखा उद्योग सारखा भासत नाहीं. त्यांना शेतीच्या जोडीला कांहीं तरी किफायतशीर धंद्याची जरूरी असते. विटा तयार करून त्या भाजून इमारती बांधण्याच्या कामाला योग्य अशा बनविण्याचा एक उद्योग सारळनजीक चांगला चालेल. त्याच-प्रमाणें दुधदुभतें, कोंबड्या पाळणें आणि हातमागावर कापड विणणें याहि उद्योगाची वाढ ग्रामीण विभागांत करणें संभवतें. याकरितां मुंबईत राहाणाऱ्या मंडळींनीं आपल्या ग्रामवासी बंधूंच्या करितां आपला वेळ खर्च करण्याची व इतरहि रीतीनें झीज सोसण्याची तयारी यथाशक्ति दाखविली पाहिजे असें सोसायटीला वाटतें.

या संस्थेनें कुलाबा जिल्ह्यांत बँकेची व्यवस्था असावी, एखाद्या प्रमुख बँकेची शाखा असावी म्हणून प्रयत्न केला होता. परंतु तो यशस्वी झाला नाहीं. आतां महाराष्ट्र बँकेची एक शाखा पनवेल येथें सुरू होत आहे तेव्हां

अशी आशा उत्पन्न झाली आहे कीं त्याच बँकेला अलिबाग येथेंहि एक शाखा चालविण्याचें महत्व व इष्टता पटेल.

मुंबई राज्याचे माजी मुख्य मंत्री श्री. बाळासाहेब खेर एकदां अलिबाग-सासवने-किहिम भागांत दौऱ्यावर आले असतां म्हणाले कीं कुलाब्याचा समुद्रकिनारा म्हणजे मुंबई शहराचा उत्कृष्ट बागायती उपनगर विभाग होण्याला अगदीं लायक आहे. श्री. खेर यांचें म्हणणें अगदीं खरें आहे. मुंबईपासून मांडवा अवघें ८ मैल आहे व मोटार-बोटीनें किंवा वाफेच्या बोटीनें हा प्रवास ३०–४० मिनिटांपेक्षां जास्त वेळाचा नाहीं. सासवने-किहीम हीं गांवें सांताक्रुझ-अंधेरी सारखींच मुंबईला जवळ आहेत. पण मध्यें समुद्र असल्यानें व तो उलंघिण्याला जलद चालणारीं जहाजें व चढण्याउतरण्याच्या सोयी बरोबर नसल्यानें हीं नयनरम्य उपनगरांचीं स्वप्नें अजून खरीं होत नाहींत मुंबई शहराचा विकास समुद्रापलीकडे करण्याच्या दृष्टीनें सासवने किहीम-थळ-अलिबाग, त्याचप्रमाणें उरण-न्हावें-घारापुरी या गावांचा विकास करण्याकरितां कुलाबेकरांनीं व त्यांच्या मुंबईत पसरलेल्या एक लाख भाईबंदांनीं निकराचा प्रयत्न केला पाहिजे. मुंबई कॉर्पोरेशन, पोर्ट ट्रस्ट, व्यापारी वर्ग या सर्वांना या गोष्टीचें महत्त्व पटविलें पाहिजे असें या सोसायटीचें विचारपूर्वक बनलेलें मत आहे.

मांडवा बंदराची व्यवस्था तेथें एक धक्का उभारून व बोटींना येण्या-जाण्याची व्यवस्था करून तडीस नेली पाहिजे. या बाबतींत सरकारी तज्ञ इंजनिअरांची पाहाणी व अहवाल वगैरे सर्व कांहीं झालेलें आहे. परंतु ज्या कुलाब्यांतील बंदरांची पाहाणी होऊन त्यांची दुरुस्ती करण्याचें ठरलें आहे, त्यांत मोरा-एलिफंटा-श्रीवर्धन यांचीं नांवें आहेत; मात्र मांडव्याचें महत्वाचें नांवच नाहीं. श्री. नानासाहेब कुंटे यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईतील कुलाबेकरांची कुलाबा जिल्हा विकास सभा म्हणून जी संस्था आहे तिनें हा प्रश्न विशेष रीतीनें धसास लावावा अशी नारायणराव कुळकर्णी मेमोरिअल वेल्फेअर सोसायटीची नम्र अपेक्षा आहे.

# अनुक्रमणिका


| प्रकरण अ. नं. | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | राजकीय विभाग–तालुके | १ |
| २ | जिल्ह्यांतील डोंगर, नद्या व खाड्या | २ |
| ३ | जिल्ह्यांतील बंदरें | ४ |
| ४ | प्रसिद्ध देवस्थानें व क्षेत्रें | ६ |
| ५ | ऐतिहासिक किल्ले, स्थळें, व् व्यक्ति | १० |
| ६ | जिल्ह्यांतील मोठमोठीं गांवें | ३० |
| ७ | दळणवळणाचे मार्ग | ४२ |
| ८ | जिल्हा मागासलेला कां ? | ४४ |
| ९ | ग्रामसुधारणेच्या निरनिराळ्या योजना | ५४ |
| १० | सहकारी सोसायट्या, बँका वगैरे | ५६ |
| ११ | जिल्ह्यांतील धंदे व छोटेमोठे कारखाने | ५७ |
| १२ | जिल्ह्यासंबंधीं इतर उपयुक्त माहिती | ५९ |
| १३ | जिल्ह्यांतील दुसऱ्या पंचवार्षिक ( १९५६–६१ ) योजनेचा आराखडा | ६२ |
| १४ | जिल्हा विकास मंडळाला उपयुक्त सूचना | ७३ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम १०३७५ वि: [illegible]
क्रमांक 203. नों: दि: [illegible]

प्रकरण १ लें ★ ★

# राजकीय विभाग—तालुके

कुलाबा जिल्हा हा दक्षिणोत्तर अक्षांश १७°, ५०,' आणि १८°,' ५०,' आणि पूर्व पश्चिम रेखांश ७२°, ५५' आणि ७३°, ४३' यांमध्यें पसरलेला आहे. याच्या पूर्वेस सह्याद्रि पर्वत, पुणें व सातारा जिल्हे, पश्चिमेस अरबी समुद्र, उत्तरेस ठाणें जिल्हा व मुंबई व दक्षिणेस बाणकोटची खाडी व रत्नागिरी जिल्हा, या ह्या जिल्ह्याच्या चतुः सीमा आहेत. या जिल्ह्याची दक्षिणोत्तर लांबी ७० मैल व पूर्वपश्चिम रुंदी ३० मैल आहे. ज्याला 'अपराण्ह' किंवा' कोंकण' म्हणून म्हणतात त्या प्रांतातील हा एक जिल्हा आहे. मोल्सवर्थच्या मराठी कोशामध्यें या जिल्ह्याचें 'कुलाबा' हें नांव अरेबिक शब्द 'कालाबेल' म्हणजे समुद्रांत शिरणारा एक चिंचोळा भूप्रदेश या शब्दावरून पडलें असावें असें म्हटलें आहे.

इ. स. १८६९ पर्यंत या जिल्ह्यातील महाड तालुक्याचा समावेश ठाणें जिल्ह्यांत होत असे. बॉंबे गॅझेटिअर कुलाबा (१८८७) या पुस्तकांत कुलाबा जिल्ह्यामध्यें, अलिबाग, पेण, रोहें, माणगांव व महाड या पांच तालुक्यांचा उल्लेख आहे. पनवेल व कर्जत हे तालुके त्या नंतर या जिल्ह्याला जोडण्यांत आले असावेत. कांहीं वर्षांपूर्वी उरण, खालापूर, व नागोठणें हे या जिल्ह्यांतील पेटे होते. आज उरण व पोलादपूर हे दोनच पेटे आहेत. खालापूर हा हल्लीं एक तालुका झाला आहे. नागोठण्याचा समावेश पूर्वी पेण तालुक्यांत होत

असे, आज-रोहें तालुक्यांत होतो. १९४८ मध्यें जेव्हां संस्थानें भारतांत विलीन झालीं, त्यावेळीं भोर संस्थानांतील सुधागड तालुका कुलाबा जिल्ह्यांत सामील झाला. त्याचप्रमाणें जंजिरा हें संस्थानही कुलाब्यांत सामील झालें. या संस्थानांत मुरुड, श्रीवर्धन, व म्हशेळें हे महाल आहेत. या जिल्ह्याचें क्षेत्रफळ २७१५.१ चौरस मैल असून लोकसंख्या ९,०९,०८३ आहे.

या जिल्ह्याचें स्वाभाविक विभाग तीन पडतात. उत्तरेकडील विभागाच्या दक्षिणेस अंबा नदी, मध्य विभागाच्या दक्षिणेस कुंडलिका नदी व रेवदंड्याची खाडी, व दक्षिणेकडील विभागाच्या दक्षिणेस सावित्री नदी व बाणकोटची खाडी आहे. उत्तरेकडील विभागांत अलिबाग, पेण, पनवेल, कर्जत व खालापूर हे तालुके व सुधागड महाल हे येतात. मध्य विभागांत रोहें तालुका व दक्षिण विभागांत माणगांव महाड हे तालुके, व मुरुड, श्रीवर्धन, व म्हशेळें हे महाल मोडतात. घारापुरीच्या लेण्याची व्यवस्था कुलाब्याच्या कलेक्टरकडे सोपविलेली आहे.

प्रकरण २ रें ★ ★

# या जिल्ह्यांतील डोंगर, नद्या व खाड्या.

या जिल्ह्याच्या पूर्वेकडील सह्याद्री पर्वतांची रांग ही पुष्कळ वर्षांपूर्वी झालेल्या ज्वालामुखीच्या स्फोटामुळें उत्पन्न झालेली आहे असें म्हणतात. या जिल्ह्यांतील सह्याद्रीचें सर्वांत उंच शिखर रायगड २८२९ फूट आहे. जिल्ह्यातील बाकीचे लहान सहान डोंगर हे सह्याद्रीचेच फाटे आहेत. रायगड, प्रतापगड, माथेरान व माणिकगड ही या फाट्यांची शिखरें उंच आहेत. मीरा, अवचितगड यांचीं शिखरें लहान आहेत. अलिबाग व पनवेल या तालुक्यांतूनही टेकड्यांच्या रांगा गेलेल्या आहेत. त्यांत अलिबाग तालुक्यांत सागरगड

व कनकेश्वर व पनवेल तालुक्यांत कर्नाळा ही उंच शिखरें आहेत. मधूनमधून उंच सुळकेही दिसत आहेत. या सुळक्यांत कळसगिरी, द्रोणागिरी, नातोंडी व तुंबे हे उंच आहेत. अलिबाग तालुक्याचा मध्यभाग, पेण व पनवेल तालुक्यांचा पूर्वभाग, व कर्जत, माणगांव आणि महाड हे तालुके डोंगराळ आहेत. अलिबाग, पनवेल, पेण व रोहें या तालुक्याचा बराच भाग सपाट आहे.

कुलाबा जिल्ह्यांतील नद्यांमध्यें उल्हास, पाताळगंगा, भोगावती, अंबा, कुंडलिका, काळ, व सावित्री या मोठ्या नद्या आहेत. या सर्व नद्या पूर्वेकडे सह्याद्रींत उगम पावतात पैकीं उल्हास ही उत्तरेस ठाणें जिल्ह्यांत वहात जाते. हिला पूर्वेकडून पोश्री, चिल्हार व पेज या लहान नद्या येऊन मिळतात. बाकीच्या सर्व पश्चिमेकडे वहात जाऊन अरबी समुद्रास मिळतात.

या जिल्ह्याचा बहुतेक भाग खडकाळ व चढउताराचा आहे. त्यामुळें सह्याद्रीवरचा गाळ या नद्यांच्या योगानें समुद्रांत वाहून जातो. या सर्व नद्यांना पावसाळीं भरपूर पाणी असतें, परंतु उन्हाळ्यांत या कोरड्या पडतात. त्यामुळें त्यांच्या कांठची जमीन फारशी सुपीक नाही. उल्हास, पाताळगंगा व कुंडलिका या नद्यांना टाटा कंपनीच्या धरणाचें पाणी मिळते. म्हणून त्या बाराही महिने वहातात. या नद्याना पाट काढून त्यांचा उन्हाळीं पीक काढण्याकडे उपयोग केला आहे.

या सर्व नद्यांच्या मुखातून समुद्राचें पाणी जातें. त्यामुळे पनवेल, आपटें, धरमतर, रोहें, राजपुरी व बाणकोट या खाड्या झाल्या आहेत.

कर्जत तालुक्यांत भिवपुरी व खोपोली आणि माणगांव तालुक्यांत पाटणूस येथें नद्याचें पाणी अडवून वीज उत्पन्न करणें व यंत्रें चालविणें याकडे त्याचा उपयोग केला आहे.

*S. K. Patil*, M. P.
*President*
BOMBAY PRADESH CONGRESS COMMITTEE

TELEGRAMS . CONGRESS
TELEPHONES. 73111 (*Congress*)
42959 (*Personal*)
37576 (*Residence*)

CONGRESS HOUSE
Bombay 4.

२३-९-१९५४

नारायणराव कुळकर्णी मेमोरीयल वेलफेअर सोसायटीनें चालविलेल्या लोकोपयुक्त सेवाकार्यांचें जवळून अवलोकन करण्याचें भाग्य मला वेळोवेळीं लाभलें आहे हें नमूद करण्यास आनंद वाटतो. हॉलिडे होम आणि स्टूडन्टस् होम या नावांची दोन वसतीगृहें सोसायटीतर्फें सारल व्हिलेज आणि अलिबाग येथें चालविलीं जात आहेत. त्यांची व्यवस्था अधिक कार्यक्षमतेनें पार पाडण्यासाठीं संस्थेला पैशांची अत्यंत निकड आहे. तरी शिक्षणप्रेमी आणि दानी लोक मुक्तहस्तानें आर्थिक सहाय्य देऊन संस्थेच्या कार्याला अधिक उत्तेजन देतील अशी मला उमेद आहे.

सोसायटीची मी अंतःकरणपूर्वक भरभराट चाहतों.

(सही) एस. के. पाटील

# नारायणराव कुळकर्णी मेमोरिअल वेल्फेअर सोसायटी

मुंबई शहरांत समाजसेवक म्हणून प्रसिद्ध असलेले श्री. नारायणराव कुळकर्णी यांच्या निधनानंतर त्यांचें स्मारक म्हणून स्थापन झालेल्या या संस्थेनें कुलाबा जिल्ह्यांत समाजसेवेचें कार्य विविध प्रकारें करावें म्हणून बरीच खटपट कित्येक वर्षें चालविलेली आहे. अलिबाग येथें विद्यार्थ्यांच्या सोयीसाठीं एक वसतीगृह काढावें म्हणून कोंकण एज्युकेशन सोसायटीच्या अलिबाग इंडस्ट्रिअल हायस्कुलच्या चालकांशीं सोसायटीनें पत्रव्यवहार केला. कामथ बागेपाशीं पांच गुंठे क्षेत्रफळाची जागा मिळावी म्हणून यत्न केला. परंतु तो निष्फळ झाल्यामुळें सध्यां खाजगी जागेंतच ‘ मधुकुंज ’ येथें हें वसतीगृह चालू केलें आहे. श्री. देवरूखकर व सौ. मनोरमाबाई देवरूखकर यांची त्यांवर देखरेख आहे.

प्रथम योजना अशी होती कीं एका निनांवी दात्यानें या वसतीगृहाची इमारतच बांधून द्यावी. पण ही योजना ठरल्यावर बरीच कालक्रमणा झाली व परिस्थिती बदलली आणि ही योजना सिद्धीस जाणें दुर्घट झालें. त्यामुळें रु. १५,००० रक्कम या कामासाठीं सार्वजनिक देणग्यांनीं व वर्गण्यांनीं उभारणें जरूर झालें आहे. ही सोसायटी पब्लिक ट्रस्ट कायद्याखालीं नोंदविण्यांत आलेली आहे. त्यामुळें संस्थेला जातिधर्मनिरपेक्षपणें कोणालाही मदत करतां येईल.

अलिबागनजीक सारळ येथें सोसायटीनें एक सुटीच्या दिवसांत सहली-साठीं जाण्याकरितां ‘ हॉलिडे होम ” म्हणून चालविलें आहे. मुंबई शहरांत राहणाऱ्या व सेवानिवृत्त झालेल्या लोकांना ग्रामीण जीवनाचा आस्वाद घेतां यावा, गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबाना हवापालट करण्याची सोय व्हावी असा यांत उद्देश आहे. आतांपर्यंत अनेकांनीं या योजनेचा फायदा घेतला आहे. मुंबईहून सारळपर्यंत सुमारें दोन तासाचा समुद्रांतील प्रवास व तेथें गेल्यावर निसर्गसान्निध्यांत घडणारा निवास यामुळें थोड्या तासानंतरहि हुषारी वाटून

परत मुंबईस आल्यावर संस्थेला धन्यवाद देणारे लाक आतांपर्यंत आढळले आहेत.

शाळा–कॉलेजांच्या सुटींत या ठिकाणीं सहली नेण्यांत येत असतात आणि वृत्तपत्रांतून व अन्य मार्गांनें प्रचार करून विद्यार्थी वर्गाचे लक्ष सारळ-कडे वेधलें जाते. खेडेगांवातील या कॅम्पची वैशिष्ट्यें अनेक आहेत. रेवस बंदराजवळ ते आहे, मध्यवर्ती ठिकाणी आहे. याव्यतिरिक्त कनकेश्वराचे टेकडीवर सहज पायीं चढणें या ठिकाणाहून शक्य होतें व सुटीचा वेळ जवळच्याच नैसर्गिक सृष्टिसौंदर्यांत घालणाऱ्यास ही जागा अत्यंत आकर्षक अशीच आहे.

ग्रामीण विकासकार्यांकडे लक्ष पुरवावें म्हणून सोसायटीची इच्छा आहे कीं या सारळच्या विश्रांतिधामाच्या आसपास एक विकासकार्यकेंद्र निर्माण करावें. चार महिने पावसाळ्यांत शेतीचें काम करून दिवाळीनंतर शेतकरी मोकळे होतात. व पुढील आठ महिने त्यांना म्हणण्यासारखा उद्योग सारखा भासत नाहीं. त्यांना शेतीच्या जोडीला कांहीं तरी किफायतशीर धंद्याची जरूरी असते. विटा तयार करून त्या भाजून इमारती बांधण्याच्या कामाला योग्य अशा बनविण्याचा एक उद्योग सारळनजीक चांगला चालेल. त्याच-प्रमाणें दुधदुभतें, कोंबड्या पाळणें आणि हातमागावर कापड विणणें याहि उद्योगाची वाढ ग्रामीण विभागांत करणें संभवतें. याकरितां मुंबईत राहाणाऱ्या मंडळींनीं आपल्या ग्रामवासी बंधूंच्या करितां आपला वेळ खर्च करण्याची व इतरहि रीतीनें झीज सोसण्याची तयारी यथाशक्ति दाखविली पाहिजे असें सोसायटीला वाटतें.

या संस्थेनें कुलाबा जिल्ह्यांत बँकेची व्यवस्था असावी, एकाद्या प्रमुख बँकेची शाखा असावी म्हणून प्रयत्न केला होता. परंतु तो यशस्वी झाला नाहीं. आतां महाराष्ट्र बँकेची एक शाखा पनवेल येथें सुरू होत आहे तेव्हां

अशी आशा उत्पन्न झाली आहे कीं त्याच बँकेला अलिबाग येथेंहि एक शाखा चालविण्याचें महत्त्व व इष्टता पटेल.

मुंबई राज्याचे माजी मुख्य मंत्री श्री. बाळासाहेब खेर एकदां अलिबाग-सासवने–किहिम भागांत दौऱ्यावर आले असतां म्हणाले कीं कुलाब्याचा समुद्रकिनारा म्हणजे मुंबई शहराचा उत्कृष्ट बागायती उपनगर विभाग होण्याला अगदीं लायक आहे. श्री. खेर यांचें म्हणणें अगदीं खरें आहे. मुंबईपासून मांडवा अवघें ८ मैल आहे व मोटार–बोटीनें किंवा वाफेच्या बोटीनें हा प्रवास ३०–४० मिनिटांपेक्षां जास्त वेळाचा नाहीं. सासवने–किहीम हीं गांवें सांताक्रुझ–अंधेरी सारखींच मुबईला जवळ आहेत. पण मध्यें समुद्र असल्यानें व तो उलंघिण्याला जलद चालणारीं जहाजें व चढण्याउतरण्याच्या सोयी बरोबर नसल्यानें हीं नयनरम्य उपनगराचीं स्वप्नें अजून खरीं होत नाहींत मुंबई शहराचा विकास समुद्रापलीकडे करण्याच्या दृष्टीनें सासवने किहीम–थळ–अलिबाग, त्याचप्रमाणें उरण–न्हावें–घारापुरी या गावांचा विकास करण्याकरितां कुलाबेकरांनीं व त्यांच्या मुंबईत पसरलेल्या एक लाख भाईबंदांनीं निकराचा प्रयत्न केला पाहिजे. मुंबई कॉर्पोरेशन, पोर्ट ट्रस्ट, व्यापारी वर्ग या सर्वांना या गोष्टीचें महत्त्व पटविलें पाहिजे असें या सोसायटीचें विचारपूर्वक बनलेलें मत आहे.

मांडवा बंदराची व्यवस्था तेथें एक धक्का उभारून व बोटींनां येण्याजाण्याची व्यवस्था करून तडीस नेली पाहिजे. या बाबतींत सरकारी तज्ञ इंजनिअरांची पाहाणी व अहवाल वगैरे सर्व कांहीं झालेलें आहे. परंतु ज्या कुलाब्यांतील बंदरांची पाहाणी होऊन त्यांची दुरुस्ती करण्याचें ठरलें आहे, त्यांत मोरा–एलिफंटा–श्रीवर्धन यांचीं नांवें आहेत; मात्र मांडव्याचें महत्वाचें नांवच नाहीं. श्री. नानासाहेब कुंटे यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईतील कुलाबेकरांची कुलाबा जिल्हा विकास सभा म्हणून जी संस्था आहे तिनें हा प्रश्न विशेष रीतीनें धसास लावावा अशी नारायणराव कुळकर्णी मेमोरिअल वेल्फेअर सोसायटीची नम्र अपेक्षा आहे.

# अनुक्रमणिका


| प्रकरण अ. नं. | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | राजकीय विभाग–तालुके | १ |
| २ | जिल्ह्यांतील डोंगर, नद्या व खाड्या | २ |
| ३ | जिल्ह्यांतील बंदरें | ४ |
| ४ | प्रसिद्ध देवस्थानें व क्षेत्रें | ६ |
| ५ | ऐतिहासिक किल्ले, स्थळें, व् व्यक्ति | १० |
| ६ | जिल्ह्यांतील मोठमोठीं गांवें | ३० |
| ७ | दळणवळणाचे मार्ग | ४२ |
| ८ | जिल्हा मागासलेला कां ? | ४४ |
| ९ | ग्रामसुधारणेच्या निरनिराळ्या योजना | ५४ |
| १० | सहकारी सोसायट्या, बँका वगैरे | ५६ |
| ११ | जिल्ह्यांतील धंदे व छोटेमोठे कारखाने | ५७ |
| १२ | जिल्ह्यासंबंधीं इतर उपयुक्त माहिती | ५९ |
| १३ | जिल्ह्यांतील दुसऱ्या पंचवार्षिक ( १९५६–६१ ) योजनेचा आराखडा | ६२ |
| १४ | जिल्हा विकास मंडळाला उपयुक्त सूचना | ७३ |

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम १०३७५ वि: ...
क्रमांक २०३. नों: दि: ...

प्रकरण १ लें ★ ★

# राजकीय विभाग—तालुके

कुलाबा जिल्हा हा दक्षिणोत्तर अक्षांश १७°, ५०,' आणि १८°,' ५०,' आणि पूर्व पश्चिम रेखांश ७२°, ५५' आणि ७३°, ४३' यांमध्यें पसरलेला आहे. याच्या पूर्वेस सह्याद्रि पर्वत, पुणें व सातारा जिल्हे, पश्चिमेस अरबी समुद्र, उत्तरेस ठाणें जिल्हा व मुंबई व दक्षिणेस बाणकोटची खाडी व रत्नागिरी जिल्हा, या ह्या जिल्ह्याच्या चतुः सीमा आहेत. या जिल्ह्याची दक्षिणोत्तर लांबी ७० मैल व पूर्वपश्चिम रुंदी ३० मैल आहे. ज्याला 'अपराण्ह' किंवा' कोंकण' म्हणून म्हणतात त्या प्रांतातील हा एक जिल्हा आहे. मोल्सवर्थच्या मराठी कोशामध्यें या जिल्ह्याचें 'कुलाबा' हें नांव अरेबिक शब्द 'कालाबेल' म्हणजे समुद्रांत शिरणारा एक चिंचोळा भूप्रदेश या शब्दावरून पडलें असावें असें म्हटलें आहे.

इ. स. १८६९ पर्यंत या जिल्ह्यातील महाड तालुक्याचा समावेश ठाणें जिल्ह्यांत होत असे. बॉंबे गॅझेटिअर कुलाबा (१८८७) या पुस्तकांत कुलाबा जिल्ह्यामध्यें, अलिबाग, पेण, रोहें, माणगांव व महाड या पांच तालुक्यांचा उल्लेख आहे. पनवेल व कर्जत हे तालुके त्या नंतर या जिल्ह्याला जोडण्यांत आले असावेत. कांहीं वर्षांपूर्वी उरण, खालापूर, व नागोठणें हे या जिल्ह्यांतील पेटे होते. आज उरण व पोलादपूर हे दोनच पेटे आहेत. खालापूर हा हल्लीं एक तालुका झाला आहे. नागोठण्याचा समावेश पूर्वी पेण तालुक्यांत होत

असे, आज-रोहें तालुक्यांत होतो. १९४८ मध्यें जेव्हां संस्थानें भारतांत विलीन झालीं, त्यावेळीं भोर संस्थानांतील सुधागड तालुका कुलाबा जिल्ह्यांत सामील झाला. त्याचप्रमाणें जंजिरा हें संस्थानही कुलाब्यांत सामील झालें. या संस्थानांत मुरुड, श्रीवर्धन, व म्हशेळें हे महाल आहेत. या जिल्ह्याचें क्षेत्रफळ २७१५.१ चौरस मैल असून लोकसंख्या ९,०९,०८३ आहे.

या जिल्ह्याचें स्वाभाविक विभाग तीन पडतात. उत्तरेकडील विभागाच्या दक्षिणेस अंबा नदी, मध्य विभागाच्या दक्षिणेस कुंडलिका नदी व रेवदंड्याची खाडी, व दक्षिणेकडील विभागाच्या दक्षिणेस सावित्री नदी व बाणकोटची खाडी आहे. उत्तरेकडील विभागांत अलिबाग, पेण, पनवेल, कर्जत व खालापूर हे तालुके व सुधागड महाल हे येतात. मध्य विभागांत रोहें तालुका व दक्षिण विभागांत माणगांव महाड हे तालुके, व मुरुड, श्रीवर्धन, व म्हशेळें हे महाल मोडतात. घारापुरीच्या लेण्याची व्यवस्था कुलाब्याच्या कलेक्टरकडे सोपविलेली आहे.

प्रकरण २ रें ★ ★

## या जिल्ह्यांतील डोंगर, नद्या व खाड्या

या जिल्ह्याच्या पूर्वेकडील सह्याद्री पर्वतांची रांग ही पुष्कळ वर्षांपूर्वी झालेल्या ज्वालामुखीच्या स्फोटामुळें उत्पन्न झालेली आहे असें म्हणतात. या जिल्ह्यांतील सह्याद्रीचें सर्वांत उंच शिखर रायगड २८२९ फूट आहे. जिल्ह्यातील बाकीचे लहान सहान डोंगर हे सह्याद्रीचेच फाटे आहेत. रायगड, प्रतापगड, माथेरान व माणिकगड ही या फाट्यांची शिखरें उंच आहेत. मीरा, अवचितगड यांचीं शिखरें लहान आहेत. अलिबाग व पनवेल या तालुक्यांतूनही टेकड्यांच्या रांगा गेलेल्या आहेत. त्यांत अलिबाग तालुक्यांत सागरगड

व कनकेश्वर व पनवेल तालुक्यांत कर्नाळा ही उंच शिखरें आहेत. मधूनमधून उंच सुळकेही दिसत आहेत. या सुळक्यांत कळसगिरी, द्रोणागिरी, नातोंडी व तुंबे हे उंच आहेत. अलिबाग तालुक्याचा मध्यभाग, पेण व पनवेल तालुक्यांचा पूर्वभाग, व कर्जत, माणगांव आणि महाड हे तालुके डोंगराळ आहेत. अलिबाग, पनवेल, पेण व रोहें या तालुक्याचा बराच भाग सपाट आहे.

कुलाबा जिल्ह्यांतील नद्यांमध्यें उल्हास, पाताळगंगा, भोगावती, अंबा, कुंडलिका, काळ, व सावित्री या मोठ्या नद्या आहेत. या सर्व नद्या पूर्वेकडे सह्याद्रींत उगम पावतात पैकीं उल्हास ही उत्तरेस ठाणें जिल्ह्यांत वहात जाते. हिला पूर्वेकडून पोश्री, चिल्हार व पेज या लहान नद्या येऊन मिळतात. बाकीच्या सर्व पश्चिमेकडे वहात जाऊन अरबी समुद्रास मिळतात.

या जिल्ह्याचा बहुतेक भाग खडकाळ व चढउताराचा आहे. त्यामुळें सह्याद्रिवरचा गाळ या नद्यांच्या योगानें समुद्रांत वाहून जातो. या सर्व नद्यांनां पावसाळीं भरपूर पाणी असतें, परंतु उन्हाळ्यांत या कोरड्या पडतात. त्यामुळें त्यांच्या कांठची जमीन फारशी सुपीक नाही. उल्हास, पाताळगंगा व कुंडलिका या नद्यांना टाटा कंपनीच्या धरणाचें पाणी मिळते. म्हणून त्या बाराही महिने वहातात. या नद्याना पाट काढून त्यांचा उन्हाळीं पीक काढण्याकडे उपयोग केला आहे.

या सर्व नद्यांच्या मुखातून समुद्राचें पाणी जातें. त्यामुळे पनवेल, आपटें, धरमतर, रोहें, राजपुरी व बाणकोट या खाड्या झाल्या आहेत.

कर्जत तालुक्यांत भिवपुरी व खोपोली आणि माणगांव तालुक्यांत पाटणूस येथें नद्यांचें पाणी अडवून वीज उत्पन्न करणें व यंत्रें चालविणें याकडे त्याचा उपयोग केला आहे.

प्रकरण ३ रें ★ ★

# जिल्ह्यांतील बंदरें

कुलाबा जिल्ह्यांत लहान मोठीं पुष्कळ बंदरें आहेत. जिल्ह्याच्या उत्तरेच्या टोकाला उरण हा पेटा आहे. उरण हें एक द्विपकल्प असून तें पूर्वेच्या बाजूनें पनवेल या गांवाशीं जोडलेलें आहे. या गांवाच्या उत्तरेला २, २। मैलांवर मोरें हें बंदर आहे. मुंबईहून दररोज दुपारीं एक बोट सुटते व मोरें, घारापुरी, न्हावें ही बंदरें करीत उलव्याला जाते, व तीच बंदरें करीत संध्याकाळीं परत मुंबईला येते. उलवें हें बंदर पनवेल नजीक आहे. मोरें व मुंबई यामध्यें लॉंचेस व मचवे यांची रहदारी सारखी चालू असते, मोरें बंदराला मोठा धक्का बांधलेला आहे.

मांडवें, करंजें, रेवस, धरमतर व नागोठणें हीं धरमतर खाडीवरील बंदरें आहेत. मुंबईहून दररोज बोटी सुटतात, व रेवस बंदर करून धरमतरला जाऊन तेथून परत मुंबईला येतात. बरेच वर्षांपूर्वी धरमतर व नागोठणें या बंदरांमध्यें एक लॉंच उतारूंची नेआण करीत असे. परंतु धरमतर बंदरावरून मोटारींची वाहतूक सुरू झाल्यापासून वरील लांचचें जाणें येणें बंद झालें. हल्लीं करंजें या बंदराला बोट लागत नाहीं. करंजें व रेवस या बंदरामध्यें एक तर उतारूंची ने आण करते. बरेच वर्षांपूर्वी बोट करंजें हें बंदर करीत असे, तथापि करंजें व मुंबई, मांडवें व मुंबई या बंदरामध्यें मचव्यांची वहातूक जोरांत चालू असते. अंतोरे हें बंदर पेणला जवळ आहे. या बंदराचा मुंबईशीं मचव्याच्या मदतीनें मोठा व्यापार चालतो. नागोठणें हें बंदर पूर्वी फार प्रसिद्ध होतें, परंतु अंबानदींतून येणाऱ्या गाळामुळें तें ओहोरलें आहे.

कुलाबा जिल्ह्याच्या पश्चिम किनाऱ्यावरील मालाच्या व उतारूंच्या वहातुकीचीं बंदरें अलिबाग, रेवदंडा, जंजिरा, श्रीवर्धन व हरेश्वर हीं होत.

रेवदंडा बंदर रोह्याच्या खाडीच्या तोंडाशी आहे. येथून बरेच वर्षांपूर्वी रोह्यापर्यंत लॉंचीस जात असत. परंतु कुंडलिका नदीबरोबर येणाऱ्या गाळामुळें ही खाडी ओहरल्यामुळें लॉंचची येजा बंद झाली मात्र रोहें बंदरातुन गलबतांची येजा चालू असते.

जंजिरा हें बंदर राजपुरी खाडीच्या तोंडाशीं आहे. याच्या उत्तरेच्या बाजूला मांदाड हें बंदर आहे. या बंदरातून मालाची ने आण होते. जंजिरा बंदरांत जंजिरा हा किल्ला आहे.

हरेश्वर हें बंदर बाणकोटच्या खाडीच्या तोंडाशीं आहे. महाडकडून सावित्री नदी व माणगांव गोरेगांवकडून काळ ही नदी या दोन नद्या दासगांवाजवळ एकमेकीला मिळतात व तेथून बाणकोट खाडीला सुरवात होते. या बाणकोटच्या खाडींत पूर्वी दासगांव पर्यंत लॉंच सर्व्हिस चालू होती. परंतु सावित्री व काळ या नद्यांमधून येणाऱ्या गाळामुळेंही ही खाडी आहोरली असून वरील लांच सर्व्हिस बंद झाली आहे. मात्र एक खाजगी लांच सर्व्हिस अजून चालू आहे. या खाडीमध्यें बागमांडलें, संदेरी, महाप्रळ, आंबेत वगैरे लहान बंदरें आहेत. आंबेत व महाप्रळ हीं बंदरे समोरासमोर आहेत. आंबेत उत्तरेच्या बाजूला कुलाबा जिल्ह्यांत माणगांव तालुक्यांत, व महाप्रळ दक्षिण बाजूला रत्नागिरी जिल्ह्यांत मंदनगड पेट्यांत आहे. या दोन बंदरांत उतारूंची ने आण करणारी एक तर आहे. श्री शिवरायाच्या काळीं रत्नागिरी जिल्ह्यांतून या बंदरांतून आंबेत, नांदवी, गोरेगांव पन्हाळघर या गांवावरून रायगडावर सारखी जा ये चालू असावी असें समजण्यास आधार आहे.

महाड हें बंदर पूर्वी फार प्रसिद्ध होतें. या बंदराला लागूनच महिकावती देवीचें उध्वस्त दगडी देवालय आहे. महाड हे बंदर घाट व कोंकण या मधील व्यापाराची फार मोठी उतारपेठ आहे. पूर्वी पुणें भोराहून वरंध घाटानें व वाई साताऱ्याकडून आंबेनळी (Fitzerald) घाटानें दररोज चार-

पांचशें बैलगाडी महाडच्या तळावर येत असे. अजूनसुद्धां या बंदरातून इतर ठिकाणीं प्रामुख्यानें भात व इतर माल निर्यात केला जातो.

गोरेगांव हें बंदर माणगांव तालुक्यांत आहे. ठाणें व कुलाबा हे जिल्हे 'भाताचें कोठार' म्हणून प्रसिद्ध आहेत. आणि कुलाबा जिल्ह्यांत महाड व माणगांव या तालुक्यांत भाताची निपज फार मोठ्या प्रमाणावर होते. गोरेगांव बंदरांतून महाडच्या खालोखाल पण फार मोठ्या प्रमाणावर भाताची निर्यात होते.

पश्चिम किनाऱ्यावरील वर सांगितलेली सर्व बंदरें मुंबईहून कोंकणांत जाणाऱ्या सर्व बोटी घेत असत. परंतु हल्लीं त्या अलिबाग, रेवदंडा व हरेश्वर हीं बंदरें करीत नाहींत. रेवदंडा व हरेश्वर हीं बंदरें घेत नाहींत याचें कारण रोह्याची खाडी व बाणकोटची खाडी या ओहरल्या आहेत. बोट अलिबाग बंदर घेत नाहीं याचें कारण तें करंजे बंदराप्रमाणें गैरसोयीचें आहे.

--- कुलाबा जिल्ह्यांत रेल्वे मार्ग नाहीं. त्यामुळें हा जिल्हा मागासलेला आहे. जलमार्गाची रड वर सांगितल्याप्रमाणें आहे. या दोन्ही बाबींत कांहीं तरी हालचाल झाल्या खेरीज या जिल्ह्याचा विकास होईल असें वाटत नाहीं.

**प्रकरण ४ थें** ★ ★

# प्रसिद्ध देवस्थानें व क्षेत्रें

अलिबाग तालुका—आवास येथें नागोबाचें प्रसिद्ध देवालय आहे. कोणतेंही सरपटणारें जनावर चावलेलें माणूस जिवंत स्थितींत या देवळांत आल्यास बरें होतें असें म्हणतात.

चौल येथें रामेश्वर, दत्त, शीतळादेवी, भगवती, हिंगुळादेवी यांची देवळें पहाण्यासारखीं आहेत. जवळच हिंगुळजेचीं लेणीं आहेत. चौलचें "सह्याद्रीमध्यें" खालील वर्णन दिलेलें आहे. बखरकार सांगतात कीं दुसऱ्या शतकांत चौल येथें सोळा लाख घरें, तीनशें सात देवळें, व तेवढींच तळीं होतीं. यापैकीं ४४ देवळांचीं नांवें पुराणांत दिलेलीं आहेत. यापैकीं पांच देवळें आज अस्तित्वांत आहेत. यापैकीं रामेश्वर मंदिर विशेष प्रसिद्ध आहे. खुद्द शंकरानें तीनच स्थानीं लिंगस्थापना केली आहे. कन्याकुमारी नजीक रामेश्वर येथें, गोकर्णमहाबळेश्वरास व चौल चंपावतीच्या रामेश्वर मंदिरांत. या मंदिरासमोर पर्जन्य, वायु व अग्नि या वैदिक देवतांचीं कुंडें आहेत. हीं कुंडें मातीनें भरलेलीं असतात. विशिष्ट नैसर्गिक आपत्तीतून संरक्षण मिळविण्याकरतां तीं विधिपूर्वक उघडण्यांत येतांत. अग्नि व वायु प्रलय मांडतील तेव्हां तीं कुंडें उघडावीत असा संकेत आहे. हीं कुंडें उघडल्याचा दाखला मिळत नाहीं. १७३१,१८५७,१८७७, व १८९९ सालीं अवर्षणें पडलीं होतीं, तेव्हां पर्जन्यकुंड उघडण्यांत आलें होतें आणि त्यामुळें या प्रदेशांत पुरेसा पाऊस पडला असें सांगतात. कुंड उघडणें म्हणजे त्यांतील माती काढून तेथें होम हवन करणें. कुंड उघडतांना जो पहिली कुदळ घालतो तो बळी जातो अशी समजूत व दाखले असल्यामुळें क्षुद्र संकटांचें समयीं त्यांच्या शक्तीला आवाहन करण्यांत येत नाहीं.

कनकेश्वर हें एक प्रसिद्ध देवस्थान आहे. कार्तिकी पौर्णिमेस व महाशिवरात्रीस मोठी जत्रा भरते. येथून मुंबईचा व भोंवतालचा देखावा मनोहर दिसतो.

अलिबागच्या किल्ल्यांतील गणपतीचें देऊळ प्रसिद्ध आहे.

पेण तालुका—पेण येथील रामेश्वराचें देऊळ प्रसिद्ध आहे.

साक्सई किल्ल्याच्या पायथ्याशीं बद्रुद्दिन या साधूचें थडगें आहे. तेथें मोठा उरूस भरतो.

पनवेल तालुका-उरणपेटा-समुद्रकाठीं पीरवाडीला माघाच्या महिन्यांत मोठा उरूस भरतो माणकेश्वरचे देऊळ प्रसिद्ध आहे. करंजे येथील देवीचे देऊळही प्रसिद्ध आहे.

कर्जत तालुका-दहिवलीचें विठोबाचें देवस्थान प्रसिद्ध आहे.

भीमाशंकर-शंकराचें प्रसिद्ध देवस्थान येथील देवळें पहाण्यासारखी आहेत. खोपोली-शंकराचें देवालय पहाण्यासारखे आहे. मढ येथील गणपतीचें देवस्थान प्रसिद्ध आहे.

रोहें तालुका — अवाचितगड किल्ल्यातील शिलालेख, पासिलकर महाराजांची समाधि व देवळें पहाण्यासारखी आहेत.

माणगांव तालुका — गोरेगांव, चैत्रांत बहिरीची जत्रा भरते.

कुडें — सुंदर लेणी आहेत. त्यातील शिलालेख, अकरा फूट उंचीचे हत्ती व द्वारपालाच्या गळ्यांतील अलंकार पहाण्यासारखे आहेत.

महाड तालुका — शिवतरचीघळ, रामदासस्वामींचें तप करण्याचें ठिकाण या घळीचें सविस्तर वर्णन याच पुस्तकांत अन्यत्र दिलें आहे.

पालें - येथील लेणीं पाहण्यासारखी आहेत.

किल्ले प्रतापगड — श्रीशिवरायाच्या कुलदेवतेचे श्रीभवानीचें देऊळ नवरात्रांत येथें मोठा उत्सव होतो. या किल्ल्याच्या पायथ्याशीं अफझुलखानाची कबर आहे. तेथें मोठा उरूस भरतो.

हरेश्वर-क्षेत्र श्रीशंकराचें व बहिरोबाचें जागृत देवस्थान. पुष्कळ भाविक लोक येथें सेवेला येऊन रहातात.

महाड — विरेश्वराचें देऊळ प्रसिद्ध आहे. हें मंदिर फारच सुंदर व भव्य असून संपूर्ण दगडी आहे. मंदिराचें कोरीव काम फारच सुबक आहे.

सदर देवालय उरवड्याचे प्रसिद्ध सरदार पेतनीस यांनीं इ. स. १७३० च्या सुमारास बांधलें असून त्याच्या कायम खर्चाकरतां इनामेंही दिलीं आहेत.

महाडच्या पूर्वेस तीन मैलांवर भोराव गांवाशी काळ आणि सावित्री यांचा संगम झाल्यानें त्या ठिकाणास क्षेत्राचें महत्व आलें आहे. दरवर्षी महाशिवरात्रीस आजूबाजूच्या गांवांतील शेंकडों लोक येथें स्नानासाठीं येत असतात.

तालुका सुधागड – पाली अष्टसिद्धिविनायकांपैकी श्रीबल्लाळेश्वराचें देऊळ येथें आहे. माघाच्या महिन्यांत मोठा उत्सव होतो. सिद्धेश्वर येथें शंकराचे प्रसिद्ध देवस्थान आहे. येथील पुष्करणींत अस्थि टाकल्या तर त्या विरतात. महाशिवरात्रीस मोठी जत्रा भरते. जवळच इतिहास प्रसिद्ध ठिकाण उंबरखिंड आहे.

ठाणाळ – येथील लेणीं पहाण्यासारखी आहेत.

उसर – वरदायिनी देवीचें प्रसिद्ध देवस्थान.

तालुका – मुरुड – भवानी देवी व श्रीगणपती हीं देवस्थानें प्रसिद्ध आहेत. राजपुरी येथील मशीद प्रसिद्ध आहे. नांदगांव येथील श्रीगणपतीचें देऊळ प्रसिद्ध आहे.

तालुका श्रीवर्धन – श्रीवर्धन सोमजाई देवीचें देऊळ प्रसिद्ध आहे.

पंचतन – येथें पीराचें स्थान आहे.

तालुका – म्हसळें – देवघर – शंकराचें स्वयंभूस्थान.

प्रकरण ५ वें　　★ ★

# ऐतिहासिक किल्ले व स्थळें व व्यक्ति

किल्ले तीन प्रकारचे (१) डोंगरी (२) भुइकोट व (३) जंजिरे. या जिल्ह्यांत भुइकोट किल्ले जवळ जवळ नाहींतच म्हटलें तरी चालेल. नाहीं म्हणावयास रेवदंडा येथें एकच भुइकोट किल्ला आहे. तो पोर्तुगीज लोकानीं बांधला.

अलिबाग तालुक्यांत कुलाबा, खांदेरी व उंदेरी हे जंजिरे किल्ले आहेत. सागरगड हा डोंगरी किल्ला आहे.

पेण तालुक्यांत साक्सई व सोनगिरी हे दोन डोंगरी किल्ले आहेत.

पनवेल तालुक्यांत माणिकगड हा डोंगरी किल्ला आहे.

कर्जत तालुक्यांत कोटलीगड, भीमगड, व राजमाची हे डोंगरी किल्ले आहेत. राजमाची किल्ल्याचे श्रीवर्धन व मनरंजन असे दोन भाग आहेत. मुंबईहून पुण्याला जातायेतांना बोर घाटांत हे दोन्ही भाग दिसतात. या किल्ल्याला पूर्वी "कोंकण दरवाजा" हें नांव होतें.

रोहें तालुक्यांत घोसाळें व अवाचितगड हे दोन डोंगरी किल्ले आहेत.

माणगांव तालुक्यांत तळें हा डोंगरी किल्ला आहे.

महाड तालुक्यांत रायगड व प्रतापगड हे दोन डोंगरी किल्ले आहेत. रायगड हें श्रीशिवाजी महाराजांच्या राजधानीचें ठिकाण. येथें दर वर्षी शिवजयंत्युत्सव होतो. या उत्सवाला लोकमान्य टिळकानीं १८९३ सालीं सुरवात केली. प्रतापगड येथें श्री शिवरायांची कुलदेवता श्री भवानी हिचें देऊळ आहे. हा किल्ला शिवाजीमहाराजानीं आपले पंतप्रधान मोरोपंत पिंगळे यांच्या मार्फत बांधविला.

सुधागड तालुक्यांत सरसगड हा डोंगरी किल्ला आहे.

मुरुड तालुक्यांत जंजिरा व कासवेट हे दोन जंजिरे किल्ले आहेत. जंजिरा हा सिद्दी लोकांनी बांधला. मराठ्यानीं अनेक प्रयत्न केले, पण जंजिरा किल्ला त्यांना केंव्हांच काबीज करतां आला नाहीं.

कोर्लई हा डोंगरी किल्ला आहे.

श्रीवर्धन तालुक्यांत मदगड हल्लीं पडक्या स्थितींत आहे.

वर सांगितलेल्या किल्ल्यामध्यें रायगड, प्रतापगड, तळें घोसाळे, राजमाची, सरसगड या किल्ल्यानीं ऐतिहासिक काळीं फारच मोठी कामगिरी बजावली आहे. त्याच प्रमाणें चौल, रेवदंडा, महाड, चौक, शिवतरची घळ वगैरे ठिकाणानीं मोठी कामगिरी केली आहे.

जंजिऱ्या किल्ल्यापैकीं कुलाबा, खांदेरी, उंदेरी व जंजिरा या किल्ल्यानीं कुलाब्याच्या पश्चिम किनाऱ्यावरील, इंग्रज, डच, पोर्च्युगीज व सिद्दी यांच्या पाशी झालेल्या संघर्षांत १८व्या शतकाच्या पहिल्या ३० वर्षांत फार मोठी कामगिरी केली आहे.

या कामगिरीचेंच वर्णन आपल्याला या प्रकरणांत जागेची मर्यादा ध्यानांत ठेऊन करावयाचें आहे.

सह्याद्रींतील कोणत्याही किल्ल्याचें दर्शन किंवा स्मरण झालें कीं लगेच शिवरायाची मूर्ती मनासमोर उभी रहाते, आणि त्याच्या प्रतापांचा चित्रपट नजरेसमोर झळकूं लागतो, मग त्या किल्ल्याला शिवाजीचा पदस्पर्श झालेला असो किंवा नसो. वास्तु व मूर्ति यांचें हें साहचर्य अत्यंत निकट आहे .

शिवाजीचा जन्म शिवनेरीला झाला. शिवाजीच्या राजकीय महत्त्वाकांक्षा सह्याद्रीच्या मावळ भागांतच रुजल्या व फोफावल्याही. त्याच्या राजकीय

कर्तृत्वाचा प्रारंभ तोरण्यास झाला. मराठेशाहींत फक्त त्यानेंच अनेक गड व दुर्ग उभारले. जलदुर्ग हें तर त्याचें वैशिष्ट्य. पन्हाळ्यानंतर महाराष्ट्राची पहिली अस्सल डोंगरी राजधानी शिवाजीनेंच रायगड येथें स्थापन केली. शिवाजीला राज्याभिषेक रायगड़ावर झाला, शिवाजीच्या सिंहासनाची जागा रायगडावर आहे, त्यानें जें थोडेफार कौटुंबिक जीवन भोगलें तें येथेंच, आणि त्याचे देहावसानही रायगडावरच झालें, अर्थातच शिवाजीची समाधीही येथेंच आहे. स्वराज्यासाठीं जन्मभर वणवण करणाऱ्या शिवाजीला उभ्या आयुष्यांत जी थोडी बहुत विश्रांति मिळाली ती फक्त येथेंच.

शिवनेरीच्या शिवाईच्या कृपाप्रसादामुळें शिवाजी जन्माला आला. शिवाई, भवानी व पार्वती या एकच, गिरजा गिरिकन्या, गिरिवासिनी, महाराष्ट्रांतल्या निरनिराळ्या किल्ल्यावर भवानी वेगवेगळ्या नांवांनीं विराजत आहे. शंकर हा पुरुष आणि पार्वती ही प्रकृति. शिवाजीला भवानी प्रसन्न होती, आणि परशुरामही. परशुराम हा अपरान्ताचा स्वामी. अपरान्त हेंच आपलें राज्यक्षेत्र हें शिवाजी जाणून होता. राज्याभिषेकाच्यापूर्वी शिवाजीनें प्रथम चिपळुणास जाऊन परशुरामाचें दर्शन घेतलें, मग प्रतापगडावर जाऊन तुळजाभवानीचें दर्शन घेतलें, नंतर रायगडावर राज्याभिषेक समारंभ झाला. शंकराप्रमाणेंच भवानी व परशुराम यांची स्थानेंही सह्याद्रीच्या मुळक्यांवरच आहेत.

सिंहगड हा मावळाचा अधिपति व भोसल्यांच्या जहागिरीचा नैसर्गिक स्वामी. दादोजी कोंडदेवानें शिवाजीच्या नांवानें चढाई करून सिंहगड काबीज केला व भावी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोविली. हा किल्ला काबीज झाला न झाला तोंच शिवाजीनें तोरण्याच्या किल्लेदाराशीं संधान बांधून तोही हस्तगत केला. आणि स्वराज्याचें तोरण बांधलें.

सिंहगड व तोरणा यांचा कब्जा ही शिवाजीच्या आयुष्यांतील पहिली अलौकिक घटना.

मोऱ्यांच्या कब्जातील रायरीचा मजबूत किल्ला सर केल्यानंतर जावळीच्या आसमंतातील प्रदेशाच्या बंदोबस्तासाठीं घाटमाथ्याच्या पश्चिम कडेवर, पारघाटाच्या नाक्यावर मोक्याची जागा निवडून शिवाजीनें प्रतापगड उभारला. शिवाजीनें हा गड उभारण्याची आज्ञा दिली त्यावेळीं या परिसरांत लवकरच केवढी रणधुमाळी उडणार आहे व भवानीला केवढा मोठा बळी मिळणार आहे याची खुद्द शिवाजीला स्वप्नांतही कल्पना असली नसेल ! जंजिराच्या सिद्दीच्या ताब्यांतील तळें व घोसाळें हे किल्ले काबीज केल्यानंतर या प्रांताच्या बंदोबस्तासाठीं त्याच्या अंतर्भागांत शिवाजीनें बिरवाडीस किल्ला बांधला (१६५८) दापोली जवळ पालगड व मंडणगड आणि शृंगारपुराजवळ प्रचीतगड हे किल्ले या नंतर लवकर उभारण्यांत आले (१६६१). समुद्र किनाऱ्यावर शिवाजीनें विजयदुर्ग (१६५३), पद्मगड उर्फ कांसे (१६६१), सिंधुदुर्ग (१६६४), खांदेरी (१६७८), अलिबाग (१६७९), व उंदेरी (१६८०) हे जलदुर्ग बांधले. शिवाजीनें उभारलेल्या गडांची ही यादी पुरी नाहीं. तरी या तपशीलावरून अनेक निष्कर्ष काढतां येतात. कालमानानें पहातां असें दिसतें कीं हा त्याचा उद्योग आयुष्याच्या अखेरीपर्यंत चालू होता. सह्याद्रींत होते त्या मानानें फारसे किल्ले शिवाजीनें उभारले नाहींत, आणि जे उभारले ते मुख्यत्वेंकरून कोंकणांत व समुद्र किनाऱ्यालगत. वरील तपशीलावरून असें हीं दिसून येते कीं शिवाजीनें दुर्गनिर्मितीचा उद्योग मुख्यत्वेंकरून कोंकण पट्टींत केला. यावरून स्पष्ट होतें कीं दुर्गनिर्मितीच्या बाबतींत शिवाजीच्या दृष्टी-समोर कांहीं निश्चित योजना असली पाहिजे, आणि ती त्यानें तत्कालीन परिस्थितीच्या अनुरोधानें आंखलेली असली पाहिजे.

रायगड ही शिवरायाची अधिकृत राजधानी. शिवाजीनें आपल्या राजधानीसाठीं प्रथम राजगड उभारला. प्रतापगड हा शिवाजीचा आवडता गड तेथें त्यानें आपल्या कुलदेवतेची स्थापना केली यावरून तेथें स्थाइक होण्याचा त्याचा विचार होता असें वाटतें. पन्हाळा ही आदिलशाहीची पश्चिमेकडील

दुय्यम राजधानी. येथें ही राजधानी स्थापन करण्याचा विचार कांहीं काळपर्यंत त्याच्या मनांत घोळत होता. आयुष्याच्या उत्तरार्धांत हीं ठाणीं सोडून शिवाजीनें रायगडावरच राजधानी कां स्थापन केली ?

शहाजीची जहागीर भीमथडींत होती. आणि शिवाजीचें वास्तव्य पुण्यास होतें. यावेळीं स्वराज्याच्या कांहीं प्राथमिक योजना आंखून शिवाजीनें रायगड उभारला. शिवाजीच्या महत्वाकांक्षेचें क्षेत्र मर्यादित होतें तोवर राजधानी रायगडावर असावी हें युक्त होतें. कोंडाणा, तोरणा, कंगोरी व रोहिडा या गडांच्या चौकटींत असलेली ही राजधानी मावळाच्या सामन्ताच्या सोयीची होती. प्रबळ शत्रूनीं वेढलेल्या महाराष्ट्राच्या सम्राटाला साजेशी नव्हती. राजगड उत्तुंग (४६१४′) आहे. आणि रायगड (२८२९′) विस्तीर्ण (पूर्वपश्चिम लांबी दीड मैल व दक्षिणोत्तर रुंदी १ मैल) आहे. राजगड हा शिवाजीच्या महत्वाकांक्षेची उंची दर्शवितो आणि रायगड हा तिचा विस्तार दाखवितो. राजगड घाटामाथ्याच्या तोंडाशी रहदारीच्या खोऱ्याच्या कडेवर आहे आणि मैदानी आक्रमणाच्या आटोक्यांत आहे. प्रतापगडच्या पश्चिमेकडील व उत्तरेकडील बाजू म्हणजे प्रचण्ड कडेच आहेत; त्यामुळें आणि भोवतालच्या दुर्लंघ्य पर्वत श्रेणी व अगम्य जंगल यामुळें हा किल्ला अजिंक्य व अभेद्य समजला जात असे, सह्याद्रीच्या बालाघाट व महादेव या श्रेणींच्या नाक्यावर हा गड उभारलेला आहे. देशावरील आदिलशाही ठाण्यावर जरब ठेवण्याइतका तो पठाराच्या नजीक असला तरी तो मैदानी सत्तांच्या आक्रमणापासून सुरक्षित नाहीं हें शिवाजीला दिसून आल्यामुळें येथें स्थायिक होण्याचा विचार त्यानें रद्द केला असावा. पन्हाळ्याचा पुरातन गड दिसतो तेवढा मजबूत नाहीं हें ही शिवाजीच्या निदर्शनास आलें होतें. सभासद सांगतात. शहाजी व शिवाजी या उभयतांनीं दक्षिणेंतील डोंगर तपासले (१६६२) व रायरी हा " गड बहुत चखोट, चौतर्फा गडाचे तट तासल्या प्रमाणें, दीड गांव उंच पर्ज्यन्य काळीं कडियांवर गवत उगवत नाहीं, आणि धोंडा तासीव एकच आहे असें देखोन बहुत संतुष्ट

झाले आणि बोलले, तक्ता जागा गड हाच करावा.” डोंगरी हालचालींत तरबेज व गनिमी डावपेचांत पटाईत अशा या पितापुत्रांनीं भौगोलिक परिस्थिति लक्षांत घेऊन आणि राजकीय घटना जमेस धरून मोठ्या दूरदृष्टीनें राजधानीसाठीं रायगडाची निवड केली ती सर्वतोपरी यथा योग्य अशीच होती. रायगड मैदानीं आक्रमकांच्या टप्प्याच्या पलीकडे, सह्याद्रीच्या आडो-शाला, संचारशून्य देशांत, अगदीं एकाकी अशा पहाडावर उभारलेला आहे. गरुडाच्या घरट्यासारखा. गरुड आपलें घरटें पर्वताच्या सुळक्यावर अगम्य कपारींत बांधतो असें जाणते सांगतात. शिवनेरी जन्मलेल्या वैननेयानें आपल्या घरट्यासाठीं योग्य स्थानाची निवड केली यांत शंका नाहीं. रायगड हा सह्याद्रीच्या एका प्रचंड चौथऱ्यावर उभारलेला आहे. त्याचें यथार्थ दर्शन जवळून अगर आसपासच्या डोंगरांवरून होऊं शकत नाहीं. रायगडाचे अनेक बाजूंनी दर्शन घेऊन आलेले सांगतात कीं त्याच्या नैसर्गिक मांडणीची व मजबुतीची कल्पना फक्त तोरण्यावरून होऊं शकते शक्य आहे कीं शिवाजीनें तोरणा सर केला तेव्हांपासून त्याची रायरीवर नजर असेल. रायगडची मांडणी इतकी अजिंक्य व उभारणी इतकी भक्कम आहे कीं अनेक इंग्रजी लष्करी अधिकाऱ्यांनी राय-गडला ‘पूर्वेकडील जिब्राल्टर’ अशी संज्ञा दिली आहे. महाराष्ट्राचे जुने व नवे शत्रु आपल्या टप्प्यांत राहतील, पण आपण त्यांच्या आक्रमणापासून सुरक्षित राहूं, अशा ठिकाणीं, तत्कालीन स्वराज्याच्या मध्यभागीं, शिवाजीनें आपली राज-धानी प्रस्थापित केली. पोर्तुगीज व इंग्रज यांच्या संसर्गामुळें तत्कालीन संग्रामांत तोफांचा उपयोग मोठ्या प्रमाणावर होऊं लागला होता. रायगडच्या परिसांत मात्र अवजड तोफांच्या कार्यक्षम हालचाली जवळ जवळ अशक्य आहेत आणि रायगडच्या चौथऱ्यावर तत्कालीन तोफखान्यांच्या भडिमाराचा परिणाम होणे अशक्य प्राय होतें. भोवतालच्या किल्ल्यामुळें मिळणाऱ्या संरक्षणाच्या दृष्टीनें पाहिले असतां राजगड, प्रतापगड व पन्हाळा यापेक्षां रायगड अनेक पटींनीं मजबूत आहे. शिवाय सावित्री, कुंडलिका व अम्बा या नजिकच्या नद्या कांठावर बंदरें असलेल्या खाड्यांमार्फत पश्चिम समुद्राला मिळत असल्या-

मुळें दळणवळणाच्या दृष्टीनेंही रायगड ही राजधानी विशेष सोईस्कर होती. रायगड व त्याभोंवतालचा प्रदेश यांचें महत्व शिवाजी किती मानीत होता, हें पुरंदरच्या तहावरून ( १६६५ ) दिसून येतें. जयसिंहामार्फत औरंगजेबाशीं झालेल्या या तहनाम्याचे अन्वयें शिवाजीकडे रहावयाच्या बारा किल्ल्यांचा तपशील पहाः– राजगड, तोरणा, लिंगणगड, कुंवारी, भोरप (सुधागड), घोसाळें, तळें, रायरी, पालगड, महाडगड (महातगड), अलवारी (?) व उदयदुर्ग (?). शिवाजीनें आपल्याकडे ठेवून घेतलेल्या या किल्ल्यांच्या यादीवरून असें दिसतें कीं रायगडचा परिसर हा स्वराज्याचा गाभा आहे असेंच तो मानीत असला पाहिजे. अशा अनेक दृष्टींनीं रायगड ही राजधानी शत्रूंनीं वेढलेल्या स्वतंत्र महाराष्ट्राच्या राजाला सर्वतोपरी लायक अशी होती. १६६२ पासून शिवाजी रायगडावर राहूं लागला. तेव्हांपासून ही राजधानी त्याला चांगली लाभलीही. येथें स्थायिक झाल्यानंतर पूर्वी कधीं मिळाली नव्हती अशी लूट अल्प आयासानें त्याच्या हातीं येऊं लागली. आणि कधीं हटणार नाहींत असें शत्रू नामोहरम होऊं लागले शिवाय शिवाजीला येथें कौटुंबिक जीवन उपभोगावयास मिळालें आणि कधी मला असेंही वाटतें कीं घाट-माथ्यावर पूर्वीपासून स्थायिक झालेल्या मराठ्यांच्या अहंमन्य, स्वसंतुष्ट, स्वार्थी, फुटीर व फितूर वृत्तीला विटून त्यांच्यापासून सर्वस्वी अलिप्त असें हें ठिकाण असल्यामुळें शिवाजीनें राजधानीसाठीं रायगडची निवड केली असेल!

ज्ञात इतिहासाच्या आरंभापासून सुप्तावस्थेंत अगर निष्क्रिय असलेल्या या जमातीच्या शक्ति या महापुरुषाच्या नेतृत्वामुळें एकाएकी जागृत व कार्योद्युक्त झाल्या, अकस्मात सचेतन झालेल्या शक्तीचा प्रथम अविष्कार विध्वंसकच असतो. शिवाजी हा असाच महापुरुष होता. त्याचें माहात्म्य अलौकिक आहे अशी सह्याद्रींतील व विशेषतः घाटमाथ्यावरील रहिवाश्यांची भावना होती म्हणूनच त्याच्या नेतृत्वाला त्यांनीं मान्यता दिली व त्याच्या कार्यक्रमाशीं सहकार्य केलें. त्याच्या प्रेरणेमुळें सर्व मराठे, ब्राम्हण, क्षत्रिय, शूद्र

व मावळे व हेटकरी सचेतन झाले व त्याच्या नेतृत्वाखालीं संघटित झाले, म्हणून सर्व विजयी झाले. त्यांच्या वृत्तीला अनुकूल असें कार्यक्षेत्र शिवाजीनें त्यानां उपलब्ध करून दिलें. घरंदाज घराण्यांच्या नव्हे तर सामान्य जनतेच्या सहकार्यानें शिवाजीनें स्वराज्य प्रस्थापित केलें; त्याच्या नांवावर मराठ्यानीं स्वराज्याचें संरक्षण व संवर्धन केलें. यादवी हा महाराष्ट्राला शाप आहे. शिवाजीनें या शापांतून महाराष्ट्राला कांहीं काळपर्यंत मुक्त केलें, स्वातंत्र्योन्मुख केलें, स्वातंत्र्याप्रीत्यर्थ सर्वांचें सहकार्य संपादन केलें. सह्याद्रींतील किल्ले हीं ह्या सहकार्याचीं, महाराष्ट्राच्या विजिगीषू संभूयसमुत्थानाची प्रतीकें आहेत. शिवाजीनें महाराष्ट्राची उंची वाढविली, त्याचीं ही प्रतीकें आहेत, आणि हेंच त्यांचें माहात्म्य.

## मराठ्यांचें आरमार

सिदोजी उर्फ भिवजी गुजर हा मराठी आरमारावरील मुख्य अधिकारी. कान्होजी आंग्रे हा त्याचा दुय्यम; पण वृत्तीनें असा बेताल कीं कांहीं बेबनावां-वरून यानें सिदोजीला अटकेंत ठेवलें ! सिदोजीच्या मृत्यूनंतर मराठी आरमा-राचे आधिपत्य कान्होजीला देण्यांत आलें. सरखेलीवरील मंजुरीची त्याला फारशी मातबरी नव्हती, पूर्वी आणि पुढेही. यापूर्वीच तो आपलें आरमार स्वतंत्रपणें फिरवूं लागला होता. मध्यवर्ती सत्तेच्या आधाराच्या अभावीं त्यानें स्वपराक्रमानें समुद्रावरील प्रभुत्व संपादन केलें. हिंदुस्थानांतील लढवय्या जमातींमध्यें मराठे बेबंद आणि दर्यावर्दी मराठ्यामध्यें कान्होजी अग्रगण्य ! नजर ससाण्याची, झेंप गरुडाची, आणि पकड मगराची. घेरिया उर्फ विजयदुर्ग हें गरुडाचें घरटें. त्याच्या आधारावर यानें वाघोटण्याच्या खाडींत पहिला आरमारी कारखाना काढला. पुढें कुलाबा व सुवर्णदुर्ग येथेहीं असेच कारखाने काढले. राजा-रामाच्या कारकीर्दींत सरखेलीवर नेमणूक झाली, तेव्हांपासून आयुष्याच्या अखेरीपर्यंत या आरमाराच्या जोरावर सुरतेपासून त्रावणकोरपर्यंत दर्यावर्दी

उद्योग करणारानां कान्होजीचा दरारा जाणवला. शिवाजीनें खुष्कीवर सुरू केलेली चौथाईची पद्धत यानें दर्यावर सुरू केली. मराठी दर्यावर वावरणाऱ्या जहाजानीं आपला परवाना घेतला पाहिजे असा याचा कडक दण्डक होता. ही पद्धत त्यानें इंग्रज व पोर्तुगीज यांचेपासून घेतली होती. या नियमाचा भंग करणारी जहाजें बेलाशक लुटावींत अशी त्याची सारंगांना आज्ञा होती. ही पद्धत ज्यांनां जाचली ते याला चांचा म्हणत; शिवाजीला दरोडेखोर म्हणतात याच सुरांत. यावेळचे इंग्रजी दप्तरवर्दी कान्होजीचा उल्लेख शिवाजी याच नांवानें करीत. परराष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पत्रव्यवहारांत या दोघांइतका अपशब्दांचा वर्षाव दुसऱ्या कोणावरही करण्यांत आला नाहीं. स्वदेशी वीर व मुत्सद्दी यांच्या परराष्ट्रीय मूल्यावरूनच त्यांचें महत्व मापन करण्याची आधुनिक प्रथा किती फसवी व धोक्याची आहे हें यावरून चांगलें प्रत्ययास येतें.

मुंबई नजीकच्या खांदेरी बेटावरील किल्ल्यावरून कान्होजीच्या आरमाराच्या हालचाली शिस्तींत सुरू झाल्या तेव्हां इंग्रज बिचकले व सिद्दी हादरले. दिल्लीची सत्ता दुबळी झाल्यानें पश्चिम किनाऱ्यावरील मोंगली आरमाराची वाताहात झाली आणि सिद्दीचा आधार तुटला, पण त्यानें धीर सोडला नाहीं. पोर्तुगीजांचें समुद्रावरील प्रभुत्व नष्ट झाल्यामुळें पूर्वी काबीज केलेल्या जमीनीवर शक्य तोंवर पाय रोवून राहण्यापुरतेंच त्यांचें राजकारण मर्यादित राहिलें. बेबंदशाहीच्या काळांत इंग्रज मात्र चांगलेच बळावले होते. आंग्र्यांचें सामर्थ्य त्यांनाच विशेष डांचलें. मराठ्यांचें आरमारी सामर्थ्य नेस्तनाबूद केल्यावांचून त्यानां जिवंत राहणेंही अशक्य होतें. व्यापाराच्या सुरक्षिततेसाठीं परवान्याकरतां आंग्र्याना दरसाल पन्नास हजार पौंड खंडणी सारखे द्यावे लागत. या जाचांतून सुटण्याकरतां त्यानीं अनेक वेळां आंग्र्यांशीं झटापटी केल्या, त्यासाठीं त्यानीं कधीं पोर्तुगीजांची मदत घेतली तर कधीं सिद्दीची, पण प्रत्येकवेळीं त्यांना हार खावी लागली. कारण आंग्र्यांचें आरमार इंग्रजांहून प्रबळ व चपळ होतें, त्याचें नेतृत्व कसलेल्या दर्यासारंगाकडे होतें आणि मराठी आरमाराला देशा-

वरून रसद व कुमक मिळण्याची सोय होती. शिवाजीची गनिमी युद्धपद्धति कान्होजीनें समुद्रावर सुरू केली. कान्होजीच्या चपळ लढाऊ गलबतांनीं इंग्रजांची व्यापारी जहाजें लुटलीं, इंग्रजांची अवजड आरमारी गलबतें पकडलीं व पेटवून दिलीं, इंग्रज नाविकांच्या कत्तली केल्या आणि आपलें प्रभुत्व अबाधित राखलें; तरी इंग्रजांनीं प्रयत्न सोडला नाहीं. शेवटी आमच्या दुर्दैवानें आम्हींच त्यांच्या हातांत खेळलों आणि आपल्या हातानें आपल्या आरमारी सामर्थ्याला जलसमाधि दिली व अग्निसंस्कार केला !

## महाड

राजधानीला जातां येतां श्री शिवप्रभूंचे पवित्र चरण या भागाला लागल्यानें हा भाग फार पावन झाला आहे. शिवाजीचा उजवा हात, कोंडाण्याचा सिंह व महाराजांच्या गळ्यांतील ताईत ताना, हा येथला जवळचाच ! पुरंदरचा प्रसिद्ध किल्लेदार कीं ज्यानें स्वामीकार्याला आपला जीव वेचला तो मुरारराव देशपांडे आमचा शीवशेजारी ! आणि ज्यानें शत्रूशीं लढत असतां स्वामिकार्याकरतां आपल्या सर्वस्वावर पाणी सोडलें तो दादाजी रघुनाथ तर अगदीं महाडचाच. हे व असे शेंकडो वीर शिवकार्यांत विलीन होऊन आपल्या देशप्रेमाचा दुंदुभी दुमदुमवीत होते. त्याचा निनाद अद्यापिहि ऐकूं येत आहे महाडचे आजूबाजूचे कित्येक डोंगर, किल्ले व कडेकपारे मराठे वीरांची मर्दुमकी आजही म्लान वदनानें सांगत आहेत. अशा या काळांत महाडचें वैभव वाढलें असलें तर नवल काय ?

राजधानी होण्यापूर्वी महाराजांचें वास्तव्य येथें बहुत वेळां होई. इ. स. १६५१ सालीं बाजी शामराज याच्या अधिपत्याखालीं मोठी मोंगल सेना शिवाजी महाराजांस पकडण्याकरतां महाडावर चालून आली. परंतु महाराजांस या गोष्टीचा आगाऊच सुगावा लागून त्यांनीं वरील सरदारावर हल्ला करून त्याला पळवून लावलें. पुढें १६५६ सालीं कुलाबा जिल्ह्याच्या दक्षिण

सरहद्दीवर प्रतापगड हा किल्ला बांधल्यामुळें महाराजांस घाटावरून कोंकणांत येणाऱ्या रस्त्यावर चांगलें लक्ष ठेवतां येऊं लागलें. पुढें अफझुलखानाच्या वधानंतर महाराजांनीं आपल्या आराध्य दैवताचीच (तुळजापूरच्या भवानीची) या किल्ल्यावर स्थापना केल्यामुळें महाराजांचे पाय अनेकवार या भागाला लागूं लागले.

महाराजांच्या मृत्यूनंतर त्यांच्या बलाढ्य शत्रूनें जशी उचल केली, तसे जंजिऱ्याचे सिद्दीही हात पाय हालवूं लागले. त्यानें स्वतः इ. स. १६८२ सालीं महाडावर स्वारी केली; त्यावेळीं मराठ्यांचा सरदार दादाजी रघुनाथ याची व सिद्दीची येथील बंदरांत जोराची चकमक उडून दादाजी रघुनाथचा पराभव झाला. त्याची सर्व मंडळी बायकामुलांसुद्धां शत्रूच्या हातीं लागून अपार संपत्तीचा चुराडा उडाला. पुढें संभाजी महाराजांनीं या पराभवाची व नुकसानीची भरपाई घेतली असली तरी वरील हल्ला महाडला चांगलाच जाणवला हें सत्य आहे.

संभाजीच्या वधानंतर राजकारणाचे वारे देशावरच फार वाहूं लागले. त्यामुळें मध्यंतरीच्या कालांत या भागाला ऐतिहासिक महत्व तेवढें नाहीं. परंतु पुढें पेशवाईच्या काळांत या ठिकाणीं राजकारण चांगले रंगलें आहे तें असें:—

शिंद्यांचे कारभारी बाळोबा पागनीस यांचें व नाना फडणवीसांचें वितुष्ट आल्यानें नानास आपल्यावर संकट कोसळेल याची फार भीति वाटूं लागली. नानानें मेणवली सोडून टोक्यास कायमचें जाऊन रहावें व राज्यकारभारांत कांही एक ढवळाढवळ करूं नये असा शिंदे व परशुरामभाऊ पटवर्धन यांचे कडून सारखा लकडा लागलेला होता. राजकारणाचे अहर्निश डाव खेळणाऱ्या नानास ही गोष्ट कशी पसंत पडणार ? म्हणून त्यानें मेणवलीहून पळ काढला आणि जून १७९६ मध्यें महाड गांठलें.

१० जून १७९६ ते १० नव्हेंबर अखेर नानांचे वास्तव्य महाडास होतें. या अवधींत नानानें जी कारस्थानें लढविली त्यास मराठी इतिहासांत दुसरी तोड नाहीं. नानाचें सर्व आयुष्य जरी कारस्थानांत गेलें असलें तरी "महाडच्या कारस्थानास" त्याच्या आयुष्यांत पहिल्या प्रतीचें स्थान दिलें पाहिजे. राज्य हिताच्या दृष्टीनें या कारस्थानाचा किती उपयोग झाला हा विचार येथें करणें नलगे.

येथें राहून नानानें इंग्रज, टिपू, निजाम यांच्याशी खूप संधान बांधून पुण्यावर दडपण आणलें व बाळोबास कमजोर करून बाजीरावास एकदाची पेशवाई मिळवून दिली. या कारस्थानांत नानास बुद्धी व पैसा किती खर्च करावा लागला याची गणतीच नाहीं एथून इंग्रजांशीं झालेल्या १७९६ च्या तहाचा पुढें वसईच्या तहांत अंतर्भाव झालेला आहे. नानाची महाडची सर्व व्यवस्था नानाचे मेहुणे मोरोबादादा गद्रे यांनी उत्तम ठेविली होती हे त्यावेळीं रायगडचे कारभारी होते. येथील चवदार तळ्यावरील विष्णुमंदिर दादा गद्रे यांनींच बांधलें असें सांगतात.

नानाचें हे कारस्थान तडीस जाऊन बाजीराव पेशवा झाला व नाना मुख्य कारभारी बनला. बाजीरावाच्या संशयी व भेकड स्वभावामुळें त्याचे भोवतीं नेहमी शत्रूंचें जंजाळ उठत असे, त्यास भिऊन तो १८०२ सालीं परत पळाला तो महाडासच आला. आणि येथून त्यानें मुंबईकर इंग्रजांशीं संधान सुरू केलें. त्यावेळीं बाजीरावाजवळ ८००० फौज होती. त्यानें प्रथम रायगड गांठलें. तेथें आपल्या बायकोस ठेऊन तो पुढील उद्योगास लागला. आपणांस आपल्या लोकांनिशीं मुंबईस घेऊन जाण्याविषयीं त्यानें इंग्रजांस विनंति केली. मुंबईहून आपल्या सर्व परिवारासह बाजीरावास सुवर्णदुर्गाच्या आश्रयाला जावयाचें होतें. कारण यशवंतराव होळकर त्याच्या पाठलागावर होताच.

वरील विनंती प्रमाणें कोंकण प्रांताचा इंग्रजांचा सुभेदार ( गव्हनेर ) खंडेराव रास्ते हा वसईहून बाजीरावास येऊन मिळाला, आणि ही सर्व मंडळी सुवर्णदुर्गाकडे रवाना झाली. बाजीरावाच्या मूर्खपणामुळें इंग्रजांचे पाश त्याच्या गळ्याभोवतीं जास्तच लागत जाऊन तो पूर्ण गुरफटला गेला, अशावेळीं त्यानें बराच प्रयत्न करून पाहिला, परंतु तीं मरणापूर्वीची तडफड ठरून २४ एप्रिल १८१८ रोजीं ले. कर्नल प्रोथर यानें महाड कायमचें जिंकून घेतलें. अशा रीतीनें महाडचें ऐतिहासिक महत्व संपुष्टांत येऊन इंग्रजांच्या राजवटींत व्यापारी महत्त्व वाढूं लागलें.

## शिवतरची घळ

या घळीसंबंधानें श्री. शंकर श्रीकृष्ण देव म्हणतात :—

चौथी घळ शिवतरची. ही घळ तेहतीस वर्षांमागें मी पाहिली तेव्हां श्री. रामदासी मासिकांत तिचें वर्णन पृथ्वीवरील स्वर्ग म्हणूनच केलें होतें, इतकी ती मला सुखदायक वाटली त्यावेळीं मी भोरकडून हिरडोशी, माझिरी पारमाचीवरून शिवतर खोऱ्यांत उतरलों होतो. दुसरी जवळची वाट महाड-कडून बिरवाडी, वरंध पारमाचीवरून आहे. दुसऱ्या खेपेला मी त्या जवळच्याच वाटेनें गेलो होतों. शक १५७६ पासून १५९८ पर्यंत पुष्कळदां श्रीसमर्थांचें रहाणें या घळींत झालेलें आहे व त्यांच्या आणि शिवरायांच्या गांठी पडलेल्या आहेत.

चौफेर डोंगराचा घेर असून मध्यें कुंभेशिवतर आंब्रेशिवतर व कसबे-शिवतर अशी तीन लहान गांवें आहेत. कसबेशिवतरच्या पाठीमागील डोंगराचे रांगेतच श्रीसमर्थांची ती स्वर्गतुल्य घळ आहे ही घळ म्हणजे श्रीसमर्थकृत ग्रन्थराज दासबोधादि कित्येक ग्रंथांची जन्मभूमि होय. श्रीसम-र्थांच्या पश्चात्‌ही कैक वर्षे श्रीसमर्थप्रशिष्यांचे वास्तव्य ह्या घळींत होत असावें असें दिसतें. कारण श्रीसमर्थांचे उपाध्ये दिवाकर यांचे नातु दिवाकर

नांवाचे होते, त्यांनी या घळींत राहून शक १६६३ त ज्ञानदेव विरचित अनुभवाची केलेली प्रत श्रीसमर्थ वाग्देवतामंदिरांत बाडांक ३३९ म्हणून पहावयास मिळते. परंतु नंतर तेव्हांपासून आतांपर्यंत या घळीची सर्वच ऐतिहासिक स्थळांप्रमाणें महाराष्ट्रानें उपेक्षा केल्यामुळें घळींत पुष्कळच पडझड झालेली आहे.

घळ सुमारें सवाशें फूट लांब व पाऊणशें फूट रुंद आहे. भिंतींच्या अवशिष्ट भागावरून असें दिसतें कीं त्या काळीं घळींत १०,१२ निरनिराळीं दालनें पाडलेलीं असावींत. घळींत देवतार्चन ठेवण्याची जागा कोणती असावी श्रीसमर्थ कोठें बसत असावेत, इतर शिष्यमंडळीकडे कोणतीं दालनें असावींत, याची मी नुसती कल्पना करीत गेलों. दुसरें काय करणार ? आपणांस आतां कोण सांगणार ? घळींत चर्मचक्षूला श्रीसमर्थ कोठें दिसले नाहींत, पण अंतर्दृष्टीला मात्र त्यांचें सारें चरित्र या ठिकाणीं कोणालाही दिसल्यावांचून रहाणार नाहीं.

घळीपासून सुमारें फर्लांगावर याच डोंगरांत वरच्या बाजूस चंद्रराव मोरे यांचा वाडा आहे. वाडा आतां अर्थात नाहीं, पण त्याच्या पायाच्या खुणा मात्र आहेत, आजही कसबे शिवतरमध्यें मोऱ्यांचीच वस्ती आहे. चंद्रराव मोरे हें त्याकाळीं मोठें प्रस्थ होतें. तो एक पुंड राजा होता. तो नांवालाच विजापूरकरांचा अंकित होता. जावळीपासून शिवतरपर्यंतचा मुलुख चंद्ररावाच्या हुकमतीखाली होता. तत्कालीन राजकारणांत शिवतरचें महत्व फार होतें, ज्यांच्या ताब्यांत शिवतरचें खोरें तो कोंकणपट्टीचा मालक होय असें त्या खोऱ्याचें भौगोलिक महत्व होतें. मला आतां नवल वाटत नाहीं, पण प्रथम शिवतरला गेलों तेव्हां वाटे, अशा या अवघड खोऱ्यांत श्रीसमर्थ कां बरें मधून मधून येऊन रहात ? १५७६ ते १५८६ लेखनाचा संकल्प करून ते या खोऱ्यांत येऊन राहिले असे एका अप्रकाशित पत्रांत म्हटलें आहे, तें लेखन चाफळास करतां आलें नसतें का ?

कोंकणपट्टी ताब्यांत घ्यावयाची तर शिवतर खोरें ताब्यांत आलें पाहिजे. तें खोरें ताब्यांत घ्यावयाचें तर चंद्रराव मोऱ्याला अनुकूल करून घेतलें पाहिजे होतें. एक तर त्याला आपलासा तरी केला पाहिजे होता, किंवा त्याचा कांटाच उपटून टाकला पाहिजे होता.

भिक्षामिसें लहान थोरें । परीक्षून सोडावीं ॥

या प्रमाणें चंद्ररावाची परीक्षा करण्यासाठीं व त्याला अनुकूल करून घेण्याच्या हेतूनें श्री समर्थ या खोऱ्यांत जाऊन राहिले असतील का ? ह्या आपल्या प्रतिपादनास आधार म्हणून कोणा विरोधकानें विचारल्यास त्याला काय सांगावें ? त्यास एवढेंच सांगतां येईल, बाबारे, परिस्थिति पाहून तुला जें अनुमान सुचेल, तेंच खरें मान ! राजकीय दृष्टीनें खोऱ्याचें भौगोलिक महत्व विचारांत घे, आणि आपल्याच मनाला विचार, अशा त्या खोऱ्यांत चंद्रराव मोऱ्याच्या वाड्याशेजारीं एका घळींत १५७६त श्रीसमर्थ जाऊन राहतात ते उगीचच असेल काय ? चंद्रराव मोरे बधत नाहीं अशी परीक्षा झाल्यावरच १५७८त श्रीशिवाजीराजे यांनी त्याचा कांटा उपटून टाकला आणि खोऱ्यावर आपला अंमल बसविला.

इतर सर्व घळींपेक्षां या घळींत श्री समर्थांचें राहाणें फार होई. ही घळ म्हणजे चाफळच्या मठाखालोखाल श्री समर्थांचा मठच बनली होती. तिला "सुंदर मठ" असें नामाभिधान प्राप्त झालें होतें इतकें तें स्थान सुंदर आहे.

## श्रीसमर्थ रामदास व श्रीशिवाजी महाराज

या दोन्हीही महापुरुषांचें वास्तव्य या जिल्ह्यांत झाल्या कारणानें त्यांच्या परस्पर संबधानिमित्त या पुस्तकांत उल्लेख करणें क्रमप्राप्त आहे. रामदासानीं शिवाजीला राजकारणांत मदत केली किंवा नाहीं ! त्यांची व शिवाजीची भेट कधीं झाली ? या वादग्रस्त विषयांत न शिरतां या बाबतींत निःपक्षपाती दृष्टीनें प्रा. न. र. फाटक काय म्हणतात ते त्यांच्याच शब्दांत सांगूं. ते म्हणतात :—

‘ शिवाजी महाराजांनीं स्वतंत्र राज्यासाठीं पराक्रम आरंभिल्यावर त्याना सत्पुरुषांच्या आशीर्वादाची आवश्यकता भासावी, त्यांची तपश्चर्या व पुण्याई आपल्या कार्यास उपयोगी पडावी असें वाटावें हें स्वाभाविक आहे. मागें जी उदाहरणें सादर केलीं ती सर्व या स्वाभाविक वृत्तीचीं द्योतक आहेत. समर्थांच्या भेटीचा प्रकार या उदाहरणांतला ठरणारा आहे. फरक इतकाच कीं समर्थांच्या चारित्र्याचा व कर्तृत्वाचा परिणाम महाराजांच्या मनावर इतरांच्या मानानें अधिक झाला, असें उपलब्ध कागदपत्रांच्या आधारें म्हणतां येतें.’

‘इ. स. १६४४ सालीं कृष्णातीरीं आल्यापासून समर्थांनीं आपलें जीवित ज्या कार्यास वाहिलें, त्याची माहिती येथवर सादर केली. इ. स. १६७२ मध्यें शिवाजी महाराजांनीं शिष्यत्व पत्करल्यावर समर्थांना एक तऱ्हेची कृतार्थता वाटली असणें स्वाभाविक आहे. शिवाजी राजांच्या शिष्यत्वानें समर्थांच्या कामगिरीचें वैभव वाढलें आणि त्यांची देवस्थान विषयक जबाबदारी हलकी झाली. शके १५९८ ( इ. स. १६७५ ) मध्यें समर्थांनीं महाराजांच्या ताब्यांतील एका किल्ल्यावर रहाण्याची इच्छा केली, अर्थात तिच्या मागें महाराजांच्या विनंतीची प्रेरणा होती हें निराळें सांगावयास नको. त्या वर्षाच्या श्रावणांतील दोन पत्रें श्रीसंप्रदायाचीं कागदपत्रें ( ले. १५ व १६ ) या पुस्तकांत प्रसिद्ध झालीं असून त्या पत्रांतून “ श्री गोसावी शिवतरी रहातात सांप्रत कांहीं दिवस गडावरी राहावया किलेयास येतील त्यांस तुम्ही गडावरी घेणें जागा बरा करून देणें ” असा मजकूर असून तीं पत्रें माहिपतगड व सज्जनगड या दोन किल्ल्यांच्या अधिकाऱ्यांना महाराजांना लिहिलेलीं आहेत. यावरून कोणत्या किल्ल्यावर वस्ती करावयाची याबद्दल प्रथम समर्थांचा निश्चय नव्हता असें दिसतें. नंतर त्यांनीं सज्जनगड पसंत केला व तेथें ते राहूं लागले. ”

## चौक व नेताजी पालकर

कुलाबा जिल्ह्याचा इतिहास लक्ष्यांत घेतां तानाजी मालुसरे व नेताजी पालकर यांचा उल्लेख आलाच पाहिजे. तानाजी मालुसऱ्यांच्या रोमांचकारी पराक्रमांची कल्पना येण्यास हरी नारायण आपटे यांची "गड आला पण सिंह गेला" ही कादंबरी वाचणें जरूर आहे त्याचप्रमाणें नेताजी पालकराच्या पराक्रमांची बरोबर कल्पना येण्याकरितां "इन वाइल्ड मराठा बॅटल" ही मायकेल मॅकमिलन यांची कादंबरी वाचणें हिताचें होईल. राजमाचीच्या किल्ल्याचे विजापूरकरांच्या हल्ल्यापासून रक्षण करणें, कल्याण सुभा ताब्यांत घेणे, बाजी शामराजच्या हल्ल्यापासून शिवाजीचें रक्षण करणें, अफझुलखानाच्या वधानंतर विजापूरच्या सैन्याचा फडशा पाडणें, वगैरे कामांत त्यांनीं शिवाजीला बहुमोल मदत केली, १६५७ मध्यें शिवाजीनें त्याची सरनोबत म्हणून नेमणूक केली. न्यायमूर्ती रानडे आपल्या 'राइज ऑफ दि मराठा पावर' पुस्तकांत म्हणतात "नेताजी पालकर हा शिवाजीच्या सैन्यांत अत्यंत धडाडीचा होता, येथें, तेथें, सर्वत्र जेथें जेथें संकटाला तोंड द्यावयाचें असेल तेथें तो हजर असे"

## ब्रह्मेंद्र स्वामी धावडशीकर

१८ व्या शतकाच्या सुरवातीला ब्रह्मेंद्रस्वामी धावडशीकर म्हणून कोंकणप्रांतीं एक साधुवृत्तीचे राजकारणी पुरुष प्रसिद्धीस आले होते. कान्होजी आंग्रे व आंग्रे घराण्यांतील राजपत्न्या मथुराबाई, लक्ष्मीबाई, राजपुत्र सेखोजी, संभाजी, मानाजी व तुळाजी यानां गुरु म्हणून मान देत. ब्रह्मेंद्रस्वामींचा व आंग्र्यांचा निकटचा संबंध आंग्रे घराण्याशीं कान्होजीच्या वेळेपासून सुरू झाला तो अव्याहतपणें ब्रह्मेंद्रस्वामींच्या अंतापर्यंत तसाच टिकला. ब्रह्मेंद्र-स्वामींचा कान्होजी, मथुराबाई, सेखोजी, संभाजी, मानाजी व तुळाजी यानां लिहिलेला तसेंच आंग्र्यांनीं स्वामींनां लिहिलेला पुष्कळ पत्रव्यवहार उपलब्ध

आहे. त्याचें बारकाईनें निरीक्षण केल्यास स्वामींच्या कृपाप्रसादानें आंग्र्यांना राजलक्ष्मी प्राप्त झाली. वेळोवेळीं स्वामींनीं आंग्र्यांना पैशाची मदत केली. तें कर्ज आंग्र्यावर पुष्कळच वाढलें. स्वामींनीं कर्जाची मागणी वारंवार जो कोणी आंग्रे पुरुष देण्यासारखा असेल त्याचेजवळ केली. त्यासाठीं आंग्र्यांची तीव्र व कडक शद्बांत स्वामींनीं निर्भर्त्सना केली. परंतु आंग्रे राजपुरुषांनीं स्वामींच्या या साधुवृत्तीला न शोभणाऱ्या शद्बांचा स्पष्ट शद्बांत निषेध केला असतांही गुरुभक्तीच्या शालीनतेच्या वृत्तीनें स्वामींचें आंग्रे दौलतीवरील कर्ज मान्य केलें. देतही गेले. स्वामींकडून कर्जाचे तगादे आले असतां अगणित कर्जफेड झाली बहुधा कांहीं शिल्लक राहिलें नाहीं.

ब्रह्मेंद्र स्वामीचें त्रोटक जीवन-वृत्त-स्वामींचें जन्मगांव वऱ्हाडांत श्री. गणपतीचे राजुरीनजीक दुधेवाडी; नांव विष्णु, बापाचें नांव भट्ट, आईचें नांव उमाबाई, देशस्थ घराणें. स्वामींचा जन्म शके १५७० ( इ. स. १६४९ ) पहिलीं आठ वर्षें पितृ-गृहीं राहिले. नंतर बारा वर्षें राजुरीस गणपती देवस्थाना-जवळ स्वामींनीं जप केला. त्या नंतर एकतप स्वामींनीं उत्तर दक्षिण मानस यात्रा करण्यांत घालवलें. पुढें चिपळूण प्रांतीं धामणी सोनगांवच्या डोंगरांत बारा वर्षें पर्यंत स्वामी गुप्त स्थितींत राहिले. इ. स. १६९८ म्हणजे आपल्या वयाच्या ४८ व्या वर्षी स्वामी प्रकट झाले ते इ. स. १७४५ च्या जुलैंत धावडसी येथें समाधिस्थ झाले या काळांत स्वामींनीं अगणित द्रव्य मिळविलें व राजकारणार्थ आपल्या अनेक शिष्यांना तें कर्जाऊ देऊन टाकलें. स्वामींच्या शिष्यांत जंजीरकर सिद्दी याकुत हाहि एक होता. मुंबईकर इंग्रज स्वामी संबंधें एक मोठा योगी असा उल्लेख करतात.

## श्री शिवराज्याभिषेकोत्सव ( शके १५९६ )

भोसले हे अस्सल क्षत्रिय होते या विषयीं भरपूर पुरावा पुढें आला आहे. मराठ्यांतच जे कोणी संशयखोर होते त्यांच्या समाधानासाठीं गागाभट्टानीं कांहीं खटपट केली. शहाजीराजे एका पत्रांत ‘ आपण रजपूत लोक ’ असें

म्हणतात, व त्या वेळच्या इंग्रजी पत्रांतही "मोठा रजपूत शिवाजी पन्हाळा घेतला" ( १६५९ ), असे उल्लेख आहेत. साधुसंतांच्या पुण्याईचें, समर्थांच्या कामगिरीचें, शिवाजीराजे यांच्या सुपुण्यपराक्रमाचें व सर्व महाराष्ट्र समाजाच्या सद्भावनेचें दिव्य फळ म्हणजे शिवरायाच्या राज्यभिषेकाचा रायगडावर झालेला महोत्सव होय. राज्याभिषेकोत्सव शनिवार शके १५९६ च्या जेष्ठ शु॥ १३ स झाला. त्याची उत्साह भरित वर्णनें बखरींतून केलेली आढळतात राज्याभिषेकोत्सव प्रसंगीं 'निदान २० हजार ब्राह्मण व शिवाजीचे अमलदार हजर होते' असें सुरतकर इंग्रजांनीं त्यावेळीं लिहून ठेविलें आहे ! पण त्यांना समुदायाचा नीट अंदाज झाला नाहीं. शिवराज्याभिषेकोत्सव हा महाराष्ट्राच्या भाग्याचा व पराक्रमाचा उत्कर्ष होय. पूर्वींचे कित्येक दिवस नानाप्रकारचे धार्मिक विधि करण्यांत गेले. ब्राह्मण समुदाय स्त्रीपुरुषांसकट ५० हजारांवर होता. या शिवाय पाहुणे, आप्त, कारभारी व अंमलदार, परराज्यांचे वकील, व्यापारी, प्रवासी, फौजेंतले प्रमुख लोक मिळून ५० हजार तरी सहज होते. एक लक्ष माणसांस पंचपक्वान्नांचें सुग्रास भोजन महिनाभर देण्याची चोख व्यवस्था ठेविली होती. देवतांची पूजा झाली. "रामवरदायिनी" माता प्रतापगडची भवानी ही शिवबाची कुलस्वामिनी. तिची पूजा करून तिला दीडमण वजनाची सुवर्णाची छत्री अर्पण करण्यांत आली. प्रायश्चित्त विधि झाले. शिवबाची मुंज झाली. सप्त धातु व सप्त धान्यें यांची तुला करून एक लक्ष होन ब्राह्मणांस दक्षिणा वाटण्यांत आली. शिवबानीं शुक्रवारी गंगास्नान व उपोषण केलें. गोब्राह्मणप्रतिपालक, चातुर्वर्ण्यरक्षक, शत्रुसंहारक, प्रजापालक, मातृभक्त गुरुभक्त, संतचरणासक्त अशा महापराक्रमी हिंदुराजाचा राज्याभिषेकोत्सव अत्यंत उल्हासांत झाला. कित्येक शतकांत असा सोन्याचा दिवस एखादाच येतो. शिवरायाचा हा राज्याभिषेकोत्सव म्हणजे सर्व कार्यकर्त्या वीर मुत्सद्यांच्या पराक्रमाचा गौरव होता. शनिवारीं पहाटेपासून सारा गड आनंदी उल्हासानें नाचत होता. मुख्य दालन उत्तम प्रकारें शृंगारलें होतें. स्वस्तिकें व शुभवृक्ष व पशुपक्षी यांची भिंतीवर चित्रें काढलीं होतीं. सिंहासन ३२ मण सोन्याचें

करविलें होतें. तें रत्नजडित होतें. नवरत्नें सिंहासनास जडाव केलीं होतीं. छत्रही जडावाचें मोतिलग झालरीचें करून मस्तकावर धरलें होतें. मुख्य दरवाज्याजवळ उदक कुंभ ठेवलेले असून गोपुराजवळ दोन हत्ती व सजविलेले अश्व ठेवले होते. हत्ती व घोडे बिकट वाटेनें गडावर कसे नेले असतील याचें इंग्रज प्रेक्षकांस नवल वाटलें ! शिवाजी महाराज सिंहासनारूढ होतांच त्यांजवर सुवर्ण पुष्पांची व रत्नांची वृष्टि झाली. नंतर १६ ब्राह्मण सुवासिनींनीं पंचारती ओवाळली. ब्राह्मणांचे वेदघोष सुरू झाले, त्यानीं आशीर्वाद दिले. गागाभट्टानीं भरजरीचा राजमुकुट स्वहस्तें शिवरायाच्या मस्तकावर ठेवला व "शिवछत्रपती की जय" असा घोष केला जयजयकाराच्या नादांनीं सारा गड दुमदुमून गेला. शिवरायानीं २४ हजार होनांची दक्षिणा ब्राह्मणांस वाटली. सात हजार होन गागाभट्टांस दिले. षोडष महादानें केली. अष्ट प्रधानांस प्रत्येकीं लक्ष, लक्ष होन, हत्ती घोडे व वस्त्रालंकार दिले. युवराज संभाजी, राजपुरोहित गागाभट्ट व मुख्य प्रधान मोरोपंत पिंगळे हे तिघे सिंहासनाच्या किंचित् खालच्या जागीं बसले होते. बाकीचे सात प्रधान सिंहासनाच्या दोन बाजूस उभे होते. दरबारी मंडळी व पाहुणे आपापल्या योग्यतेप्रमाणें उभे होते. हा सर्व समारंभ सकाळीं ८ वाजतां पूर्ण झाला. नंतर स्वारींची मोठी मिरवणूक हत्तीवरून निघाली. पायदळ, अश्वदळ, तोफखाना, नाना वाद्यें यांची गर्दी होती. आपल्या पराक्रमी व धर्मशील पुत्राचा तो भाग्योत्कर्ष पाहून राजमाता जिजाबाई यानां किती आनंद झाला असेल याची कल्पनाच करावी ! जिजाबाईनें परमसमाधानानें १२ च दिवसानीं देह ठेवला. त्यांचा अंत्यविधीहि मोठ्या समारंभानें झाला. राज्याभिषेकाचा एकंदर खर्च १ कोटी ४२ लक्ष होन झाला. महिन्याभरानें शिवाजी महाराज समर्थांच्या भेटीस गेले व तेथें महिनाभर राहिले. शिवरायाची कीर्ति सर्व हिंदुस्थानभर झाली. आसामांतल्या हिंदूनांही त्याचा अभिमान वाटत असल्याचे उल्लेख आहेत. भूखन कवीनें शिवबावन्नींत आपल्या वीररसप्रचुर वार्णानें शिवरायाचा गौरव केलेला प्रसिद्ध आहे हा समारंभ या जिल्ह्यांत झाला.

प्रकरण ६ वें ★ ★

# जिल्ह्यांतील मोठमोठीं गांवें

**अलिबाग** [ लोकसंख्या ८१८१ ] जिल्ह्याचें ठिकाण. येथें डिस्ट्रिक्ट कोर्ट, डिस्ट्रिक्ट सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस यांची कचेरी, जिल्ह्याच्या एज्युकेशनल इन्स्पेक्टरची कचेरी, सरकारी दवाखाना, हॉस्पिटल, वेधशाळा व तालुक्याच्या ठिकाणी असणाऱ्या सर्व कचेऱ्या आहेत फक्त जिल्हा लोकलबोर्ड व स्कूलबोर्ड यांच्या कचेऱ्या पेणेस आहेत गावांत कोंकण एज्युकेशन सोसायटीनें चालविलेले 'टोपीवाला इंडस्ट्रियल हायस्कूल', व मुलींचें 'हळदणकर हायस्कूल' हीं दोन हायस्कुलें आहेत याच सोसायटीनें चालविलेली आणखी एक इंग्रजी शाळा पोयनाड येथें आहे. अलिबागेंत स्वतंत्र मुलामुलींच्या मराठी शाळा आहेत अलिबागेंत 'राष्ट्रतेज' नांवाचें एक साप्ताहिक निघतें. अलिबागची म्युनिसिपालिटी फार जुनी आहे. गांवांत तार ऑफिस व पोस्ट ऑफिस आहेत. डोंगरे वाचनालय, वक्तृत्वोत्तेजक सभा वगैरे सार्वजनिक संस्था आहेत. वकील, डॉक्टर, श्रीमंत व्यापारी वगैरेनीं गांव गजबलेला आहे.

**नांगाव**-प्रसिद्ध गणित शास्त्रज्ञ केरो लक्ष्मण छत्रे, व बीजगणित पुस्तकाचे लेखक श्री आठवले यांचें मूळ गांव. ब्राम्हणवस्तीचा मोठा भरणा असलेला हा गांव असून संस्कृत व वेदविद्या यांचें पीठच होता. देशावरील वाईला जें महत्व तें कोंकणांत या गांवाला आहे.

या तालुक्यांत समुद्र कांठाला '**अष्टागर**' हें नांव खालील गांवामुळें प्राप्त झालें आहे :— किहिम आवास, थळ अलिबाग, आक्षी नांगाव, व चौल रेवदंडा. धोकवडें येथें आवास—सासवनें—धोकवडे एज्युकेशन सोसायटीनें चालविलेलें एक हायस्कूल आहे. अलिकडे कांहीं वर्षें सरकारनें सासवनें येथें स्त्रियांचे एक ट्रेनिंग कॉलेज चालविलें आहे. सासवनें हें प्रसिद्ध

कलाकार व मूर्तिकार श्री. करमरकर यांचे गांव. आवास हे कुलाब्याचे भीष्म पितामह श्री. रामजी लक्ष्मण घरत यांचें मूळ ठिकाण. नागांव येथें तेथील ग्रामस्थांनीं चालविलेलें एक हायस्कूल आहे. रेवदंडा येथें कोंकण एज्युकेशन सोसायटीनें चालविलेलें रा. सा. तेंडुलकर हायस्कूल आहे. ऐतिहासिक कालीं चौल व रेवदंडा हीं प्रसिद्ध गांवें होतीं. लवकरच हा तालुका जिल्ह्याच्या इतर भागाशीं धरमतरच्या पुलानें जोडला जाणार आहे.

**पेण** ( लोकसंख्या ८६०७ ) या तालुक्यांत पेण हें एकच गांव नांव घेण्यासारखें आहे हें गांव व्यापाराची एक उतार पेठ आहे. अंतोरे व धरमतर या बंदरांतून मोठा व्यापार चालतो. हें जिल्ह्याचे मध्यवर्ति ठिकाण असून याला "कोंकणचें पुणें" म्हणतात. येथून मिठाची निर्यात होते. जिल्ह्या लोकल व स्कूलबोर्ड या दोन्ही संस्थांच्या कचेऱ्या येथें आहेत. येथें "**कुलाबा समाचार**" हें कुलाबा जिल्ह्यांतील फार जुनें साप्ताहिक वर्तमानपत्र निघतें. पेण एज्युकेशन सोसायटीनें चालविलेलें पेण प्रायव्हेट हायस्कूल येथें आहे. गावांत पोस्ट ऑफिस, तार ऑफिस, दवाखाना, मामलेदार कचेरी वगैरे तालुक्याच्या ठिकाणीं असणाऱ्या सर्व कचेऱ्या आहेत. गावांत म्युनिसिपालिटी आहे. गावांत पाण्याच्या नळाची सोय आहे. आलिबागप्रमाणें येथेही सुशिक्षित मंडळीचा भरणा मोठा आहे. जुनी घरंदाज घराणीं अलिबागपेक्षां येथें अधिक आहेत. श्री. ठाकूर या नांवाचे गृहस्थ विलायतेला जाऊन पहिले आय. सी. एस. झाले असें म्हणतात. येथें लांकडाचे कांतकाम, रंगीत काम व लाकडाच्या भुशापासून खेळणी करण्याचें काम चांगलें होतें. वरसई-भारताचार्य चिं. वि. वैद्य यांचें मूळगांव

**पनवेल**—तालुक्याचें ठिकाण लोकसंख्या १४,८६१. लोकसंख्येच्या दृष्टीनें जिल्ह्यांत या गांवाचा नंबर पहिला लागतो. मुंबई नजीक, व दळणवळणाचीं साधनें सुलभ यामुळें या शहराचा मुंबईशी व्यापार फार मोठ्या प्रमाणावर चालतो. येथें तार ऑफिस, पोष्ट ऑफिस असून विजेचाही प्रसार झाला

आहे हें तालुक्याचें ठिकाण असल्यामुळें तालुक्याच्या सर्व कचेऱ्या येथें आहेत. गांवात १५, २० व तळोजें येथें ५, ७ भाताच्या गिरण्या आहेत. कोंकण एज्युकेशन सोसायटी 'शेट विठोबा खंडप्पा' व 'केशवजी वीरजी कन्याशाळा' ही हायस्कूलें आज कित्येक वर्षे येथें चालवीत आहे. शिवाय सरकारनें येथें अलिकडे पुरुषांकरितां प्रायमरी ट्रेनिंग कॉलेज काढलें आहे. ट्रेनिंग कॉलेजची नवीन इमारत बघण्यासारखी आहे. श्रीधूतपापेश्वर औषधीकारखाना व रुग्णालय याही संस्था पहाण्यासारख्या आहेत. अलिबाग, पेणप्रमाणें येथेंही म्युनिसिपालिटी आहे. येथें स्टेट ट्रान्सपोर्टचा फार मोठा डेपो आहे. पनवेलीस बल्लाळेश्वर, विरूपाक्ष, कृष्णेश्वर, खान्देश्वर ही देवालयें व कृष्णाळें व वडाळा हे तलाव प्रसिद्ध आहेत. श्री. गोविंदराव बापट यांच्या पूर्वजांनीं बल्लाळेश्वराचे व कृष्णेश्वराचें व विरूपाक्षाचें देऊळ ही देवळें व वडाळयाचा तलाव बांधला. श्री. त्रिंबक रामचंद्र दोंदे, मामलेदार यानीं १८९२ सालीं स्वखर्चानें कृष्णाळें तलावाला चारी बाजूनीं चिरेबंदी बांध बांधले.

श्रीविरूपाक्षाचें देऊळ १८७५ सालच्या सुमारास बांधलें असावें. देवळालागूनच समोर एक विशाल पिंपळाचा वृक्ष आणि त्याचा दगडी चौथरा होता. देवळाला जोडून सभामंडप बांधावा तर जवळच पिंपळाचा पार आणि त्या पिंपळावर जागतीज्योत मुंजोबा. पिंपळ तोडण्याकरतां त्याच्यावर पहिली कुऱ्हाड घालणाऱ्याचा निर्वंश होईल हा लोकवाद. सन १८८४ सालपर्यंत पहिली कुऱ्हाड घालण्यास कोणी तयार होईना. सरतेशेवटीं भाऊभट जोशीनें पहिला कुऱ्हाडीचा घाव घातला, पिंपळ तुटला, व पुढील कामास सुरवात झाली. खालील मजकुराची शिला देवळाच्या दरवाज्याच्या माथ्यावर आजही टिकून आहे. "पनवेल येथील श्रीविरूपाक्ष महादेवाचे देवालयाचा जीर्णोद्धार व चिरेबंदी जोत्यासह सभामंडपाचें नवीन काम विठोबा खंडप्पा गुळवे यानीं आपल्या मातुश्री आऊबाई व मावशी अंबाबाई यांचें स्मारक म्हणून शके १८०६ आश्विन शुद्ध दशमी सोमवार तारीख २९ माहे सप्टेंबर १८८४ इसवी या दिवशीं पुरें केलें.

**खांदेश्वर**–मुंब्रा पनवेल रस्त्यावर पनवेलच्या अलिकडे २ मैल खांदे नांवाचें २०,२५ झोपड्यांचें गांव आहे. या ठिकाणीं सहज खणत असतां वामनराव जिवाजी पत्की यांस साळुंकेसकट शंकराची पिंडी आढळली. वामनरावजी पत्की वकील यानीं आपल्या एका श्रीमंत गुजराथी अशिलामार्फत या ठिकाणीं खांदेश्वराचें देऊळ बांधून घेतलें. सध्यां वामनरावजींचे पणतू श्री. मधुसूदन शंकरराव पत्की बी. ए., एलएल. बी., वकील खांदेश्वराच्या वार्षिक यात्रेची व दैनिक पूजाअर्चेची व्यवस्था पहातात.

**पनवेल**–मऱ्हाठेशाहीच्या काळांत मुंबईकर व साष्टीकर इंग्रज पोर्तुगीजांच्या नाकेबंदीचें घाटपायथ्याचें जबरदस्त ठाणें होतें. सरकारवाड्यानजीक दांडेकरांचें घर आहे. येथें शिवकाळीं टांकसाळ होती. ही टांकसाळ काशी सोनार चालवीत असे. ब्राम्हणआळींत वैशंपायन वकिलांच्या घरासमोर नाना फडणिसांची पत्नी जिऊबाईसाहेबांचा चौसोपी वाडा होता. याच ठिकाणीं बाईसाहेबांची आणि ड्यूक ऑफ वेलिंग्टनची ऐतिहासिक मुलाखत झाली होती. सध्यां तेथें धूतपापेश्वरचें हॉस्पिटल आहे.

या खेरीज खालील पनवेलचीं वैशिष्ट्यें ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत.

१ पनवेलचा पूर्वी युरोपशी व्यापार चालू होता.

२ पनवेलीस पाण्याच्या नळांची सोय आहे.

३ पनवेलला अलिकडे टेलिफोनची सोय झाली आहे.

४ पनवेलला उत्तम चाकजोड पूर्वी होत होते व हल्लींही होतात.

५ क्रॉफर्डच्या कारकीर्दीत पनवेल मुंबईला विटा पुरवीत असे.

६ पनवेलनें आतांपर्यंत व्यायाम क्षेत्रांत फार मोठी कामगिरी बजावली आहे व ती पुढें चालू ठेवली आहे. यूजेन सँडोनें पनवेलला एकदा भेट दिली होती. त्यावेळीं त्यानें आपल्या डंबेल्सच्या व्यायामाचा प्रचार करण्याचा प्रयत्न केला, परंतु आत्मारामशेट आटवण्यांनीं त्याला करेल्याचे हात करून दाखविल्यावर तो चकित झाला.

७ येथें डॉ. पटवर्धन यांनीं काढलेलें एक मॅटर्निटी हॉस्पिटल आहे.

या तालुक्यांतील 'शिरढोण' हें गांव क्रांतिकारक दे. भ. वासुदेव बळवंत फडके यांचें मूळगांव. पळस्पे येथें इंग्रजी शिक्षणाची सोय आहे.

**उरण** (लोकसंख्या ८६७२) तालुक्याचें ठिकाण. पन्नास वर्षांपूर्वी या गांवाला 'सोन्याचा तुकडा' म्हणत असत. येथें 'मनवेल डिसोझा' यांच्या नांवानें धर्मार्थ दवाखाना आहे. या दवाखान्याची व्यवस्था म्युनिसिपालिटी-कडे आहे. येथें तार ऑफिस, पोस्ट ऑफिस आहे. येथील विमला तलाव, खा. बा. होरमासजी माणेकजी भिवंडीवाला यांची बाग, द्रोणागिरी पर्वत व मोऱ्यावरील श्री. शापुरजी मादन यांचा भारत टाइल्सचा कारखाना पहाण्या-सारखे आहेत. ग्राईंडवेल मशिनरी हें या कारखान्याचें वैशिष्ट्य आहे. येथें मुसलमान वस्ती मोठी असून त्यापैकीं बरेच लोक मातबर आहेत. येथें मिठाचे आगर पुष्कळ असून, मिठाचें उत्पन्न पुष्कळ होतें, व मिठाची निर्यातही फार मोठ्या प्रमाणावर होते. श्री. अ. हो. भिवंडीवाले यांनीं मीठ तयार करण्याच्या बाबतीत बरेंच संशोधन व यशस्वी प्रयोग केले आहेत. त्यांच्या बागेंत सोडा-वॉटरचा कारखाना व बागेजवळच वॉटर वर्क्स आहेत.

बऱ्याच वर्षांपूर्वी येथें दारू गाळण्याच्या जवळ जवळ वीस लायसेन्स्ड भट्टया होत्या. ह्या भट्टयांतून उंची व हलकी दारू तयार होत असे. इतक्या मोठ्या प्रमाणावर प्रांतांत दुसऱ्या कोठें दारू तयार होत असेल असें वाटत नाहीं. त्यावेळीं या भट्टयांमधून ७ ते ८ हजार माणसें कामावर असत. पुढें या भट्टया नाशिकला नेण्यांत आल्या व तेव्हांपासून येथील हा मोठा धंदा कायमचा बसला व या ठिकाणाला अवकळा आली. हल्लीं मिठाचाही धंदा पूर्वीप्रमाणें चालत नाहीं. म्हणून उरणमध्यें आतां पूर्वीचें वैभव आढळत नाहीं. येथें म्युनिसिपालिटीनें चालविलेल्या मुलांची एक व मुलींची एक अशा दोन मराठी शाळा आहेत. शिवाय गावांत एक खाजगी उर्दू शाळाही आहे.

या जिल्ह्यांतील जुन्यापिढींतील शिक्षणप्रेमी गु. दामोदर सदानंद अधिकारी व जिल्ह्याचे भीष्मपितामह गु. रामजी लक्ष्मण घरत यांनीं 'उरण नेटिव्ह इन्स्टिटयूशन' नांवाचें हायस्कूल फार चांगल्या तऱ्हेनें चालविलें होतें. त्यांच्या पश्चात सन १९२२ च्या सुमारास तें मोडकळीस आलें, परंतु गांवांतील कांहीं थोर माणसांच्या मदतीनें व सहकार्यानें दादरच्या "जनरल एज्युकेशन इन्स्टिटयूट" या संस्थेनें तें चांगल्या तऱ्हेनें चालविलेलें आहे.

उरणच्या पश्चिमेकडील शेंकडों एकर जागा सरकारनें आरमारी कामाकरतां घेतली आहे असें ऐकतों तसें असेल तर त्याची उरणगांवाची भरभराट होण्यास मदत होईल.

उरणच्या उत्तरेस असणारीं घारापुरीची लेणीं पहाण्यासारखीं आहेत.

कर्जत तालुक्यांतील मोठालीं गांवें ( १ ) कर्जत, ( २ ) नेरळ, ( ३ ) माथेरान.

**कर्जत** ( लोकसंख्या २,८०८ ) रेल्वेचें जंक्शन असल्याकारणानें त्याला बरेंच महत्व प्राप्त झालेलें आहे. तालुक्याच्या ठिकाणीं असणाऱ्या सर्व कचेऱ्या येथें आहेत. गावांत पोष्ट ऑफिस, तार ऑफिस व विजेची सोय आहे. अलिकडे एक रुग्णालय उघडण्यांत आलें आहे. गावांत म्युनिसिपालिटी नाहीं. ग्रामपंचायत आहे. मराठी शाळा आहेत. अभिनव ज्ञानमंदिर शिक्षण संस्थेनें चालविलेलें एक हायस्कूल येथें आहे. जवळच सरकारनें चालविलेली "राईस ब्रीडिंग फार्म" ही संस्था आहे. विकासयोजने करतां मुंबई सरकारनें कर्जत हें ठिकाण पसंत केलें असून तेथें या योजनेप्रमाणें पुष्कळ कामें सुरू करण्यांत आलीं आहेत. येथून खोपोलीकडे एक रेल्वेचा फाटा गेला आहे. मुंबईहून बाहेर जाणाऱ्या व बाहेरून मुंबईकडे येणाऱ्या बहुतेक गाड्या येथें उभ्या रहातात त्यामुळें व लोकल गाड्यामुळें कर्जत दहिवलीला राहून नोकरीकरतां मुंबईस जाणें पुष्कळ लोकांना सोईचें झालें आहे.

नेरळ—येथून माथेरानला डोंगरावरून माथेरान लाईट रेल्वे जाते यामुळें माथेरानला जाणें सोईचें झालें आहे. माथेरानला पोस्ट ऑफिस, तार ऑफिस, विजेची सोय, म्युनिसिपालिटी वगैरे आहेत. महाबळेश्वर खालोखाल हें थंड हवेचें ठिकाण आहे. परंतु येथील राहाणी फार महागाईची असल्याकारणानें या थंड हवेच्या ठिकाणाचा फायदा घेणें मध्यमवर्गीतील व गरीब लोकांना जवळजवळ अशक्य आहे. माथेरान लाइट रेल्वे आक्टोबर पासून मे महिन्या-पर्यंत चालू असते पावसाळ्यांत ती बंद असते. येथें पाऊस फार पडत असल्या कारणानें पावसांत येथें स्थानिक माणसें तेवढींच रहातात. येथील टोकांसंबंधी माहिती कोणत्याही माथेरान वर्णनांत वाचावयास मिळेल.

नेरळ हें गांव टुमदार आहे. व्यापारी पेठ मोठी आहे. येथें कातकरी मुलांना मोफत शिक्षण देण्याची सोय केलेली आहे. येथें एक हायस्कूलही चालू आहे. वेणगांव हें प्रसिद्ध क्रांतिकारक नानासाहेब पेशवे यांचें मूळ ठिकाण.

**रोहें**–तालुक्याचें ठिकाण. लोकसंख्या ६,८८०. येथें तालुक्याच्या-ठिकाणीं असणाऱ्या सर्व कचेऱ्या आहेत. म्युनिसिपालिटी, पोस्ट ऑफिस, तार ऑफिस, विजेचा प्रसार या सर्व सोयी आहेत. मराठी शाळा आहेत. कोंकण एज्युकेशन सोसायटीनें चालविलेलें "मेहेंदळे हायस्कूल" येथें आहे. हें हायस्कूल माध्यमिक शालान्त परीक्षेचें केंद्र झालेलें आहे. हें व्यापाराचें मोठें ठिकाण आहे. भिरा येथील धरणाचे पाणी कुंडलिका नदींत सोडल्यामुळें येथें पाण्याची मोठी सोय झाली आहे. त्यामुळें बरेच सेवानिवृत्त लोक येथें येऊन स्थाईक झाले आहेत. त्यामुळें या गांवाची वस्ती उत्तरोत्तर वाढत आहे. भारताचें अर्थमंत्री सर चिंतामणराव देशमुख व प्रिं. गोविंद चिमणाजी भाटे आणि त्यांचे बंधु गोपाळराव चि. भाटे हें या गांवचे रहिवासी.

**नागोठणें**–मुंबई महाबळेश्वर रस्त्यावरील रहदारीचा गांव. भाताचा मोठा व्यापार चालतो. ऐतिहासिक काळीं या गांवाला फार मोठें महत्त्व होतें.

त्यावेळीं येथें अंबा नदीवरील बांधलेला पूल प्रसिद्ध आहे. उन्हेरें–येथें उन्हाळी आहेत. ऊन पाण्याच्या झऱ्यांस उन्हाळी म्हणतात. येथील कुंडांत स्नान केल्यानें कातडीचे बरेच रोग जातात असें म्हणतात. त्यामुळें स्नानाकरतां दूर-दूरच्या गांवाहून बरेच लोक येथें येतात.

**माणगांव**–तालुक्याचें ठिकाण. तालुक्याच्या ठिकाणीं असणारीं सर्व ऑफिसें येथें आहेत. पोष्ट ऑफिस, तार ऑफिस व सरकारी दवाखाना आहे. हें गांव धरमतर महाबळेश्वर रस्त्यावर आहे. या पलीकडे या गांवाला महत्व नाहीं. गांवाजवळच काळ नदीवर फार मोठा जुना पूल आहे. दिवा–दासगांव रेल्वे झाल्यास या गांवाचें महत्व निश्चित वाढणार आहे. येथें लोकवस्ती फार थोडी आहे. माणगांव तालुका एज्युकेशन सोसायटीनें येथें १९५२ मध्यें ८ वी व ९ वीचे वर्ग काढून इंग्रजी शिक्षणाची सोय केली आहे. गेल्या जागतिक महायुद्धांत आफ्रिकेच्या समरभूमीवर युद्धाच्या क्रांतिकाळांत भारतीय क्षात्र-तेजाची चमक दाखवून मृत्यूनंतर व्हिक्टोरिया क्रॉस मिळवून आंतरराष्ट्रीय कीर्ति मिळविणारे यशवंतराव घाटगे याच तालुक्यांतील पळसगांवचे रहाणारे.

या तालुक्यांतील पहिलें मोठें गांव गोरेगांव. ऐतिहासिक कालांत हें गांव घोडेगांव या नांवानें प्रसिद्ध होतें. हें भाताच्या व्यापाराचें केंद्र आहे. येथें भात दळण्याच्या चार पांच गिरण्या आहेत. येथें तार ऑफिस व पोस्ट ऑफिस आहे. येथील ग्रामपंचायतीला १९५२ सालीं सर्व जिल्ह्यांतील ग्राम-पंचायतींत उत्तम काम केल्याबद्दल ढाल देण्यांत आली आहे. येथें मराठी मुलांमुलींच्या स्वतंत्र शाळा आहेत. येथें मुसलमान लोकांची वस्ती बरीच असून एक उर्दू शाळाही आहे. माणगांव तालुका एज्युकेशन सोसायटी या ठिकाणीं एक हायस्कूल चालवीत असून, त्या शाळेंत शेतीचें शिक्षण देण्याची सोय केली आहे. एक दोन वर्षांत सर्व गांवाला नळानें पाणी पुरविण्याची योजना हातीं घेण्यांत आली आहे. या गांवात हातमागावर लुगडीं काढणारे

कोष्टी आहेत. या लुगड्यानां साळवटी लुगडीं म्हणतात. हें गांव प्रसिद्ध ज्योतिषी वासुदेव मल्हार जोशी, जुनागडच्या बहुद्दीन कॉलेजांतील पुष्कळ वर्षांचे संस्कृतचे प्राध्यापक महादेव मल्हार जोशी, भारत सेवा समाजाचे (Servant of India) सोसायटीचे सभासद, कामगार पुढारी म्हणून आंतरराष्ट्रीय कीर्ति पावलेले श्री. नारायण मल्हार जोशी व महाराष्ट्राचे सॉक्रेटीस, प्रसिद्ध कादंबरीकार, प्रथितयश साहित्यिक व तत्त्वज्ञानी श्री. वामन मल्हार जोशी या थोर बंधुचतुष्टयाची मूळ भूमी होय.

मोर्बे हा बहुसंख्य मुसलमान वस्तीचा गांव आहे. येथील स्थानिक मंडळींनीं येथें एक हायस्कूल चालविलें आहे.

**इंदापूर**—येथें स्टेट ट्रान्सपोर्ट कंपनीचा मोटारीचा डेपो आहे. येथून तळ्याला सडक जाते.

**तळें**—इतिहासप्रसिद्धगांव. हा गांव तळें या किल्ल्याच्या पायथ्याशीं व परिसरामध्यें वसलेला आहे. येथील हवा निरोगी आहे घरमतरमहाबळेश्वर रस्त्यावरील इंदापूर या गांवातून तळ्यास मोटारी येतात. माणगांव तालुका एज्युकेशन सोसायटीनें येथें १९५१ व १९५२ मध्यें ८वी व ९वी चे वर्ग काढून इंग्रजी शिक्षणाची सोय केली आहे. येथें बरींच जुनीं घरंदाज घराणीं आहेत. कादंबरीकार वामन मल्हार जोशी यांचें जन्मस्थान.

निजामपूर हें या तालुक्यांतील इतिहासप्रसिद्ध गांव आहे येथून रायगडला जाण्याला वाट आहे.

या जिल्ह्यांतील सर्व तालुक्यामध्यें क्षेत्रफळाच्या दृष्टीनें, लोकसंख्येच्या दृष्टीनें, व गांवांच्या संख्येच्या दृष्टीनें या माणगांव तालुक्याचा नंबर सर्व जिल्ह्यांत पहिला लागतो.

या तालुक्यांतील नांदवी या गांवाची कुंभार कामाबद्दल ख्याति आहे.

**महाड**-तालुक्याचें ठिकाण-लोकसंख्या १०,२६७. पूर्वकालाप्रमाणें आजही महाडनें लौकीक कमावला असून तें प्रगतिपथावर आहे. मुंबई-गोवा रस्त्यावर हें शहर असल्यामुळें त्याला मोटारच्या जंक्शनचें स्वरूप आलें आहे. येथें सर्वतऱ्हेची दुकानें असून येथील आयात निर्यात व्यापार फारच मोठ्या प्रमाणावर चालतो म्युनिसिपालिटीचें वार्षिक उत्पन्न ३०-३५ हजारांचें असून शहराची स्वच्छता व आरोग्य चांगल्यारीतीनें राखलें जातें. म्युनिसिपालिटीनें स्वखर्चानें सुंदर व टोलेजंग इमारत बांधली आहे. अशी इमारत जिल्ह्यांतील कोणत्याही म्युनिसिपालिटीस लाभलेली नाहीं हे नमूद करण्यांत आनंद व अभिमान वाटतो.

येथें निरनिराळया प्रकारचीं पुष्कळशीं दुकानें असून पाहिजे तो जिन्नस वाटेल त्यावेळीं मिळूं शकतो. कसलीच वाण भासत नाहीं. येथे भाताच्या ८, ९ गिरण्या असून त्यांत तयार झालेला तांदूळ रत्नागिरी, पुणें, मुंबईकडे रवाना होतो. येथील स्थानिक गृहस्थांनीं महाड इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी काढून गांवांत विजेचा पुरवठा केला आहे. येथे अगदीं अलिकडे टेलिफोनची सोय झालीं आहे.

येथें वकील, डॉक्टर, शिक्षक इत्यादि सुशिक्षित लोकांचा मोठा भरणा आहे. सूतिकागृह, वाचनालय, व्यायामशाळा वगैरे संस्था नमुनेदार चालल्या असून त्या आपापल्या परीनें महाडच्या कीर्तींत भर घालीत आहेत.

" एज्युकेशन सोसायटी येथें परांजपे विद्यामंदिर हें हायस्कूल चालवीत आहे.

महाडच्या या शैक्षणिक व व्यापारी महत्वाबरोबरच त्याचें राजकीय महत्व कांहीं कमी प्रतीचें नाहीं, कांकणभर सरसच ठरेल ! निरनिराळ्या पक्षांचीं आजपर्यंत जीं राजकीय आंदोलनें झाली त्यांत महाडचें नांव न विसर-

ण्यासारखेंच आहे फार काय ! कोंकणांतील सर्व राजकीय पक्षांच्या चळवळीचें महाड हें केंद्र आहे असें म्हणणे अवास्तव नाहीं.

काळकर्ते, प्रो. शिवराम महादेव परांजपे प्रख्यात महाडकर ज्योतिषी विष्णु गोपाळ नवाथे, ॲडव्होकेट काशिनाथ नारायण तथा बाबासाहेब धारप, बहुद्दीन कॉलेज मध्यें काम करीत असलेले त्यांचे बंधु प्रो. धारप, प्रसिद्ध नट आणि नाटककार यशवंतराव टिपणीस, व प्रो. गो. गो. टिपणीस ही सर्व मंडळी महाडचीच.

**पोलादपूर**—तालुक्याचें ठिकाण. येथून महाबळेश्वराकडे व रत्नागिरीकडे जाणारे रस्ते फुटतात. येथें ख्रिस्ती मिशनरी लोकांनीं चालविलेलें महारोग्याचें रुग्णालय आहे. पोलादपूर हें साधुपुरुष विष्णुबुवा जोग यांचें मूळगांव.

**बिरवाडी**—महाडच्या पूर्वेस ६ मैलावर इतिहास प्रसिद्ध गांव. येथील फरसबंदी रस्ते या गांवच्या ऐतिहासिक महत्वाची साक्ष पटवितात. महामहोपाध्याय दत्तोवामन पोतदार यांचे हें मूळगांव. गांव टुमदार असून काळ नदीच्या कांठावर वसलेलें आहे कै. अनंत श्रीधर कोटीभास्कर, अलेंबिक केमिकल वर्क्स लिमिटेडचे भागीदार व श्री. मोरेश्वर गणेश कोटीभास्कर, फीनिक्स केमिकल वर्क्स, मुंबईचे मालक हें दोघेही बिरवाडीचे राहणारे.

**नातें**—महाडच्या उत्तरेस ४ मैलावर ऐतिहासिक प्रसिद्ध गांव. रायगडाकडे जाणारा रस्ता या गांवावरून जातो. भारताचे अर्थमंत्री सर चिंतामणराव देशमुख यांचें हे जन्मस्थान.

महाडपासून ३ मैलावर सोव येथें ऊन पाण्याचे झरे आहेत.

**श्रीवर्धन**—तालुका लोकसंख्या १०,२९९. बोटी लागण्याचें बंदर. येथें म्युनिसिपालिटी आहे. कोंकण एज्युकेशन सोसायटीनें येथें एक हायस्कूल चालविलें आहे. श्री. पेशवे बाळाजी विश्वनाथ भट यांचें हें मूळ ठिकाण.

**मुरुड**–तालुका लोकसंख्या ९,७४४. जंजिरा बंदरापासून सुमारें दीड मैलांवर. येथें म्युनिसिपालिटी आहे. येथें सर सिद्दी अहमदखान नांवाचें हायस्कूल फार वर्षे चालू होतें. व तेथील शिक्षणाला फी नव्हती. संस्थान विलीन झाल्यानंतर तें आतां कोंकण एज्युकेशन सोसायटीनें चालवायला घेतलें आहे. मुरुड ही जंजिऱ्याच्या नबाबाची राजधानी होती.

**नांदगांव**–गणपतीचें प्रसिद्ध स्थान. प्रसिद्ध ज्योतिषी गणेश दैवज्ञ यांचें मूळस्थान.

**म्हसळें**–लोकसंख्या २,९७१. तालुक्याचें ठिकाण. येथें म्युनिसिपालिटी आहे. येथून खामगांवावरून गोरेगांवकडे मोटारची वाहतूक चालू आहे. या तालुक्यांत जंगल पुष्कळ आहे.

**सुधागड**–तालुका मुख्य ठिकाण पाली. येथें सारसगड किल्ला आहे. स्वयंभू गणपति अष्टसिद्धिविनायकापैकीं बल्लाळेश्वराचें स्थान. येथें कोंकण एज्युकेशन सोसायटीनें चालविलेलें वडेर हायस्कूल आहे. पालीस येण्यास तीन मार्ग आहेत. पहिला मुंबई किंवा पुण्याकडून खोपोली मार्गानें मोटारीनें; दुसरा मुंबईहून धरमतरपर्यंत बोटीनें व पुढें धरमतरीहून पालीपर्यंत मोटारीनें ,तिसरा मुंबईहून किंवा पुण्याहून कर्जतपर्यंत आगगाडीनें व पुढें कर्जत – पाली मोटारीनें. पाली हे दादासाहेब साने, प्रो. हरीभाऊ लिमये, स्वामी केदारनाथ व प्रिन्सिपाल त्रिंबक आप्पाजी कुळकर्णी यांचें मूळगांव. श्री. वडेर, माकडछाप काळी टुथ पावडर कंपनीचे मालक याच गांवचे. यानीं येथील वडेर हायस्कूलला मोठी देणगी दिलेली आहे. दादर, मुंबई येथें यानीं जवळ जवळ एक लाख रुपये खर्च करून श्री. दत्तात्रयाचें सुंदर देऊळ बांधलें आहे.

पाली गांवापासून सुमारें दोन मैलांवर अंबानदीच्या पलीकडे उन्हेरे येथें ऊनपाण्याचें कुंड आहे. या कुंडांत स्नान केलें असतांना कातडीचे सर्व रोग व शिवाय अग्निमांद्य, पंडुरोग वगैरे बरे होतात असें म्हणतात. त्यासाठीं वर्षाकाठीं येथें बरेच लोक येतात.

**पडघवली**-कवि माधवानुज, प्रि. वामन आबाजी मोडक, माधवराव मोडक, सॉलिसिटर दिवेकर यांचे मूळ स्थान. या खेरीज या तालुक्यांत सिद्धेश्वर, जांभुळपाडा, नाडसूर, उद्धर वगैरे लहान मोठीं स्थळें आहेत. या पेट्यांत जंगल पुष्कळ आहे.

**खालापूर**-तालुक्याचें ठिकाण. मुंबई-पुणें हमरस्त्याला लागून प्रगति पथावर आहे. श्री. नानासाहेब ठोसर, एम्. एल. ए. हे याच तालुक्यांतील.

**खोपोली**-टाटांच्या विजेच्या कारखान्यांबद्दल प्रसिद्ध. येथें पेपर अँड पल्प कन्व्हर्शन्स लिमिटेड, पुणें या कंपनीनें पुठ्ठयाचा कारखाना काढला आहे. येथून कोळसा मोठ्या प्रमाणावर निर्यात होतो. येथें एक (Fish Farm) मत्स्यक्षेत्र स्थापन करण्यांत आलें आहे. येथें एक हायस्कूल निघावें म्हणून कोंकण एज्युकेशन सोसायटीच्या मदतीनें खटपट जोरांत चालू आहे. एक इस्पितळहि येथें बांधण्यांत आलें आहे.

**चौक**-माथेरानच्या पायथ्याशीं, सुप्रसिद्ध मराठा सरदार नेताजी पालकर यांचें मूळ ठिकाण.

**मढ**-अष्टविनायकांपैकीं एका दुसऱ्या गणपतींचे स्थान म्हणून प्रसिद्ध आहे.

प्रकरण ७ वें ★ ★

# दळणवळणाचे मार्ग

जलमार्ग, खडीघातलेले पक्के रस्ते व रेल्वे हे दळणवळणाचे या जिल्ह्यांतील मार्ग; यापैकी जलमार्गांचे वर्णन यापूर्वींच ३ ऱ्या प्रकरणांत येऊन गेलें आहे.

सेंट्रलरेल्वेचा मुंबई-पुणें फाटा कर्जत तालुक्यांतून नेरळ, कर्जत, पळसदरी या स्टेशनांवरून पुण्याकडे गेला आहे. या रस्त्याला दोन फांटे फुटतात. एक फाटा नेरळ ते माथेरान पर्यंत गेला आहे, दुसरा कर्जत, पळसदरी, केळवली

वगैरे स्टेशनें करीत, खोपोलीस गेला आहे. नेरळ–माथेरान रेल्वे पावसाळी बंद असते. पनवेल ते माथेरान एक रोप रेल्वे करण्याच्या योजनेचा विचार चालू आहे. दिवा–दासगांव रेल्वेच्या पहाणीचें काम सेंट्रल रेल्वेनें एका कमिटीकडे सोपविलें आहे. ही रेल्वे लौकरच होईल असें वाटतें. यासंबंधानें निरनिराळया समाजसेवक कार्यकर्त्यांनीं कांहीं पर्याय सुचविलेले आहेत. कुर्ला–पनवेल–कर्जत असा फांटा करावा किंवा ठाणा–बेलापूर–पनवेल–कर्जत असा फांटा करावा हे ते पर्याय आहेत.

पक्कया सडकांपैकीं धरमतर ते महाबळेश्वर रस्ता सर्वांत मोठा आहे. हा रस्ता नागोठणें, कोलाड, इंदापूर, माणगांव, दासगांव, महाड, पोलादपूर या गांवांवरून महाबळेश्वराकडे गेला आहे. दुसरा रस्ता रेवसहून अलिबाग, रेवदंडा या गांवांवरून मुरुड पर्यंत गेला आहे. या शिवाय दुसरी सडक धरमतर, पेण, खोपोली, खालापूर, चौक, पनवेल या गांवांवरून मुंबईस गेली आहे. या सडकेला पेण, खारपाडा ते पनवेल, पनवेल ते उरण, खोपोली ते पुणें, चौक ते कर्जत, व खोपोली ते पाली हे फाटे फुटलेले आहेत. धरमतर ते महाबळेश्वर या रस्त्यास धरमतर ते अलिबाग, नागोठणें ते पाली, नागोठणें ते रोहे, कोलाड ते रोहें, इंदापूर ते तळें, माणगांव ते निजामपूर, गोरेगांव ते श्रीवर्धन, श्रीवर्धन ते दिघी, महाड ते भोर, महाड ते पाचाड, महाड ते रत्नागिरी, व महाड ते महाप्रळ हे फांटे फुटले आहेत. या सर्व रस्त्यांनीं हल्लीं मोटारींची रहदारी चालू आहे. या खेरीज खेडेगांवांतील व्यापार बैल गाड्यांच्या मदतीनें चालतो.

या खेरीज धरमतरच्या पुलाची योजना मुक्रर झाली आहे. हा पूल तयार झाला कीं अलिबाग तालुका जिल्ह्याच्या इतर तालुक्यांशीं जोडला जाईल.

गोरेगांव जवळ खाडीवर पूल बांधण्याची योजनाही मुक्रर झाली आहे. हा पूल तयार झाला कीं गोरेगांव जंजिरा संस्थानांतील तालुक्यांशीं जोडलें जाईल.

जांबुळपाड्याजवळ अंबानदीवरील पूल बांधून झाला आहे; त्यावर लवकरच रहदारी सुरू होईल. त्याचप्रमाणें याच नदीवर नागोठणें–पाली रस्त्यावरील पुलाच्या कामाचीहि सुरवात झाली आहे.

मुंबई–पनवेल–पेण–नागोठणें कोलाड–माणगांव–महाड अशी जी सडक आहे तिला हल्लीं मुंबई–गोवा असें नांव आहे. आणि हा रस्ता पूर्णपणें काँक्रीटचा बनवून व थेट गोव्यापर्यंत नेऊन कोंकण प्रांताची चांगली सोय व्हावी अशी सर्व कोंकणी जिल्ह्यांची जोराची मागणी आहे. हा रस्ता काँक्रीटचा केला तरच चांगला टिकाऊ होईल व कोंकणच्या पाऊसपाण्याला तोंड देवूं शकेल. हा रस्ता अंशत: अस्फॉल्टचा करावा अशी योजना सरकारी गोटांत चालू आहे व त्याविरुद्ध सर्व पक्षांच्या पुढाऱ्यांनीं आणि राष्ट्रतेज, कुलाबा समाचार आणि कोंकण कृषीवल या तीनहि स्थानिक पत्रांनीं निषेधपर लेख लिहिले आहेत.

## जिल्हा मागासलेला कां ?

या विषयावर लिहिण्यापूर्वी "मागसलेला" या शब्दाचें स्पष्टीकरण केलें पाहिजे. ज्या जिल्ह्यांतील लोक निरक्षर आहेत, ज्यांना पुरेसें अन्नवस्त्र मिळत नाहीं, ज्यांनां राहण्यास आसरा नाहीं अशा जिल्ह्याला मागसलेला म्हणतां येईल. त्याच प्रमाणें ज्या जिल्ह्यांत दळणवळणाचीं पुरेशीं साधनें नाहींत, वैद्यकीय उपचारांची किंवा सल्ल्याची सोय नाहीं, उन्हाळ्यामध्यें पाण्याचें दुर्भिक्ष आहे, शेती नवीन पद्धतीवर केली जात नाहीं, धान्य किंवा भाजीपाला, दूध वगैरे उत्पन्न केलेले पदार्थ शहरांमध्यें पाठविण्याच्या सोयी नाहींत असाहि जिल्हा मागसलेला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं.

हिंदुस्थान देश कृषिप्रधान आहे. लोकसंख्येपैकीं शेंकडा ८५ लोक खेडेगांवांत रहातात. देशाची सुधारणा म्हणजे खेडेगांवांची सुधारणा. ब्रिटिश राजवटींत या बाबीकडे विशेष लक्ष देण्यांत आलें नाहीं. कारण राज्यकर्त्यांना

त्या गोष्टीकडे लक्ष देण्याची जरूरी भासली नाहीं. लोक निरक्षर व अडाणी असले म्हणजे त्यांच्यावर राज्य करणें सोपें जातें. ते अल्पसंतुष्ट असतात व त्यांनां परिस्थितीची जाणीव नसते. या सर्व गोष्टी ब्रिटिश लोकांच्या पथ्यावर पडल्या. या परिस्थितीचें यथायोग्य वर्णन प्रो. शिवराम महादेव परांजपे यांनीं आपल्या "दगडफोड्याची गोष्ट" या लेखांत केलें आहे.

ब्रिटिश राज्यकर्त्यांनां आपलें राज्ययंत्र चालविण्याकरतां इंग्रजी जाणणारे कारकून पाहिजे होते. तसे कारकून पैदा करण्याकरतां त्यांनीं हायस्कूलें व विश्वविद्यालयें स्थापन केलीं. प्राथमिक शिक्षणाकडे त्यांनीं विशेष लक्ष दिलें नाहीं. त्यांचा बुद्धिवाद असा :– हायस्कूलांतून व विश्वविद्यालयांतून बाहेर पडणारे सुशिक्षित लोक स्वयंस्फूर्तीनें शिक्षणाचा प्रसार खालच्या थरापर्यंत नेऊन पोंचवितील. (याला इंग्रजीमध्यें Percolation Theory असें म्हणतात.) पण प्रत्यक्षांत तसें कांहीं झालें नाहीं व साक्षर जनतेचें प्रमाण १५० वर्षांत नजरेंत भरण्याइतकें सुधारलें नाहीं. जें शिक्षण दिलें गेलें त्याचे परिणाम दोन प्रकारचे झाले. सुशिक्षितापैकीं बहुतेक लोक सरकारी नोकरीच्या शृंखलांमध्यें बद्ध झाले. परंतु थोड्या लोकांनां याच "वाघिणीच्या दुधानें" आपल्या खऱ्या परिस्थितीची जाणीव झाली. अशा पैकीं मुंबईचे डॉ. दादाभाई नवरोजी, सर फिरोजशहा मेथा, सर नारायण गणेश चंदावरकर, सर काशीनाथ तेलंग व पुण्याचे लोकमान्य टिळक, शिवराम महादेव परांजपे, विष्णुशास्त्री चिपळूणकर न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे, गोपाळ कृष्ण गोखले, गोपाळ गणेश आगरकर वगैरे मंडळी होत. या पैकीं कांहीं लोकांच्या प्रेरणेनें देशाची परिस्थिति सुधारण्याकरतां १८८५ मध्यें इंडियन नॅशनल कॉंग्रेसची स्थापना झाली. या कॉंग्रेसच्या दीर्घ प्रयत्नांनीं व इतर कांहीं घटनांनीं १५ आगष्ट १९४७ रोजीं हिंदुस्थानचे दोन तुकडे होऊन हिंदुस्थान स्वतंत्र झाला व ब्रिटिश लोक हिंदुस्थान सोडून गेले २६ जानेवारी १९५० रोजीं भारताची घटना मंजूर होऊन भारत "स्वायत्त–प्रजासत्ताक–लोकशाही" देश बनला. आतां स्वराज्य

संपन्न झाल्याला आपल्याला सात वर्षें झालीं आहेत. या मुदतींत मागासलेपणा घालविण्याचे प्रयत्न जोरानें चालू आहेत परंतु त्याकामीं लोकांनीं स्वयंस्फूर्तीनें पुष्कळ श्रम करण्याची जरूरी आहे.

मुंबई प्रांतांतील सर्वच जिल्ह्ये मागासलेले आहेत असें म्हटलें तर त्यांत अतिशयोक्ति होईल असें वाटत नाहीं. त्यांतही पुनः कोंकणांतील जिल्हे हे देशावरील जिल्ह्यांपेक्षां व ज्यांच्यामध्यें कारखान्यांची, व्यापाराची, व शिक्षणाची वाढ फार मोठ्या प्रमाणावर झालेली आहे अशा मुंबई (मुंबईला मीं एक जिल्हाच समजतों) सुरत, अमदाबाद, पुणें, सोलापूर या जिल्ह्यांपेक्षां किती तरी मागासलेला आहे. कोंकणातल्या रत्नागिरी, कुलाबा व ठाणें या तीन जिल्ह्यामध्यें हा जिल्हा जास्त मागासलेला आहे असें म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. वृत्तपत्रांतून रत्नागिरी व ठाणें जिल्ह्याचे उल्लेख ज्या प्रमाणांत येतात त्या मानानें या जिल्ह्याचे उल्लेख फारच थोडे येतात, या दृष्टीनें परवांपरवांपर्यंत हा जिल्हा अगदींच उपेक्षित होता असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु या जिल्ह्यांतील रहिवाशी श्री. चिंतामणराव देशमुख भारताचे अर्थमंत्री आहेत, श्री. नानासाहेब कुंटे हे मुंबई प्रांताच्या असेंब्लीचे स्पीकर व श्री. वामनराव लिमये हे कौन्सिलचे डेप्युटी स्पीकर व श्री. रामचंद्र नारायण मंडलीक हे सर्वच प्रांताच्या व विशेषतः या जिल्ह्याच्या हितसंबंधाची काळजी घेणारे परवांपर्यंत सतत चौदा वर्षें असेंब्लींत किंवा कौन्सिलांत होते या सर्व गोष्टी ध्यानांत घेतल्यानंतर यापुढें हा जिल्हा फार दिवस असाच उपेक्षित राहील असें वाटत नाहीं.

हा जिल्हा मागासलेला असल्याची कारणें :—

१ या जिल्ह्यांतील बुद्धिवान, कर्ते, सुशिक्षित असेच लोक म्हणजे ज्यांनीं जिल्ह्यांतील स्थानिक चळवळीचे नेतृत्व केलें पाहिजे अन्य ठिकाणीं जातात.

२ जिल्ह्यांत साक्षरतेचें प्रमाण समाधानकारक नाहीं.

३ उत्पन्न झालेला माल विक्रीच्या ठिकाणीं नेण्यास भरपूर व सोयीचीं दळणवळणाचीं साधनें नाहींत.

४ वैद्यकीय उपचार व सल्ला मिळण्याची साधनें नाहींत.

५ रूढी, अज्ञान, व व्यसनें यांचा अंमल अजून ढिला झालेला नाहीं.

६ या जिल्ह्यांतील बऱ्याच भागांत ठाकूर, कातकरी वगैरे आदिवासी लोकांची वस्ती आहे आणि त्यांची फारशी सुधारणा अजून झाली नाहीं.

७ या जिल्ह्यांतील वरिष्ठ शिक्षण देणारें एकही विद्यालय नाहीं.

८ बऱ्याच गांवांतून पाण्याचें दुर्भिक्ष आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत लोकांना पाणी आणण्याकरितां दिवसांतून चार तें सहा तास खर्च करावे लागतात.

९ सुधारलेल्या पद्धतीनें शेती करण्याची शेतकऱ्यांना माहिती नाहीं.

१० नवीन तऱ्हेचीं उपकरणीं वापरण्यास त्यांच्याजवळ पैसा नाहीं.

११ आरोग्यसाधनांची माहिती नाहीं, रोग होणार नाहींत म्हणून काय करावें व ते झाल्यास काय करावें या संबंधीची त्यांना माहिती नाहीं.

१२ आपला देश आतां स्वतंत्र झाला आहे, त्यामुळें आपल्याला आतां कांहीं हक्क प्राप्त झालेले आहेत व आपल्यावर कांहीं जबाबदाऱ्या येऊन पडल्या आहेत, त्या हक्कांचा उपयोग करून आपल्याला आपली स्थिती सुधारतां येईल याचें ज्ञान खेडुतांना नाहीं.

१३ छोटे मोठे कारखाने व धंदे जिल्ह्यामध्यें पुरेसे नाहींत.

१४ खेड्यांतील शेतकरी वर्षांतील बारा महिन्यापैकीं जवळ जवळ आठ महिने बेकारच असतात व तेवढा सर्व वेळ आळसांतच घालवितात. ज्यांना शक्य आहे तेवढे लोक शहरांत जाऊन गिरण्यांतून व कारखान्यांतून काम करतात.

जिल्ह्याच्या मागासलेपणाच्या कारणांची ही यादी वाटेल तेवढी वाढवतां येईल. मागासलेल्या अशा सर्व जिल्ह्यांना ही यादी थोड्या फार फरकानें लागू करतां येईल.

वरील कारणें आपण जेवढ्या प्रमाणांत दूर करूं शकूं तेवढ्या प्रमाणांत आपल्याला खेड्यांची सुधारणा करण्याच्या कामांत यश येईल असें समजण्यास हरकत नाहीं.

आज शहरांत मनुष्याला विजेचें बटन दाबलें कीं प्रकाश मिळतो, तोटी फिरावली कीं पाणी मिळतें, ट्राम्स, बसेस, व्हिक्टोरिया, टॅक्सिज, आगगाड्या वगैरे वाहतुकीच्या साधनांनीं थोडक्या वेळांत व थोड्या खर्चांत बराच लांबचा प्रवास करतां येतो व अशा तऱ्हेनें वाचवलेला वेळ तो योग्य तऱ्हेनें खर्च करून आपली निरनिराळया तऱ्हेनें सुधारणा करतो व सुसंस्कृत होतो.

खेडेगांवात लांकडें फोडण्यांत, साठविण्यांत, पाणी ओढण्यांत, तें वाहून नेण्यांत, एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं जाण्यांत फार वेळ खर्च करावा लागतो, म्हणून खेडुताला फारच थोडी फुरसद मिळते, त्यामुळें तो आपली करमणूक करूं शकत नाहीं, सुधारणा करूं शकत नाहीं, म्हणजेच सुसंस्कृत होऊं शकत नाहीं.

खेडेगांवांत विहीरीवर पंप बसविले तर पाणी ओढण्याचा व वाहून नेण्याचा बराच श्रम व वेळ वाचेल. खेड्या खेड्यांतून रस्ते बांधले तर प्रवासाला कमी वेळ लागेल, सहकारी पतपेढ्या स्थापन केल्या तर आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत होईल. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे ज्या सुखसोयी व

साधनें आज आपणांला शहरांत आढळतात त्या जर आपणांला थोड्या फार प्रमाणांत खेड्यांत उपलब्ध करून देतां आल्या तर आपल्या नागरीक व ग्रामीण जीवनांतील सांस्कृतिक विषमता नाहींशी करून सांस्कृतिक समता (Equalisation of Civilisation) प्रस्थापित करतां येईल, व खेडुतांच्या मनांतील न्यूनगंड नाहींसे होतील व शहरवासी लोक व ग्रामीण लोक यांच्यांतील तुटकपणा व परकेपणा नाहींसा होईल.

ही सांस्कृतिक विषमता नाहीशी करणें म्हणजेच खेडेगावांची पुनर्घटना करणें, किंवा खेडेगांवांची सुधारणा करणें होय असें माझ्या अल्प मतीला वाटतें.

वर केलेली जिल्ह्याच्या मागासलेपणाची चिकित्सा बरोबर, व वर केलेलें उपाययोजनेचें अल्प दिग्दर्शन यथायोग्य असलें तरी खेडेगावांची सुधारणा करणें हें काम जितकें दिसतें तितकें सोपें नाहीं.

खेडेगांवच्या सुधारणांचें काम कोणी अंगावर घ्यावें असा प्रश्न उपस्थित झाला कीं, तरुण माणसें म्हणतील हें काम वृद्धांनीं व पेन्शनरांनीं अंगावर घ्यावें, कारण त्यांनीं आपल्या पूर्ववयांत शहरांतील सुखसोयींचा भरपूर अनुभव घेतलेला असतो. त्यांना आतां खेडेगांवांत जाऊन राहण्याला कोणतीच हरकत नसावी. आमचें आतांचें आयुष्य शहरांतील सुखोपभोग व विलास अनुभवण्याचे आहे. खेडेगांवांत जाऊन विरक्तपणानें राहण्याचें नाहीं.

उलटपक्षी वृद्ध माणसें म्हणतील कीं आतां आमच्या शारीरिक आणि मानसिक शक्ति क्षीण झाल्याकारणानें आम्हीं आतां खेडेगांवांत जाऊन त्यांची सुधारणा कशी करूं शकणार? आमच्या आजच्या असहाय स्थितींत आम्हांला शहरांतील सुखसोयींची तरुणापेक्षां अधिक गरज आहे. म्हणून तरुणांनींच खेडेगांवांत जाऊन तेथें सुधारणा घडवून आणावी व हें कार्य त्यांनांच करतां येणें शक्य आहे.

वर पुढें मांडलेला दुहेरी बुद्धीवाद सर्वस्वी खरा नाहीं. परंतु त्या प्रत्येकांत थोडासा सत्यांश आहे. ग्रामसुधारणेच्या कार्याला ज्याप्रमाणें वृध्दांच्या अनुभवाची व मार्गदर्शनाची जरूरी आहे त्याप्रमाणें तरुणांच्या सामर्थ्याची व धडाडीचीहि जरूरी आहे.

ग्रामसुधारणेचें कार्य एकट्यादुकट्याच्यानें होणें शक्य नाहीं. या विधानाचीं कारणें अनेक आहेत, तीं विशद करून सांगणें या लहानशा पुस्तिकेंत शक्य नाहीं. तें काम करण्यास वृद्ध व तरुण माणसें असलेलीं कुटुंबें एकाद्या खेडेगांवांत जातील तर आपसांतील सहकार्यानें तीं तें कार्य लवकरच सहज करूं शकतील. परंतु हीं सर्व माणसें ध्येयवादी, कळकळीनें काम करणारी, त्यागी, व चारित्र्यवान असलीं पाहिजेत. ह्या वृद्ध माणसांच्या संयोगानें व सहकार्यानें कार्याची परंपरा व सातत्य हीं राखलीं जातील. या सर्व गुणांची आमच्या सर्वच राजकीय, सामाजिक, आर्थिक व धार्मिक संस्थांतून किती आवश्यकता आहे हें वर्णन करण्याची जरूरी नाहीं.

देशाची सुधारणा होण्यास खेडेगांवांची सुधारणा झाली पाहिजे या गोष्टीची सरकारला पूर्ण जाणीव आहे. खेड्यापाड्यांच्या अडचणी व त्या दूर करण्याचे उपाय—यांच्यासंबंधीं अल्पसें दिग्दर्शन वर केलें आहे. त्याचें साकल्यानें सरकारला ज्ञान आहे. म्हणूनच पहिल्या पंचवार्षिक योजनेंत कांहीं जिल्ह्यांतून विकासयोजना आंखल्या असून त्यांच्या कामाला सुरुवातहि झाली आहे. आपल्या जिल्ह्यांत अशा प्रकारच्या कामास सुरवात झाली आहे. याशिवाय खेडेगांवांच्या सुधारणेकरतां, "सर्वोदय" व "स्थानिक सुधारकामें" ( Local Development Works ) अशा आणखी दोन योजना पहिल्या पंचवार्षिक योजनेंत आंखल्या आहेत. त्यांच्या संबंधीं माहिती एका स्वतंत्र प्रकरणांत दिली आहे.

## वैद्यकीय मदत

पहिल्या पंचवार्षिक योजनेंत एस्. एम्. सी केंद्रें उघडण्यास सरकारनें मंजुरी दिली आहे. या योजनेप्रमाणें डॉक्टरांची प्रॅक्टिस बसेपर्यंत पांच सात

वर्षांच्या मुदतीपर्यंत त्यांना मदत देण्यांत येईल. या मुदतींत त्यानीं गरीबांना उपचार करणें व भोंवतालच्या खेडेगांवांना ठरविलेल्या वेळीं भेटी द्यावयाच्या आहेत गरीबांच्या मोफत उपचाराकरतां सरकार आपल्या खर्चानें औषधें पुरवतें. अलोपाथिक, आयुर्वेदिक व युनानी अशा तीन प्रकारचीं हीं केंद्रें आहेत. आपल्या जिल्ह्यांत खालीं दिलेल्या तालुक्यांतून त्या त्या गावांकरतां अशीं केंद्रें उघडण्यांत आलीं आहेत.

| तालुका | गांवें |
|---|---|
| १ अलिबाग | पेझारी, रामराज, मुडकोली |
| २ पेण | कळवें, वढाव |
| ३ पनवेल | नेरळ, साई, गावण |
| ४ उरण | पुरकोन |
| ५ खालापूर | चौक |
| ६ कर्जत | कशेळे |
| ७ सुधागड | जांभुळपाडा |
| ८ रोहा | घोसाळें, कोकबन, वानीगांव |
| ९ माणगांव | साई, इंदापूर |
| १० महाड | वटार बुद्रुक, जुई, वरंध |
| ११ मुरुड | माजगांव. नांदवी |

३० जून १९५२ जिल्ह्यामध्यें खालील प्रायमरी सोसायटीज धंद्याच्या सुधारणांकरतां होत्या.

| सोसायटी | संख्या | सोसायटी | संख्या |
|---|---|---|---|
| मधुमाक्षिकापालन | ११ | तेलाच्या घाणी | ४७ |
| तांदूळ हातमडीचे | २ | दोर तयार करणें | ३१ |
| मीठ पैदास | ४ | हातमाग विणकाम | ४८२ |

| | | | |
|---|---|---|---|
| वेत व बांबूकाम | ३२ | कातडीं कमावणें | १८९ |
| सुतार व लोहार काम | ७० | धातूकाम | २० |
| चंदनी लाकूड कोरणें | २ | कुंभारकाम | १६ |
| लेबर कॉंट्रॅक्ट | ३७ | सहकारी संस्था | १०८ |
| स्त्रियांच्या सोसायट्या | ३७ | किरकोळ सोसायट्या | १६८ |

जिल्ह्यामध्यें खालील यादीप्रमाणें प्रायमरी इंडस्ट्रियल को-ऑपरेटिव्ह सोसायट्या, धंद्याच्या विल्हेवारीप्रमाणें आहेत.

| | सोसायट्यांची संख्या |
|---|---|
| कातडें कमावणें व कमावलेल्या कातड्याचें काम | १ |
| जंगल कामगार ... ... ... | ७ |
| वेत आणि बांबू ... ... ... | २ |
| धातूकाम ... ... ... | ३ |
| मीठ पैदास ... ... ... | १ |
| विणकाम ... ... ... | ३ |
| किरकोळ ... ... ... | २ |
| | १९ |

या कामांव्यतिरिक्त आपल्या जिल्ह्यासंबंधीं मी खालील तीन गोष्टींकडे वाचकांचें लक्ष प्रामुख्यानें वेधूं इच्छितों.

१ पहिली गोष्ट म्हणजे जिल्ह्यांतील तरुणांनीं यापुढें आपल्या जिल्ह्याच्या परंपरेला जागून जमिनीवरील सैन्य, आरमारी दल व हवाई दल यांमध्यें स्वदेशसंरक्षणाच्या हेतूनें, बहुसंख्येनें दाखल व्हावे. परकी सत्ता चालू असतांना सुद्धां पहिल्या दुसऱ्या जागतिक युद्धाच्या प्रसंगी महाराष्ट्रांतील कुलाबा व अहमदनगर या दोन जिल्ह्यांनी मनुष्यबळाची फार मोठी मदत केली होती. महाराष्ट्रामध्यें याच दोन जिल्ह्यांतील वीरांनीं व्हिक्टोरिया क्रॉस

मिळविलेला आहे. लढाईनें सर्वच तंत्र हल्लींच्या काळांत इतकें बदललें आहे कीं यापुढें कोणत्याही किल्ल्याचा संरक्षणाच्या दृष्टीनें यत्किंचितही उपयोग होणे शक्य नाहीं. कारण विमानांतून बॉंबगोळे टाकून अगदींच थोड्या वेळांत किल्ल्यांचा समूळ नाश करणें शक्य झालें आहे. तथापि सह्याद्रीच्या व सागराच्या सान्निध्यांत राहिल्याकारणानें काटकपणा, कोणत्याही संकटास तोंड देण्याची तयारी, साहस, धाडस, निर्भयपणा, देशनिष्ठा, स्वामिनिष्ठा, धर्मनिष्ठा वगैरे गुण या जिल्ह्यांतील लोकांमध्यें सुप्त किंवा प्रकटपणानें वास करीत आहेत त्यांचा उपयोग मात्र सर्व वेळीं सारखाच होणार आहे. म्हणून भावी काळावर नजर देवून अंतर्बाह्य अशा दुहेरी अडचणीपासून देशाचें रक्षण करण्याकरतां तरुणांनीं विशेषतः या जिल्ह्यांतील तरुणांनीं आपली परंपरा उज्वल राखण्याकरतां बहुसंख्येनें सैन्यांत दाखल होणें अवश्य आहे. त्या करतां पुणें जिल्ह्यांत सैनिकी शिक्षणाचें महाविद्यालय स्थापन झालें आहे. त्याचा पुरा फायदा महाराष्ट्राला व त्यांतील कुलाब्यासारख्या लष्करी व आरमारी परंपरा असलेल्या जिल्ह्यांतील तरुणांना घेतां आला पाहिजे. सार्वजनिक कार्यकर्त्यांचें या विषयाकडे असावें तसें लक्ष असल्याचें दिसत नाहीं. दूरदर्शीपणानें त्याकडे लक्ष पुरविलें पाहिजे.

२ दुसरी गोष्ट म्हणजे जिल्ह्यांत कोणत्यातरी एका ठिकाणीं वरिष्ठ शिक्षणाकरतां एक कॉलेज ( महाविद्यालय ) काढावें असें पुष्कळांस वाटतें. या प्रश्नाचाहि खोल विचार झाला पाहिजे.

३ तिसरी गोष्ट म्हणजे आरमारी शिक्षणाची व्यवस्था. या जिल्ह्यामध्यें श्री. कान्होजीराव आंग्र्यांनीं या प्रांतांतील लोक आरमारी हालचालींच्या बाबतींत काय करूं शकतात हें इ. स. १७१२ ते १७२९ पर्यंत जगाच्या निदर्शनास आणून दिलें होतें. ती परंपरा पुनरुज्जीवित करून चालू ठेवण्याकरतां मुंबईजवळ कुलाबा जिल्ह्याच्या किनाऱ्याजवळ आरमारी शिक्षणाचें अखिल भारतीय महाविद्यालय काढण्यांत यावें. रेवदंडा येथील कोंकण एज्युकेशन

सोसायटीनें चालविलेल्या शाळेलाच नाविक शाळा बनवावी असा प्रयत्न या संस्थेचे अध्यक्ष श्री. चुनीलाल मीठा शेठ यांनीं चालविला होता. तो तसाच सोडून न देतां सध्यांचे अध्यक्ष श्री. सुरेंद्रनाथ गोविंद टिपणीस यांनीं चालू ठेविला पाहिजे. उरण शेजारच्या न्हावें बेटांत गेलीं तीन वर्षे किंवा त्याहूनहि अधिक काल, एक प्राथमिक नाविक शिक्षणाची शाळा सर महंमद युसुफ यांनीं चालविली आहे. तेथें शिकून तयार झालेले अनेक लोक मोठमोठ्या जहाजांवर जबाबदारीचीं कामें करीत आहेत; त्या शाळेचाच योग्य तो विकास करण्याची कल्पनाही विचार करण्यासारखी आहे. त्याचेंहि या कामीं मोठें साहाय्य होईल.

**प्रकरण ९ वें** ★ ★

# ग्रामसुधारणेच्या निरनिराळ्या योजना

## १ विकास योजना.

या विषयाचा आठव्या प्रकरणांत ओझरता उल्लेख आला आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेप्रमाणें प्रत्येक जिल्हाविकास मंडळामध्यें आठ सरकारी अधिकारी असतात व जिल्ह्याचा कलेक्टर हा त्या मंडळाचा कार्याध्यक्ष असतो.

अधिकाऱ्यांची नांवें येणेंप्रमाणें:—

१ प्रोजेक्ट ऑफिसर, २ असिस्टंट प्रोजेक्ट ऑफिसर, ३ एक्झिक्यूटिव्ह एंजिनिअर, ४ डिस्ट्रिक्ट अग्रिकल्चरल ऑफिसर, ५ को-ऑपरेटिव्ह सोसायट्यांचे असिस्टंट रजिस्ट्रार, ६ जिल्हा लोकलबोर्डाचे अध्यक्ष व ७ जिल्हा लोकलबोर्डाचे चिटणीस. या खेरीज आपल्या जिल्ह्याच्या विकास मंडळावर खालील पांच गृहस्थांची बिनसरकारी सभासद म्हणून नेमणूक केलेली आहे:— १ श्री. सी. वि. टिळक, २ श्री. भा. ना. दिघे, एम्. एल. ए. ३ श्री. य. द्वा. देशमुख, ४ श्री. ना. पू, ठोसर, एम्. एल. ए., ५ श्री. र. य. गुप्ते.

कुलाबा जिल्ह्यांतील योजनेकरतां कर्जत तालुक्यांतील १८३ गांवें, खालापूर तालुक्यांतील १५१ गांवें, व पनवेल तालुक्यांतील ३७ गांवें निवडण्यांत आलीं आहेत, या सर्व खेडेगांवांची लोकसंख्या १,११,५१२ असून क्षेत्रफळ ३७३.२ चौरस मैल आहे.

२३ जून १९५२ रोजीं प्रोजेक्ट ऑफिसर व मुंबई सरकारच्या निरनिराळ्या खात्यांचे मुख्य अधिकारी यांच्या परिषदेपुढें बोलतांना प्रधानमंत्री श्री. मोरारजी देसाई यांनीं या विकास योजनांच्या ध्येयासंबंधीं व कार्यासंबंधीं इतर गोष्टींबरोबर खालील उद्गार काढले.

"विकासयोजनाचें ध्येय लोकांची नुसती आर्थिक स्थिति सुधारणें एवढेंच नसून त्यांच्या जीवनांतील विचार, आचारामध्यें सर्वांगीण विकास, घडवून आणणें हा आहे. तुमच्यापुढें असलेल्या योजनेमधील मूलोद्योग शिक्षण, कोर्टांतील कज्जे कमी करणें, ग्रामीण धंद्याचा विकास करणें व एकंदरींत सहकार्यानें कामें करणें या गोष्टींवर जरूर तो भर देण्याची काळजी तुम्हीं घेतली पाहिजे."

## २ सर्वोदय

जवळ जवळ असलेल्या खेड्यांच्या सध्यांच्या सामाजिक व आर्थिक विकासाच्या कार्यक्रमाला "सर्वोदय" असें म्हणतात. अलिबाग तालुक्यांतील सुडकोली या गांवीं ही योजना सुरू करण्यांत आली. या योजनेमध्यें अलिबाग, रोहें, व मुरुड या तालुक्यांतील जवळ जवळ असलेल्या ५७ खेड्यांचा समावेश केलेला आहे. या खेड्यांचें क्षेत्रफळ ६४ चौरस मैल असून त्यांची लोकसंख्या १८,९२७ आहे.

## ३ स्थानिक विकास कामें (Local Development works).

पहिल्या पंचवार्षिक योजनेंत या जिल्ह्यासाठीं या कामाकरतां रु. २,३७,४५७ मंजूर करण्यांत आले आहेत. हीं सर्व कामें पब्लिक वर्क्स

खातें किंवा जिल्हा लोकलबोर्ड यांच्या तांत्रिक देखरेखीखाली खेडुतांनींच पार पाडावयाचीं आहेत.

प्रकरण १० वें ★ ★

# सहकारी सोसायट्या, बँका वगैरे

आपल्या जिल्ह्यामध्यें खालीं नमूद केल्याप्रमाणें एकुण २५७ कोऑपरेटिव्ह सोसायट्या व बँका आहेतः—

| नांव | संख्या | नांव | संख्या |
|---|---|---|---|
| १) अग्रिकल्चरल क्रेडिट व मल्टिपरपज | १५४ | १०) अर्बन बँका | ७ |
| २) खरेदी विक्री युनियन्स | १० | ११) कंझ्यूमर्स | १० |
| ३) तालुका डेवलेपमेंट बोर्डस | १२ | १२) प्रोडयूसर्स | १६ |
| ४) कॅटल ब्रीडींग | १ | १३) हौसिंग | ६ |
| ५) डेअरी | १ | १४) सुपर व्हायझिंग यूनियन्स | ४ |
| ६) क्रॉप प्रोटेक्शन | १ | १५) डिस्ट्रिक्ट को-ऑपरेटिव्ह बोर्ड | १ |
| ७) इरिगेशन | ३ | १६) फॉरेस्ट लेबरर्स | ६ |
| ८) को-ऑपरेटिव्ह फार्मिंग | ३ | १७) मोटार ट्रॅन्सपोर्ट | १ |
| ९) अर्बन क्रेडिट | १६ | १८) फिशरिप | ५ |
| | | | २५७ |

खालील ठिकाणीं अर्बन को-ऑपरेटिव्ह बँका आहेत.

१ पेण, २ पनवेल, ३ रेवदंडा, ४ माथेरान, ५ रोहें, ६ गोरेगांव, ७ महाड, ८ सुधागड.

३१-७-१९५२ जिल्ह्यांतील प्रत्येक तालुक्यांतील अगर महालांतील लैसन्स काढून सावकारी करणाऱ्या लोकांची संख्या.

परवानेवाल्या सावकारांची संख्या.

| | | | |
|---|---|---|---|
| अलिबाग ११, | पेण ७, | पनवेल १५, | रोहा ६, |
| माणगांव ६३, | महाड ३३, | कर्जत ७, | खालापूर १९ |
| उरण ३, | सुधागड ४, | पोलादपूर ७, | मुरुड १, |
| श्रीवर्धन २, | म्हशळें ०, | (एकूण १७८). | |

**प्रकरण ११ वें** ★ ★

# जिल्ह्यांतील धंदे व छोटेमोठे कारखाने

जिल्ह्यांतील मुख्य धंदे १) शेती २) जंगल ३) मीठ उत्पादन ४) मासे मारणें.

१ शेतकी खात्यांत जिल्ह्यामध्यें डिस्ट्रिक्ट अग्रिकल्चरल ऑफिसर, असिस्टंट डिस्ट्रिक्ट अग्रिकल्चरल ऑफिसर आणि तालुक्या तालुक्यामधून अग्रिकल्चरल ऑफिसर आहेत. हे ऑफिसर लोक जिल्ह्यांतील शेतीच्या कामाकडे लक्ष देतात व शेतकऱ्यांना शेतीसंबंधीच्या बाबतींत सल्ला देतात.

शेतीसंबंधीं वरिष्ठ दर्जाचें शिक्षण मिळण्याची व्यवस्था ठाणें जिल्ह्यांत, डहाणू तालुक्यांत, कोसबाड येथें अग्रिकल्चरल ट्रेनिंग स्कूलमध्यें केलेली आहे. कुलाबा जिल्ह्यांतील उमेदवारांना तेथें प्रवेश मिळतो.

२ जंगल : जिल्ह्यामध्यें राखीव जंगल व संरक्षित जंगल यांची क्षेत्रफळें खालीं दिलीं आहेत.

| | |
|---|---|
| राखीव जंगल Reserve Forests | एकर ३,६५,७५६ |
| संरक्षित जंगल Proteeted Forests | ५७,९१३ |

**३ मीठ उत्पादन**–जिल्ह्यामध्यें मिठाचें उत्पादन उरण आणि पेण येथें मोठ्या प्रमाणावर होतें. उरण येथें श्री. भिवंडीवाले यांनीं मिठाच्या उत्पन्नाच्या बाबतींत बरेंच संशोधन केलेलें असून ते सोलर सॉल्ट नांवाचें अतिशय बारीक, स्वच्छ व पांढरें मीठ बनवतात.

४ मासे मारण्याचा व सुकवण्याचा धंदा करंजें, मोरें, थळ, वगैरे ठिकाणीं चालतो मच्छिमारीच्या शिक्षणाची सोय ठाणें जिल्ह्यांत, पालघर तालुक्यांत सातपाटी येथील फिशरीज स्कूलमध्यें केलेली आहे. कुलाबा जिल्ह्यांतील हें काम शिकूं इच्छिणाऱ्या उमेदवारांना तेथें प्रवेश मिळतो.

खालीं दाखविल्याप्रमाणें जिल्ह्यामध्यें एकंदर ४५५ औद्योगिक कारखानें आहेत.

| | कारखान्याचें नांव | संख्या | कामावर अ. माणसें |
|---|---|---|---|
| १ | कापूस कातकाम व विणकाम | ७९ | ३११ |
| २ | लोकर ,, ,, | १ | ९ |
| ३ | रेशीम ,, ,, | ९ | १६ |
| ४ | इतर कापड कारखाने | ८ | २५ |
| ५ | वृक्षारोपण व जंगल संबधी | १ | ४ |
| ६ | दगडाच्या खाणी | २ | ५ |
| ७ | धान्य सडणें, पिसणें | १३२ | ४११ |
| ८ | तेलाच्या घाण्या | २ | ५ |

| | | | |
|---|---|---|---|
| ९ | पेयांचे व एरिटेडवाटर कारखाने | ६ | १२ |
| १० | तंबाकू पदार्थ कारखाने | १४ | ६२ |
| ११ | ड्रेस मेकिंग (कपडे बनविणें) | ५३ | १०४ |
| १२ | पायमोज व त्यासारखे जिन्नस | १ | ६ |
| १३ | कातड्याचें काम | १ | ३ |
| १४ | कॅनिंग | ३ | १४ |
| १५ | लोहार काम | ३७ | ७४ |
| १६ | वाहतुक सामग्री | २५ | ८७ |
| १७ | इतर यंत्रांचे कारखाने | १ | ४ |
| १८ | सोनारकाम | १३ | ४६ |
| १९ | विटा व कौलें | १३ | ५२ |
| २० | कुंभार काम | २० | ६१ |
| २१ | फर्निचर | १ | २ |
| २२ | इतर लाकूड काम | २९ | ११० |
| २३ | छापखाने | ४ | १८ |
| | | ४५५ | १४४९ |

प्रकरण १२ वें

★ ★

# जिल्ह्यासंबंधीं इतर उपयुक्त माहिती

राज्यकारभार : जिल्ह्याचे तीन प्रांत केले आहेत.

तालुके आणि महाल यांच्यासंबंधीं तपशील खालीं दिला आहे.

| तालुक्याचे नांव | चौ. मैलांत क्षेत्रफळ | लोक संख्या |
|---|---|---|
| अलिबाग प्रांत | | |

| | | |
|---|---|---|
| अलिबाग | १९५.९ | १,०५,४५५ |
| पनवेल प्रांत | | |
| पनवेल | २१५.३ | ९१,३८६ |
| कर्जत | २३९.६ | ६७,३६४ |
| खालापूर | १५६.८ | ४१,६०१ |
| माथेरान | २.९ | २,८०८ |
| उरण | ७५.२ | ४७,३२२ |
| सुधागड | १६२.० | ३५,६५३ |
| पेण | १९९.६ | ६९,६६५ |
| महाड प्रान्त | | |
| महाड | २७१.१ | १,०७,८८६ |
| माणगांव | ३६२.७ | १,०९,९७३ |
| रोहा | २७२.० | ६७,९१५ |
| पोलादपूर | १८८.० | ३६,३३५ |
| मुरुड | १३३.२ | ३९,९६८ |
| श्रीवर्धन | १०४ ६ | ५०,८८५ |
| म्हशोळें | १३४.४ | ३४,९०७ |

वि. सू. या पुस्तकाच्या मूळ हस्तलिखितात उरण व पोलादपूर यांचा पेटे म्हणून उल्लेख केला होता. व सुधागड मुरुड, श्रीवर्धन व म्हशोळें यांचा महाल म्हणून उल्लेख केला होता व तसें पहिल्या प्रकरणांत छापलें ही होतें, परंतु कांहीं जबाबदार व्यक्तींच्या म्हणण्याप्रमाणें हे सर्व तालुके आहेत असें कळल्यामुळें पुस्तकाच्या पुढील भागांत त्यांचा तालुके म्हणून उल्लेख केला. परंतु त्यानंतर मे. कलेक्टरसाहेब कुलाबा यांचेकडे चौकशी करितां उरण व पोलादपूर हे पेटे, व सुधागड, मुरुड, श्रीवर्धन व म्हशोळें हे महालं म्हणजेच पेटे आहेत असें कळलें. म्हणून वाचकांना ही विनंति कीं ही दुरुस्ती ध्यानांत घेऊन त्यांनी पुढील भाग वाचावा.

# वाहतूक व दळणवळणाचीं साधनें

२४ जानेवारी १९५३ रोजीं वहातुकीच्या मध्यवर्ती बोर्डाची सभा होऊन त्या सभेमध्यें दिवा-दासगांव रेल्वेच्या योजनेचा विचार झाला. त्यानंतर रेल्वे वहातुक खात्याचे केंद्रीय मंत्री यांनीं १९५३-५४ चें रेल्वेचें अंदाजपत्रक मांडतांना जाहीर केलें कीं १९५३-५४ मध्यें दिवा-दासगांव रेल्वेच्या कामाला लवकरच सुरवात करण्याच्या दृष्टीनें त्या योजनेची पहाणी करण्यांत येईल. रेल्वे बोर्डानें हें प्राथमिक पहाणी काम सेंट्रल रेल्वेच्या जनरल मॅनेजरांकडे सोंपवलें. प्राथमिक पहाणी करून दिवा-दासगांव रेल्वेचें अंदाज-पत्रक रेल्वे बोर्डानें पसंत केलें असून लवकरच त्या कामाला सुरवात होईल अशी अपेक्षा आहे

# शिक्षण

जिल्ह्यामध्यें १९-५२ व १९५२-३ मधील प्राथमिक शिक्षणाची स्थिति खालीं दर्शविली आहे.

| | १९५१-५२ | १९५२-५३ |
|---|---|---|
| **प्राथमिक शाळांची संख्या** | | |
| अ) सार्वजनिक | ५९१ | ५९९ |
| ब) खाजगी | २८० | २८१ |
| क) एकूण | ८७१ | ८८० |
| **विद्यार्थ्यांची संख्या** | | |
| अ) सार्वजनिक | ६२,२४६ | ६५,०८२ |
| ब) खाजगी | १०,१५८ | १०,८७२ |
| क) एकूण | ७२,४०४ | ७५,९५४ |

१९५१-५२, व १९५२-५३ मधील जिल्ह्यामध्यें माध्यमिक किंवा दुय्यम शिक्षण देणाऱ्या शाळांची स्थिति खालीं दर्शविली आहे.

| | १९५१-५२ | १९५२-५३ |
|---|---|---|
| शाळांची संख्या | १९ | २१ |
| मुलांची संख्या | ४०२५ | ४०६० |

## बंदरें

बंदराच्या संबंधीं आखलेल्या योजनेचा हेतु या जिल्ह्याच्या किनाऱ्यावराल लहान बंदरांची पहाणी करून सुधारणा करणें हा आहे. ह्या पहाणी करतां एक मरीन सर्व्हे सब डिव्हिजन स्थापन करण्यांत आला असून ह्या जिल्ह्यांतील खालील बंदारांची पहाणी करून तीं सुधारण्याचें योजिलें आहे:—

पनवेल, मोरा, करंजें, थळ, अलिबाग, रेवदंडा (चौल), बोरलई, मांडलें, मुरुड, राजपुरी, मांडवा, कुंभारू, व श्रीवर्धन.

---

प्रकरण १३ वें ★ ★

# कुलाबा जिल्हा—दुसरी पंचवार्षिक योजना

कुलाबा जिल्हा विकास मंडळाची जाहीर विनंति : चालू पंचवार्षिक योजना मार्च १९५६ अखेर संपत असून त्या पुढील म्हणजे १९५६-६१ या मुदतीची पंचवार्षिक योजना तयार करण्याबद्दल केंद्र सरकारने ठरविलें आहे. ही योजना तयार करतांना जिल्हानिहाय योजना करणें इष्ट झालें आहे. कारण तसें केल्यानें जिल्ह्यांतील ग्रामीण जनतेच्या कोणत्या अडचणी आहेत व त्या दूर करण्यासाठीं जिल्ह्यांतील जनता व वेगवेगळ्या संस्था कोणती मदत देऊं शकतील, सरकारवर खर्चाचा भाग कोणता येईल हें ठरविणें सोईचें होईल. त्या दृष्टीनें कुलाबा जिल्हा विकास मंडळानें नेमलेले एक खास समितीनें जिल्ह्याचे योजनेचा एक कच्चा आराखडा तयार केला आहे. हा आराखडा

कुलाबा जिल्ह्याच्या कलेक्टरनी कांहीं व्यक्तींकडे व संस्थांकडे सूचना करण्यासाठीं पाठविला आहे. तो वाचकांच्या माहितीसाठीं येथें एक स्वतंत्र प्रकरण म्हणून छापण्यांत येत आहे.

## जिल्हा योजनेचा आराखडा

कुलाबा जिल्हा विकास मंडळाचे ता. २७-५-१९५४ रोजीं भरलेल्या सभेमध्यें कुलाबा जिल्ह्याची दुसरी पंचवार्षिक योजना "योजना समितीनें" सुचविले मार्गानें व मुंबई सरकारनें दिलेले आदेशाप्रमाणें कशी तयार करण्यांत यावी हें ठरविण्यासाठीं एक पोट समिति नेमली. ह्या समितीवर जिल्ह्यांतील कांहीं खात्यांचे सरकारी अधिकारी व जिल्हा विकास मंडळाचे कांहीं बिनसरकारी सभासद याची नेमणूक करणेंत आली. या समितीची ता. १७ व १८ जून रोजीं अलिबागेस बैठक होऊन कुलाबा जिल्ह्याची दुसरी पंचवार्षिक योजन कशी असावी याचा एक आराखडा तयार केला आहे.

या समितीनें वेगवेगळ्या कोणत्या योजना दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत घेणेंत याव्या याचा तपशीलवार उहापोह करून खालील गोष्टींचा आराखड्यामध्यें समावेश केला आहे.

## ग्रामीण पाणी पुरवठा

(१) विहिरी (२) तलाव (३) नळाचें तोटीनें पाणीपुरवठ्याच्या योजना (खारेपाट भागासह). हल्लीं सरकारचें धोरण २०० हून जास्त लोकसंख्या असलेले गांवीं पाणीपुरवठा करावा असें आहे. त्याचा अंमल पूर्ण करून शिवाय लहान गांवांनाही पाणीपुरवठा असावा.

## गांवठाणे

हल्लीं असलेलीं गावठाणें वाढत्या लोकसंख्येच्या मानानें अपुरी पडत आहेत. यासाठीं गांवठाणांच्या हद्दी वाढविण्यांत याव्या, किंवा गांवठाणांसाठीं

नवीन जागा देण्यांत याव्या. प्रत्येक कुटुंबासाठीं कमींत कमी तीन गुंठे जागा घर बांधण्यासाठीं राखून ठेवण्यांत यावी. अशा तऱ्हेनें ज्यांना गांवठाणांसाठीं जागेची जरूरी असेल त्या गांवकऱ्यांनीं मामलेदार अगर महालकरी यांचेकडे अर्ज करावे.

## शेतीचें उत्पादन वाढविणें

(अ) सुधारलेलीं बी बियाणें वापरणें.

(ब) सहकारी धान्यकोठ्यांची स्थापना व हल्लीं असलेल्या धान्य कोठ्यांचे सहकारी संस्थेंत रूपांतर.

(क) जपानी पद्धतीनें भातशेती लागवड. ५० हजार एकर जमीन या पद्धतीनें लागवडीस आणण्यासाठीं प्रयत्न करण्यांत यावा. दर वर्षी नवीन दहा हजार एकर याप्रमाणें पांच वर्षांत या योजनेनुसार सर्व जमीन लागवडीखालीं यावी. याकरितां खत वापरणें व योग्य अशा पाणथळ जमिनीची पाहणी करणें जरूर आहे.

(ड) दर वर्षी नवीन एक हजार एकर जमीन याप्रमाणें पांच हजार एकर जमिनींत हिवाळी पिकांचे उत्पन्न काढण्यांत यावें.

(इ) जिल्ह्यांत ओसाड असलेल्या सर्व मानट जमिनींची पाहणी करून त्यापैकीं एक हजार एकर जमीन लागवडीस आणणें.

(ई) खार जमिनींची सुधारणा. खार लँड बोर्डानें पाहणी करून तयार केलेल्या सर्व योजना अंमलांत आणणें.

## फळझाडांची लागवड

(फ) पांच वर्षांच्या अवधींत एक लाख आंब्याची व इतर कलमें (शक्य झाल्यास) सवलतीच्या दरानें वाटण्यांत येऊन त्यांची लागवड

करण्यांत यावी याखेरीज अननस व चिकू तसेंच नारळ व सुपारी यांची मोठ्या प्रमाणावर लागवड करण्यांत यावी.

(ग) दुभती व त्याचप्रमाणें शेतीचे उपयोगी पडणाऱ्या जनावरांची सुधारणा. (१) कृत्रिम रीतीनें गर्भधारणा करून उत्तम जनावरांची पैदास करणेसाठीं जिल्ह्यांत पांच केंद्रें उघडणें ( Artificial Insemination centres) (२) मुख्य शहरांचे आसपास खाजगी रीतीनें त्याचप्रमाणें सहकारी धर्तीवर चालणाऱ्या दूध पुरवठा करणाऱ्या पांच संस्था स्थापण्यांत याव्या. (Dairies). (३) चालू पंचवार्षिक योजनेमध्यें तालुक्याचे ठिकाणीं गुरांचे दवाखाने काढण्याची योजना आहे. हे दवाखाने पुरे झाल्यानंतर राहिलेल्या तालुक्यांचे ठिकाणीं दवाखाने सुरू करणेंत यावेत

ह ) कोंबड्यांच्या नवीन जाती आणणें व असलेल्या सुधारणें. याकरितां पांच वर्षांच्या मुदतींत पांच हजार सुधारलेले जातीचे कोंबडे पुरविणें.

ज) मधुमक्षिका पाळून मध काढणें. याकरितां जिल्ह्यांत पांच मधुकेंद्रे योग्य ठिकाणीं उघडण्यांत यावीं.

## वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन

ग्रामपंचायती व आपल्या सुधारणांसाठीं झटणारे गांव यांनीं, पडीक जमिनी झाडें लावून उपयोगांत आणाव्या. शिवाय जिल्ह्यांतील निदान पन्नास गांवांनीं हे काम हातीं घेऊन ठरलेल्या प्रत्येक गांवानें पांच वर्षांत २० एकर याप्रमाणें एक हजार एकर क्षेत्रांत झाडांची लागवड करावी. यासाठीं मालकी पडीक, त्याचप्रमाणें सरकारी पडीक व जंगलचे ताब्यांतील जमिनी उपयोगांत आणाव्या.

## पाणी पुरवठ्यासाठीं लहान धरणें

अ) जेथें जेथें शक्य होईल तेथें पाणीपुरवठा करणारे पक्के व कच्चे लहान बंधारे बांधण्यांत यावे. अंदाजे १०० फूटाचे अंतरावर नदी नाल्यांमध्यें

असे बंधारे बांधण्यांत यावे. शिवाय तळ्याचे पाण्याचा उपयोग करून हिवा-ळ्यांत जमीनींत भाजीपाला अगर कडधान्यें लावण्यांत यावी.

ब) आपले जिल्ह्यांत पाताळगंगा, कुंडलीका व उल्हास या नद्यांना उन्हाळ्यांत भरपूर पाणी असतें. या नद्यांचे कांठी जेथें जेथें शक्य होईल, तेथें इंजिननें पाणी वर खेचून जास्त नवीन जमीन लागवडीस आणण्यांत यावी. अशा तऱ्हेच्या योजना कोठें होऊं शकतील तें गांवकऱ्यांनीं ठरवून त्या योजना अंमलांत आणण्यासाठीं जरूर ती खटपट करावी.

## खादी प्रसार

प्रत्येक कुटुंबानें फावल्या वेळांत सूत काढलें तर त्या कुटुंबांतील माण-सांना लागणारे कापड तयार होणें सहज शक्य आहे. वस्त्र स्वावलंबनाचे महत्व पटवून दिलें पाहिजे व त्यासाठीं जिल्ह्यांत खादीबोर्ड स्थापून हा प्रश्न हातीं घेणें अवश्य आहे. जिल्ह्यांत कांहीं ठिकाणीं हातमागावर कापड विणलें जात आहे. या मागांना हात सूताचा पुरवठा केल्यास खादी विणून घेणें सहज शक्य आहे.

## ग्रामीण उद्योग धंदे

सहकारी तत्वावर ग्रामीण उद्योगधंद्याची वाढ करणें अवश्य आहे. त्यासाठीं खालीलप्रमाणें सहकारी संस्था आपल्या जिल्ह्यांत स्थापन करण्यांत याव्या.

| | |
|---|---|
| १) शेतीसाठीं कर्ज देणाऱ्या संस्था | १५० |
| २) (अ) शेतीविषयक खरेदी विक्री संस्था [Marketing] | ५ |
| (ब) शक्य होईल तेथें तालुक्याचे ठिकाणीं वरील संस्थाचे उपयोगासाठीं वखारी बांधणे | १० |
| ३) सहकारी व सामुदायिक शेती उत्पादन संस्था | ५ |

४) दलित वर्गासाठीं घरें बांधण्यासाठीं सहकारी संस्था १०

५) सहकारी औद्योगिक संघटना (अ) कामगार संस्था ५ (ब) जंगल कामगार सोसायटीज ४ (क) बांबूचे काम करणाऱ्या संस्था १ (ड) मीठ उत्पादन करणाऱ्या सोसायटीज ३ (इ) मधुमक्षिका पालन सोसायट्या २ (फ) कातडी कमावण्याचा धंदा करणारी संस्था १ (ग) नीरा उत्पादन करणाऱ्या संस्था २

६) मासेमारीचा धंदा करणाऱ्या संस्था ८

## ग्रामीण आरोग्य

(अ) जिल्ह्यांतील कमीतकमी पन्नास ग्रामपंचायतींनीं सार्वजनिक संडास बांधण्याची व्यवस्था करावी.

(ब) हल्लीं घराशेजारी अगर घराचे भागामध्यें दुभती अगर बिनदुभती गुरें बांधण्याची पद्धत गांवोगांवी दिसून येते. त्यामुळें आरोग्य नीट राखलें जात नाहीं, तरी गांवठणाचे हद्दीबाहेर पन्नास गुरांस एक याप्रमाणें सार्वजनिक गोठे बांधण्यांत यावे.

(क) ग्रामपंचायतीचे हद्दीमध्यें कचरा टाकण्यासाठीं कचऱ्याच्या पेट्या ठेवणें, तसेंच शक्य होईल तेथें गटारांतील घाण पाणी जाण्यासाठीं गटारें बांधणें, याकरितां पंचायतीना सरकारी मदत मिळण्याची योजना असावी.

(ड) नगरपालिकांचे हद्दीमध्यें घाण होऊं नये म्हणून खाटकांसाठीं कत्तलखाने वेगळे ठिकाणीं बांधण्यांत यावे.

## औषधोपचार व रुग्णालयें

(अ) सध्यां जिल्ह्यामध्यें कांहीं तालुक्याचे ठिकाणीं सूतिकागृहें आहेत. राहिलेल्या ठिकाणीं अशी सूतिकागृहें असणें अवश्य आहे व अशा दहा सूतिकागृहांची जिल्ह्यांत आवश्यकता आहे.

( ब ) सध्यां तालुक्याचे ठिकाण सोडून इतर ठिकाणीं औषधोपचार होण्याची सोय नाहीं. फक्त सर्व जिल्ह्यांत बावीस ठिकाणी S. M. P. केंद्र उघडलीं आहेत. अशा केंद्राचे ठिकाणीं शिवाय सुशिक्षित दाई ठेवून कमीत-कमी पन्नास केंद्रे उघडण्यांत यावीं. ही केंद्रें फारशी उपयुक्त ठरत नाहींत असें आढळून आलें आहे, तरी शक्य होईल तेथें दवाखाना उघडण्यांत यावा. अशा तऱ्हेनें जिल्ह्यामध्यें दहा नवीन दवाखानें उघडण्यांत यावे.

## कॉटेज हॉस्पिटल

( क ) अशा तऱ्हेच्या इस्पितळाची सोय जिल्ह्यांत तीन ठिकाणीं करण्यांत यावी.

( ड ) प्रत्येक तालुक्याचे ठिकाणीं दवाखान्यास जोडून कुटुंबनियोजन केंद्र उघडण्यांत यावे. प्रत्येक सूतिकागृहाचे ठिकाणीं शिशुपालन केंद्र उघडण्यांत यावे.

( इ ) प्रा. शाळेंतील अशक्त मुलांस ठिकठिकाणीं दूध पुरविण्याची योजना अंमलांत यावी.

## रस्त्यांची सुधारणा व नवीन रस्ते

कोंकणच्या भागांत पाऊस फार पडत असल्यामुळें हल्लीं असलेले रस्ते लवकर वाईट होतात. ह्यामुळें प्रवास पाहिजे तितका जलद व सुखकर होत नाहीं व रस्ते दुरुस्तीसाठीं वारंवार खर्च करावा लागतो. ज्या रस्त्यांवर जितकी वहातूक जास्त असते, तितके ते अधिक लवकर वाईट होतात. तरी पुढील पंचवार्षिक योजनेंत मुख्य रस्ते कॉंक्रीटचें बांधणें जरूर आहे. खालील रस्ते याप्रमाणें पक्के कॉंक्रीटचे बांधण्यांत यावे.

(अ) १ अलिबाग–खोपोली रस्ता. २ कर्जत–चौक. ३ अलिबाग-रेवदंडा ४ पनवेल–उरण–मोरा. ५ अलिबाग–रेवस रस्ता.

# नवीन रस्ते

(ब) सार्वजनिक बांधकाम खात्यानें चालू पंचवार्षिक योजनेंत २५ मोठ्या रस्त्यांची व पुलांची कामें समाविष्ट केलेलीं आहेत. पैशांची तरतूद होईल त्याप्रमाणें ही कामें केली जातील. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेत चालू पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट केलेली कामें पुरी करण्यांत यावी. त्या खेरीज खालील नवीन रस्त्यांचीं कामें घेण्यांत यावी.

१ पोयनाड-गांधे नागोठणा मैल १७.
२ म्हसाळा-मेंदडी वडवली रस्ता मैल १०.
३ माणगांव-चांढवे-म्हसळें रस्ता मैल १६.
४ खारपाडा-कराडे मैल ६.
५ पनवेल वाजे-मालडुंगे-नेरळ रस्ता मैल १३.
६ खांडस-भालीवडी मैल ४.
७ वहाळ-विंघणें चिरनेर-साई खारपाडा मैल १३.
८ साई [ माणगांव ]-तळे-तांबाडी मैल १८.
९ महाड-पाचाड मैल १४.
१० वाशी (पेण) वढाव-काळेश्री मैल ३.
११ बिरवाडी-वाळण-दापोली मैल १९.
१२ पेण-जीर्णे (शहापाडा धरणावरून) मैल १०.
१३ साळाव-तळेखार-चणेरे मैल १०,
१४ देवळे ( पोलादपूर ) पांढवे-ढवळे ( पोलादपूर ) मैल ६.
१५ शिरोळी-आंबवडे मैल अडीच.
१६ करंजाडी-मुमुर्शी मैल अडीच.
१७ जसवली-रानवली-सायगांव-हरेश्वर-देवघर मैल १०.
१८ कानरूळ-धोंडसे-आतोणे रस्ता मैल १२.
१९ हमरापूर-दादर-बंदर रस्ता मैल $3\frac{1}{2}$.
२० उंबर्डे कोप्रोली मैल २.
२१ नारिंगी ( अलिबाग ) माणकुले मैल दीड
२२ जांबरुंग डोलवली रेल्वे स्टेशन खालापूर मैल दीड
२३ पनवेल-वांजवे बांधणवाडी साडेनऊ
२४ महाड विन्हेरे मैल १२.
२५ मुरुड दांडा सावळी भालगांव-रोहा मैल ११.

# मोठे पूल

१ रोहे अष्टमी. २ गोरेगांव. ३ गोफण–चावरे. ४ नागोठणे पूल रुंद करणे. ५ मुरुड खाडीवरील पूल. ६ चिपळे (ता. पनवेल) ७ वरसोली खाडीवरील पूल. (अलिबाग–थळ रस्ता) ८ खोपटे (उरण महाल).

# बंदरें

(अ) मांडवा बंदराची सुधारणा. (ब) करंजा धक्याची सुधारणा. (क) रेवदंडा पक्टीची सुधारणा. (ड) साळाव पक्टीची सुधारणा. (इ) दिघी पक्टी. (फ) दांडे (मुरुड) पक्टीची सुधारणा. (ग) श्रीवर्धन (धक्का) मालाचे उतारासाठीं धक्का. (च) मुरुड पक्टीची सुधारणा.

याशिवाय खाडींतून प्रवास करणारांसाठीं (उ.दा. रेवदंडा रोहा खाडी) जमिनीवरून होडींत अगर लॉंचमध्यें बसण्यास सोय व्हावी म्हणून ठिकठिकाणीं पक्ट्या बांधणें आवश्यक आहे. तरी याबाबत सूचना लोकांकडून मागवून त्यांची मदत करण्याची तयारी असेल त्या ठिकाणीं पक्ट्या बांधण्यांत याव्या.

बंदरांत गाळ सांचून तीं निरुपयोगी होतात. चालू पंचवार्षिक योजनेंत बंदराची पाहाणी होणार आहे. ती पुरी झाल्यावर बंदरें सुस्थितींत राहावी म्हणून एक ड्रेजर गाळ काढण्यासाठीं देण्यांत यावा.

जेथें म्हणून हल्लीं नियमित आगबोटी थांबतात तेथें बिनतारी संदेश वाहक यंत्र ( Wireless Set ) ठेवण्यांत यावा.

# पोस्ट व तारखातें

जेथें तार ऑफिस आहे तेथें टेलिफोनची व्यवस्था करण्यांत यावी. लोकांचे मागणीप्रमाणें मध्यवर्ती ठिकाणीं नवीन तार ऑफिसें उघडणें.

## विद्युत गृहें

आपल्या जिल्ह्यांतील मुख्य ठिकाणी विजेचा पुरवठा व्हावा म्हणून एक योजना जिल्ह्यांतील प्रमुख व्यक्तींनी कांहीं महिन्यापूर्वी तयार केली आहे. या योजनेप्रमाणें जिल्ह्यांतील १९ गांवांना विजेचा पुरवठा होणार आहे. तिचा खर्च अंदाजें तीस लाख रुपये होईल. ही योजना जरूर त्या फरकानें अंमलांत आणावी व इलेक्ट्रिसिटी शक्य तितक्या कमी दरानें लहान लहान कारखान्यांकरितां ( Power Purposes ) देण्यांत यावी. म्हणजे निरनिराळे घरगुती धंद्यास चालना मिळेल.

## बंधारे:—धरणें

[१] काळुंद्रा ता. पनवेल. [२] रीटघर ता. पनवेल. [३] भोईघर ता. मुरुड. [४] कुंडलिका नदीचें पाणी माणगांव तालुक्यांत शेती सुधारणेसाठीं नेणेची योजना. [५] मानघोल धरण [ मानी ता. अलिबाग ] [६] सिद्धेश्वर धरण [ ता. अलिबाग ]

## शहरांसाठीं नळाच्या पाण्याची योजना

[१] अलिबाग [२] मुरुड. [३] नागोठणा. [४] नांदगांव–माझगांव [ मुरुड ].

## मीठ पिकविण

खाडीचे अगर समुद्राचे पाणी अडवून शक्य होईल तेथें लोकांचे मागणीप्रमाणें मीठ पिकविण्याच्या योजना तयार करण्यांत याव्या.

## अधिक जमीन गवताचे लागवडीखालीं आणणें

प्रत्येक गुरासाठीं दोन एकर जमीन गुरचरण म्हणून राखण्यांत यावी असें सर्वमान्य मत आहे. तसें न केल्यानें गुरांची निगा नीट राखली जात नाहीं

तरी शक्य तेथें यासाठीं गवताची वाढ होणें अवश्य आहे व पाळीपाळीनें गुरें चारण्याची पध्दत ( Rotational Grazing ) शक्य तेथें अंमलांत आणावी.

## शिक्षण

जिल्हा शिक्षण अधिकाऱ्यांनीं याबाबत योजना तयार केली आहे. या खेरीज खालील योजनांचा पंचवार्षिक योजनेंत अंतर्भाव करणेंत यावा.

[अ] एक शेतकी शाळा काढण्यांत यावी.

[ब] मासेमारीचें शिक्षण देण्यासाठीं एक शाळा काढणेंत यावी.

[क] नाविक दलाचें शिक्षण देण्यासाठीं जंजिरा किल्ला महाल मुरुड येथें एक शाळा देणेंत यावी.

[ड] बाल गुन्हेगारांसाठीं त्यांना उत्तम नागरीक बनविणेसाठीं जिल्ह्यामध्यें रिमांड होम ही संस्था स्थापन करणेंत यावी.

ग्रामीण जनतेस वाचनालयाची सोय व्हावी म्हणून जिल्ह्यांत निरनिराळया १०० ठिकाणीं तालुका वाचनालयांच्या शाखा काढण्यांत याव्या.

त्याचप्रमाणें शेतकऱ्यांना मनोरंजन व ज्ञान मिळावें म्हणून ठिकठिकाणीं ५०० रेडिओ सेट ठेवण्यांत यावे.

मागासलेल्या वर्गासाठीं जेथें दुय्यम शाळा आहेत अशा ५ ठिकाणीं मागासलेल्या वर्गाच्या विद्यार्थ्यांसाठीं वसतीगृहें बांधण्यांत यावी. या खेरीज मागासलेल्या वर्गाचे उन्नतीसाठीं संबंधी खात्यानें एक योजना तयार करावी.

हल्लीं ग्रामीण भागांतील शेतकऱ्यांस आपल्या मुलांस दुय्यम शिक्षण देतां येत नाहीं. या बाबतची मुख्य अडचण म्हणजे त्यांचे मुलांस राहण्यासाठीं शहरांत सोय नसते. तरी दुय्यम शाळांचे ५ ठिकाणीं अशा विद्यार्थ्यांना राहण्यासाठीं वसतीगृहें बांधण्यांत यावीं.

प्रकरण १४ वें ★ ★

# जिल्हा विकास मंडळाला उपयुक्त सूचना

कुलाबा जिल्हा विकास मंडळानें नुकतेच एक जाहीर विनंतिपत्रक काढलें असून सन १९५६ ते ६१ या कालावधींत पुऱ्या करावयाच्या दुसऱ्या पंचवार्षिक योजनेखालीं कुलाबा जिल्ह्यांत करावयाच्या कामांचा एक तात्पुरता आराखडा प्रसिद्ध केला आहे. ता. २०-८-१९५४ चे आंत जिल्ह्यांतील जनतेनें सदर तात्पुरत्या आराखड्यासंबंधीं सूचना कराव्या असें जाहीर केलें होते.

जिल्हा विकास मंडळानें प्रसिद्ध केलेल्या आराखड्यावर पहिल्याप्रथम नजर फिरविल्याशिवाय अधिक कामें सुचविणें योग्य नसल्यानें त्याचा थोडक्यांत विचार करूं.

१ ग्रामीण पाणीपुरवठा, २ गांवठाणें, ३ शेतीचें उत्पादन वाढविणें, ४ फळझाडांची लागवड, ५ वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन, ६ लहान धरणे, ७ खादी प्रसार, ८ ग्रामीण उद्योगधंदे, ९ ग्रामीण आरोग्य, १० औषधोपचार व रुग्णालयें, ११ कॉटेज हॉस्पिटल, १२ रस्त्याची सुधारणा व नवीन रस्ते, १३ मोठे पूल, १४ बंदरे, १५ पोस्ट-तारखाते, १६ विद्युतगृहें. १७ बंधारे, १८ शहरांसाठीं नळाच्या पाण्याची सोय, १९ मीठ पिकविणें, २० अधिक जमिन गवताचे लागवडीखालीं आणणें, २१ शिक्षण.

ह्याप्रमाणें आराखड्याचे भाग पाडण्यांत आले आहेत. पैकीं कांहीं भागांतून नुसत्या कल्पना मांडल्या असून कांहीं भागांतून प्रत्यक्ष जीं कामें व्हावींत तीं सुचविण्यांत आलीं आहेत. कल्पनांच्याबद्दल म्हणावयाचे तर त्या सर्व चांगल्या आहेत. कोणीही त्यांस आशीर्वाद देईल. सुचविलेल्या कामाकडे नजर टाकल्यास मात्र विषाद वाटल्याशिवाय रहात नाहीं.

रस्त्यांची सुधारणा व नवीन रस्ते या भागाखाली सुचविण्यांत आलेल्या अ व ब याद्यांकडेच पहा. कॉंक्रीटीकरणात फक्त ५ रस्ते असून तेही जिल्ह्याचे उत्तर भागांतील! या यादींत १ नागोठणे–रोहा, २ कोलाड–रोहा, ३ इंदापूर-तळे, ४ माणगांव–निजामपूर, ५ लोणेरे–गोरेगांव, ६ महाड–नातें, ७ कांबळे–महाप्रळ, ८ हामड–विन्हेरें, ९ महाड–भोर, १० पोलादपूर–महाबळेश्वर हे रस्ते सुचविण्यांत काय अडचण झाली ?

ब विभागांत नवीन रस्ते म्हणून २५ सुचविण्यांत आले आहेत. त्याचा नीटसा बोध होत नाहीं. कारण त्यांतील कांहीं रस्ते अस्तित्वांत असून जिल्हा लोकलबोर्ड ते आपल्याकडून दुरुस्त ठेवण्याचा प्रयत्न करीत असते. एस. टी. मात्र आपल्या अजस्त्र बसेस त्यांच्यावर, वाटेल तेवढे प्रवासी घेऊन दामटवीत आहे व बहुतेक रस्ते इतिहासजमा करण्याचा प्रयत्न कसोशीनें पार पाडीत आहे त्याला आळा कोण घालणार ?

सुचविण्यांत आलेल्या मोठ्या पुलांचे यादींत, कांबळे–महाप्रळ रस्त्यावरील कोसवी नजीक पूल अत्यावश्यक असतां त्याला स्थान कां मिळूं नये तें समजत नाहीं !

बंदर सुधारण्याचे यादींत सावित्री खाडी अजिबात विसरलेली दिसते !! या खाडीला बाणकोट खाडी म्हणून ओळखतात. पूर्वी मुंबईहून सुटणारी व कोंकणांत प्रवाशांना घेऊन जाणारी प्रत्येक बोट बाणकोट बंदराला लागत असे सदर खाडीतील शेकडो लोक जे मुंबईत गिरण्यांमधून, घरकाम वगैरे निमित्तानें नोकरीवर असतात त्यांना सुखकर प्रवास घडत असे. बाणकोट बंदरांतून ह्या खाडीभागातील लाखो हपूस आंबा बोटीनें निर्गत होत असे. बाणकोट खाडीतील अनेक बंदरें गाळानें ओहरल्यामुळें व प्रत्यक्ष खाडीच्या मुखाशीं असलेल्या खाडीमध्यें गाळ सांचल्यानें सध्यां बाणकोट खाडी स्टीमरच्या प्रवासाला अयोग्य झाली असून आज त्या जागीं ४–५ मोटार लांचेस काम करीत आहेत. या

लांचेसवरही चढावयाचें व उतरावयाचें इतकें जिकीरीचें व त्रासदायक झालें आहे कीं, नको तो प्रवास, असें मनांत आल्याशिवाय रहात नाहीं.

आराखड्यांत सुचविलेल्या बंधाऱ्यांचे यादींत पनवेल, मुरुड, अलिबाग एवढ्याच तालुक्याचे गरजेकडे विकासमंडळाचे लक्ष गेलेलें दिसतें. याचा अर्थ एकतर जिल्ह्यांतील इतर भागात बंधाऱ्यांची जरूरी नाहीं अगर बंधाऱ्यांची समृद्धी तरी आहे !! बंधाऱ्यांचा विषय हा तज्ज्ञांचा असल्यानें आमची सूचना अशी कीं कुलाबा जिल्ह्याचे उत्तर व दक्षिण भागासाठीं दोन स्वतंत्र तज्ञ इंजिनिअर्स नेमून त्यांच्याकडून पूर्ण पहाणी करून घ्यावी व त्यांच्या सूचना विकासमंडळानें मंजुरीसाठीं मध्यवर्ती सरकाराकडे पाठवाव्या.

शहरांसाठीं नळाच्या पाण्याची सोय सुचवितांना १ अलिबाग, २ मुरुड ३ नागोठणे, ४ नांदगांव-मझगांव, यांची नोंद करण्यांत आली आहे. सध्यांच्या प्रांतिक सरकारचे या बाबतींतील धोरण स्पष्ट आहे. म्युनिसिपालिट्यांनीं पन्नास टक्के रक्कम तयार केल्यास सरकार पन्नास टक्के ग्रँट नियमाने देते. मग अलिबाग व मुरूड या दोन डी. एम. आक्टप्रमाणें चालणाऱ्या म्युनिसिपालीट्यांनीं वेळ कां गमवावा ? त्याचप्रमाणें ग्रामपंचायतींना सरकार खर्चाच्या ६० टक्के ग्रँट पाण्याच्या सोईसाठीं देते त्याचा फायदा नागोठणा व नांदगांव-मझगांव ग्रामपंचायतींनीं कां घेऊं नये ?

खारेपाट भागांतील पाण्याचा प्रश्न गेलीं अनेक वर्षें कुलाबा जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांचा चिंतेचा विषय आहे. आजवर निरनिराळे दृष्टीकोनांतून हा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न झाला नाहीं असें नाहीं. मात्र आजवर हा प्रश्न सोडविण्याचे मार्गांतील एक महत्वाचा भाग विचारपूर्वक टाळण्यांत आला व तो म्हणजे खारेपाट भागांतील जनतेला कोणत्याही प्रकारें ह्या प्रश्नाबाबत विश्वासांत घेण्यांत आलें नाहीं. तसेंच त्यांची या गोष्टींतील जबाबदारी स्पष्टपणे त्यांस समजावून दिली गेली नाहीं. जिल्ह्यांतील सर्व जनतेच्या व विशेषतः खारेपाट भागांतील शेतकऱ्यांचे दृष्टीनें हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. पक्षीय दृष्टी-

कोनांतून ह्या प्रश्नाकडे न पहातां अगर निवडणुकींतील मतदान पेटीवर लक्ष न ठेवतां जिल्ह्यांतील सर्व सार्वजनिक कार्यकर्त्यांनीं एकत्र येऊन सदर पाण्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

शेतीचें उत्पादन वाढविणेचे कल्पनेमध्यें ई–सदराखालीं खारजमिनीची सुधारणा व्हावी असें सुचविलें आहे. महाड तालुक्यांतील तेलगे खार गेलीं अनेक वर्षें फुटलीं असून शेकडों खंडी भाताचें नुकसान झालें त्याच्याकडे खारलँड बोर्डाचे लक्ष वेधावें. त्याचप्रमाणें गोरेगांव खाडींत अनेक खारी पडूं शकतील असें आम्हांस वाटतें. परंतु तो प्रश्न खार तज्ञांचा असल्यानें त्याकडेही आम्हीं खारलँड बोर्डाचें लक्ष वेधूं इच्छितों.

वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन हा या जिल्ह्याचा अत्यंत जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. कुलाबा जिल्ह्यांत १२५ ते १४० इंच पाऊस सरासरीनें पडतो. ह्या जिल्ह्यांत फारेस्ट रीसर्च डिपार्टमेंटकडून तपशीलवार पहाणी व्हावी व तज्ञांचे नेतृत्वाखालीं सरकारनें पूर्णपणें हा जंगलवाढीचा प्रश्न हाती घ्यावा. कुलाबा जिल्ह्याचे कांहीं भागांत रबरवृक्षांची शास्त्रोक्त लागवड होणे शक्य आहे. माझ्या मतानें कुलाबा जिल्ह्याचे दारिद्र्य नष्ट करावयाचे ह्या निश्चयानें हा प्रश्न हाताळल्यास जनतेचे दारिद्र्य तर दूर होईलच. पण प्रांतिक सरकारचे वार्षिक उत्पन्न लाखों रुपयांनीं वाढेल. तुलनाच करावयाची तर प्राथमिक शाळांच्या वरच्या वर्गांची फी वाढवण्याचें सरकारनें नुकतेंच जाहीर केलें आहे व सर्व मुंबई राज्यांतून या फीवाढीचें उत्पन्न २५ लाख येईल असें गृहीत धरण्यांत आलें आहे. कुलाबा जिल्ह्यांतील सरकारी व खाजगी मालकीचीं सर्व जंगलें फारेस्ट डिपार्टमेंटनें डेव्हलप करायची म्हटलें तर येत्या १० वर्षांत फक्त कुलाबा जिल्ह्यांतून जंगलचें उत्पन्न २५ लाखानीं निश्चित वाढेल! मात्र आज जो फॉरेस्ट खात्याच्या शिथिल कारभारामुळें जंगलसत्याग्रह चालू आहे त्याला पूर्ण आळा बसला पाहिजे.

लहान धरणांचे बाबतींत असें सुचवावेसें वाटतें कीं सहकारी खाते, पी डब्ल्यू. डी. खाते, लोकलबोर्ड आणि शेतकी खाते यांनीं एकत्र विचारानें हा प्रश्न हाताळावा रस्त्यांवरील लहान ओढ्यांवरून घालण्यांत आलेल्या मोऱ्यांना फळ्यांचीं दारे करून लहान लहान धरणे बनू शकतील व त्यांतील पाण्याचा उपयोग पावसाळानंतरच्या ५ महिन्यांसाठीं–नोव्हेंबर, डिसेंबर, जानेवारी, फेब्रुवारी, मार्च–करतां येईल. सदर ओढ्यांचे आसपास असलेल्या शेती अगर वरकस जमिनींत भाजीपाला काढतां येईल व या पांच महिन्यांत सदर हद्दींतील गुरांचे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सहज सुटूं शकेल. असा एक प्रयत्न कुलाबा जिल्हा लोकलबोर्डानें महाड तालुक्यांतील शिरगांव नाल्यावर गतसालीं केला असून हा प्रयत्न विकासमंडळानें नजरेखालीं घालावा अशी विनंती आहे.

कॉटेज हास्पिटलची योजना बऱ्याच वर्षांची आहे व या योजनेप्रमाणें पेण, कोलाड व महाड येथें काटेज हास्पिटल्स काढण्याचे निश्चितही झाले होते त्याचें काय झाले ? तरी त्या वेळच्या त्या स्कीम शोधून काढून त्यांची अमलबजावणी ताबडतोब व्हावी. महाड तालुक्यांत बिरवाडी येथें व खाडी भागांत कुंबळे अगर जुई येथें ग्रँट इन एड डिस्पेनसरीज काढाव्या. माणगांव तालुक्यांत निजामपूर व तळे येथें ग्रँट इन एड डिस्पेनसरीज काढण्याचा जरूर प्रयत्न करावा.

कुलाबा जिल्ह्यांत निर्माण होणारी वीज जिल्ह्याबाहेरील अगणित जनतेच्या जीवनांत प्रकाश पाडीत आहे ; पण कुलाबा जिल्ह्यांत मात्र आमावास्या!! ही परिस्थिती दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत निश्चितपणें दूर झालीच पाहिजे. भिरा पॉवरहाऊसमधून निर्माण होणाऱ्या विजेपैकीं कांहीं विजेसाठीं इंदापूर येथें सबस्टेशन बांधावयाचें व ह्या स्टेशनच्या ५० मैलांच्या त्रिज्येंत सर्वत्र वीज खेळवावयाची या कल्पनेच्या बैठकीवर टाटा कंपनीनें बऱ्याच दिवसांपूर्वी एका योजनेचा संपूर्ण आराखडा तयार केल्याचें स्मरते तो आराखडा जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांनीं मिळवून त्यांत जरुरीप्रमाणें सुधारणा करून सर्व जिल्ह्याची

विजेची गरज दूर करावी. टाटा कंपनीनें कुलाबा जिल्ह्यांत वीज उत्पादन केंद्रे निर्माण करतांना जिल्ह्यांत ज्या वेळीं शेतीच्या कामाला विजेचा उपयोग करण्याचा प्रश्न निर्माण होईल, तेव्हां ती नाममात्र मोबदला घेऊन देण्याचे त्या काळीं मान्य केलें होतें.

शिक्षणासंबंधीं विस्तृत चर्चा या ठिकाणी करणें जरी शक्य नाहीं, तरी त्या संबंधीं थोडक्यांत असें म्हणतां येईल, कीं रेवदंडा अगर मुरुडसारख्या ठिकाणीं नाविक शिक्षणाची सोय करणें शक्य आहे. कारण या भागाची भौगोलिक परिस्थिति नाविक शिक्षणाला योग्य अशीच असून शिवाय भंडारी कोळी व आग्री समाज या भागांतील रहिवाशी आहे. हे समाज वंशपरंपरा दर्यावर्दी समाज गणले जातात त्यांच्यातील हुशार सुदृढ, तरुण निवडून सरकारनें आपले खर्चानें त्यांना सुरवातीस तयार केलें म्हणजे त्या समाजांतील भावी तरुण पिढी या शिक्षणासाठीं अहमहमिकेनें पुढें येईल. आज आपल्या राष्ट्राचे आरमारी काफिल्याचे व व्यापारी काफिल्याचे सामर्थ्य अगदींच नाममात्र असून ते सर्वस्वी परकीय समाजाचे हातीं आहे. महाड येथें मिलीटरी स्कूल काढणें योग्य ठरेल. कारण महाड भागांतील शेतकऱ्यांची सैनिकी जीवनाची पहिल्यापासून परंपरा आहे. त्या परंपरेला नीट वळण लागून महाड–माणगांव भागांतील तरुणांचा देशरक्षणाच्या कामी उत्तम उपयोग करून घेणें देशहिताचें ठरेल. कोलाडसारख्या जिल्ह्याच्या मध्यवर्ती ठिकाणीं शेतकी शाळा काढणें उपयुक्त ठरेल. कोलाड येथें कुंडलिका नदीला टाटाचे टेलवाटर सुटत असल्यामुळें बारा महिने फार मोठ्या प्रमाणांत शेतीला पाणी मिळूं शकेल. यासाठीं कुलाबा जिल्ह्यांतील प्रोक्युअरमेंट मनी सुमारें रु. ७५००० जमला आहे त्याचा विनियोग जनतेचा पैसा म्हणून व्हावा व वरकड लागणारा पैसा सरकारनें खर्च करावा.

मध्यवर्ती सरकारनें नुकतेंच असें जाहिर केलें आहे कीं प्रत्येक जिल्ह्यांत कमींत कमीं एक पोलिटेक्निक हायस्कूल असावें, त्याप्रमाणें तसें शिक्षण केंद्र

काढण्याचा मध्यवर्ती सरकारचा निश्चय दिसतो. ह्या जिल्ह्यांत कोंकण एज्युकेशन सोसायटी १२-१३ माध्यमिक शिक्षणाची हायस्कूल्स चालविते. तिच्या साहाय्यानें असे पोलिटेक्निक हायस्कूल जिल्ह्यांत ज्या ठिकाणीं निघणे शक्य आहे अशा ठिकाणीं काढावे शिक्षणासंबंधीं यापेक्षां जास्त खुलासेदार विचार करणें जरूर आहे. तसा तो करतां यावा म्हणून कोंकण एज्युकेशन सोसायटीचे मदतीनें शक्य तर करावा अशी सूचना आहे.

दिवा-दासगाव रेल्वेचे पहाणीचें काम सध्यां चालू असून ते तडीस जाईल या दृष्टीनें विकासमंडळानें प्रयत्न करावा. दिवा-दासगांव रेल्वे योजना १९५६ ते ६१ ह्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करून घेण्याचा कुलाबा जिल्हा विकास मंडळानें प्रयत्न जरूर करावा.

मुंबई-गोवा रोड कांक्रीटचा करून घेण्याची कोशीस कुलाबा जिल्हा विकासमंडळानें केली पाहिजे. यासंबंधीं अशी बातमी समजते कीं गुदस्त सालीं या रस्त्याचा वडखळ नाक्यापासून पोलादपूर गांवापर्यंतचा भाग कांक्रीटचा करण्याची कॉंट्राक्टस देण्यांत आली व त्याप्रमाणें प्राथमिक कामांना सुरवातही झाली होती. पण अलिकडे काय घडलें कोणास ठाऊक ! कांक्रीटकरणाची कल्पना सोडून देण्यांत आली असून त्या दिशेनें यंत्रें फिरूं लागलीं आहेत ! हें खरें असल्यास जिल्ह्यांतील कार्यकर्त्यांनीं सरकारनें ह्या रस्त्याचे कांक्रीटी-करणाचा विचार सोडूं नये म्हणून खटपटीस लागलें पाहिजे. कुलाबा जिल्ह्यांत १२५ इंचापर्यंत पाऊस दरसाल पडतो चार साडेचार महिने सतत पडणाऱ्या पावसानें आसफाल्टिंग २-४ वर्षांपेक्षां जास्त टिकणार नाहीं व भिकार रस्त्यांची ह्या जिल्ह्याची पूर्वापार परंपरा जाणार नाहीं. आठवणीसाठीं व सर्वांना माहीत आहे म्हणून दोन रस्त्यांचा नामनिर्देश करतो. अलिबाग-रेवस रोड व पेण शहरांतील रस्ता हे दोनही रस्ते डांबरी केले गेले पण २-४ वर्षांत ते पूर्णपणें नामशेष झाले !!

कुलाबा जिल्हा विकासमंडळानें जनतेचें माहितीसाठीं तात्पुरता आराखडा प्रसिद्ध करून माझ्या सारख्या लोकांचे विचारांस चालना दिली, याबद्दल मी विकासमंडळाचा आभारी आहे. माझ्या कुलाब्या जिल्ह्यांतील सार्वजनिक कार्यांशीं गेलीं तीस वर्षे जो थोडाफार संबंध आला व जिल्ह्याचे अडीअडच-णीची मजला जी माहिती आहे तिचा उपयोग मी माझें सहकार्य या कामीं कोणालाही नम्रतापूर्वक देईन.

प्रसिद्ध झालेल्या आराखड्यांतील अनेक प्रश्नांवर मजला या ठिकाणी उहापोह करतां आलेला नाहीं, याची जाणीव आहे म्हणून आराखडा पक्का करण्यापूर्वी जिल्ह्यांत कोठेंही सर्व कार्यकर्त्यांनीं एकत्र जमावें अशी माझी इच्छा आहे. या दृष्टीनें श्री. रड्डी यांनीं प्रयत्न करावा अशी विनंती आहे.

नं. ८८२९

—*०★०*—

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम १०३०५ दि: २३-५-७४
क्रमांक २०३ नों: दि: ११-७-७४

ज्या पुस्तकांमधून व लेखांतून माहिती घेतलेली आहे अशा पुस्तकांची व लेखकांचीं नांवें:—

१ श्रीसमर्थचरित्र, न. र. फाटक.

२ कुलाबकर-आंग्रे सरखेल, आंग्रे घराण्याचा इतिहास, दामोदर गोपाळ ढबू

३ रायगड—प्रबोधनकार के. सी. ठाकरे.

४ In Wild Maratha Battle -Michael Macmillan.

५ कुलाबा भूवर्णन—स. य. पोतदार

६ Kolaba-District Census Handbook-Government of Bombay Publication.

७ सह्याद्रि—आ. स. जोगळेकर

८ श्रीसमर्थचरित्र प्रथमखंड—श्रीसमर्थावतार—शंकर श्रीकृष्ण देव.

९ हिंदुस्थानचा सोपपत्तिक इतिहास—रा. वि. ओतुरकर.

१० Bombay Gazetteer, Kolaba District (1887).

११ मराठी वाङ्मयाचा इतिहास तिसरा (रामदास) खंड—ल. रा. पांगारकर.

१२ महाडची शाळा शतसांवत्सरिक स्मारक ग्रंथ—शं. सी. जोशी.

१३ खांदेश्वर व विरूपाक्ष देवालयावरील लोकमान्यातले लेख ता. २८-२-५४ व ४-४-५४—प्रबोधनकार ठाकरे.

# CYCLING OR MOTORING

ALIBAG, situated as it is on the seacoast, is an excellent spot for picnics. 80 miles by road via Thana and Panvel, crossing the creek of Dharamtar by Ferry Boat, students and members of Social Clubs can take advantage to visit this place during week-ends or holidays for an outing along the coastal side of the BOMBAY HARBOUR. Those who cannot afford to do cycling or motoring, they can reach this place by the Ferry Service from the BHAUCHHA DHAKKA ( FERRY WHARF ), which takes about 2½ hours to reach Alibag and is the shortest, quickest and cheapest route. It costs approximately Rs. 4 by steamer-cum-motor for the return journey. There are many good places of sight-seeing in and around the ALIBAG Taluka. Besides, Alibag offers many opportunities in the field of sports, such, as Cricket, Hockey, Volley-Ball, Tennis and many other Indian Games as well. Further information in this connection can be obtained from the N K. M. W. S. STUDENTS' SOCIAL CIRCLE, Choksey Compound, Gilder Lane, Tardeo Bridge, Bombay 8.

Students, who are enthusiastic about cycling or motoring, can visit and arrange Holiday Camps at KANKESHWAR during vacations.

**P. S.**

## ANY SUNDAY OR HOLIDAY
## YOU CAN MAKE A PICNIC DAY

Issued by: N. K. M. Welfare Society, 20, Hamam Street,
Fort, BOMBAY I

लहानापासून थोरांपर्यंत सर्वांची आवडती

# ( टॉफीज - चाकोलेटस् - स्वीटस् )

गेली सतत पंधरा वर्षे या कंपनीच्या मालाची ख्याती उत्तम माल व उत्तम पॅकींग म्हणून प्रसिद्ध आहे. या कंपनीचा माल हिंदुस्थानांत प्रत्येक शहरांत व खेड्यांत विकला जातो.

## — कंपनी बनवीत असलेल्या वस्तू —

फॅन्सी आर्टिकल्स

१] पर्शियन डिलाईट
२] गोल्डन टॉफी
३] वेस्ट एन्ड टॉफी
४] जुजब्स्
५] क्रीम चाकोलेट
६] स्विट फिगज्
७] आठवलेज कॅन्डी
८] वे टु बेबी फूड
९] मार्श मेलो
१०] ॲसॉर्टेड स्वीटस् टिन्स
११] ॲसॉर्टेड स्वीटस् बॅगज
१२] जॉलीबॉय स्वीट सिगारेटस्

# आठवले प्रॉडक्टस् लिमिटेड,

आठवले टॉफी हाऊस,

गिरगांव मुंबई नं. ४.

# राज फोटो सर्व्हिस

शंकर शेट ब्लॉक, ताडदेव रोड,
नाना चौक, मुंबई नं ७.

**फोटो फीलमस, कॅमेरे व फोटोग्राफीस लागणारे सर्व सामान आमचेकडे मिळेल.**

फोटो प्रिंटींग, डेव्हलपींग व एन्लार्जींग काम केले जाईल.

इन्डोअर व आउट डोअर फोटोग्राफी आणि स्डुडीयो काम आमचे कडे देऊन उत्तम कामाची खात्री करा.

# नानावटी ऑप्टीकल कंपनी

२२०, A रिवार्ड, ताडदेव रोड, मुंबई नं. ७

—:◇:—

**मोफत डोळे तपासुन घ्या व आपल्याला लागणारे सुबक व टिकावू चष्में स्वस्त दरानें आमचेकडे मिळतील.**

तसेंच गॉगल्स व फ्रेम्स मिळतील.

बाहेरगांवच्या व्यापाऱ्यांना माल पुरविला जाईल.

**घाऊक आणि किरकोळ चष्म्यांचें व्यापारी.**






स्त्रियांचे जीवन-विकासांत 'सांडू' ब्रदर्सची औषधें फार सहाय्यभूत होतात,

लहान मुलांसाठीं 'सांडू' कुमारी आसव व 'सांडू' अरविंदासव; वक्तशीर पाळी येणें व रजोदर्शन होणेंसाठीं 'सांडू' आर्तवशुद्धीकाढा द्यावा.

गर्भाशयाचे अशक्तपणामुळेंच स्त्रियांची रोगपरंपरा सुरू होत असलेनें वयांत येतांच 'सांडू' दशमूलारिष्ट घेणें फायद्याचें ठरतें.

दिवस राहिल्यानेतर गर्भ व गर्भवतीच्या पोषणासाठी 'सांडू' प्रेगयुटेरो (गर्भिणी गर्भरक्षक) हें अनुभवसिद्ध औषध आहे; बाळंतपणीं पहिले १० दिवसांत 'सांडू' बाळंतकाढा नं १ व १० दिवसा नंतर ३ महिने होईपावेतों 'सांडू' बाळंतकाढा नं २ व तान्ह्या बाळास 'सांडू' बाळकडू देणें फायदेशीर ठरतें.

घरोघर 'सांडू' ब्रदर्सची औषधें वापरलीं जातात.

विशेष माहितीसाठीं पत्रव्यवहार करावा.

# द. कृ. सांडू ब्रदर्स (चेंबूर) लि.

चेंबूर फोन-८७३१३ (ब्राम्ही तेलाचे आद्य कारखानदार) मुंबई फोन - ३४२३४

NIHAD Studio

# श्री विष्णु हिंदु बेकरी

ताडदेव रोड, मुंबई नं. ७

**आमचे कडे दररोज ताजे पाव व**

**★ टोस्ट, बिस्किटे तयार मिळतील. ★**

तसेंच ब्रिटानिया, शांग्रिला व पार्ले कंपनीचा माल
पेपरमींट व बिस्कीटे—आम्ही विकतो.

पिकनीक पार्टींना लागणारा माल पुरविला जाईल.

● एकवेळ आमच्या दुकानांस भेट देऊन खात्री करा. ●

**गिऱ्हाईकांचें समाधान हेंच आमचे ध्येय**

**REMEMBER!**
RADIO SALES SERVICE
&
LOUD-SPEAKERS ON HIRE
GUARANTEED REPAIRS
CARRIED OUT BY
EFFICIENT HANDS
*Enquire Before You*
*Acquire At:*

**Holywood**
**Radio Corpn.**

SOCIAL
**WATCH COMPANY**
*Dealers & Repairers.*
Of all kinds of
Watches,
Automobile Watches,
Clocks, Electric Clocks
&
Timepieces,
Etc. Etc.

181D, Lamington Cross Road,
Opp. Railway Parcel Office, Grant Road,
BOMBAY 7.

# Bombay Steam Navigation Co. (1953) Ltd.

**Bombay-Rewas-Dharamtar Service.**

**Daily throughout the year.**

| | |
|---|---|
| BOMBAY/URAN/ELEPHANTA/ NAHAVA ... ... ... | — *Daily Service.* |
| BOMBAY/DABHOL ... ... | — *Daily Service.* |
| BOMBAY/VENGURLA ... | — *Daily Service.* |
| BOMBAY/PURNAGAD ... | — *Thrice a week on Sun. Wed. & Fri.* |

For Rates and other particulars apply;

**100, FRERE ROAD, BOMBAY 9.**

**Tele. No. 25061.**




M. BEST
COTTON ROPE
MFG., CO.

*Prop:*

## M. J. Thanawala & Co.

**47-49, Forbes Street,**
**Fort, Bombay,**

*Manufacturers of:-*

*COTTON DRIVING ROPES *COTTON BANDAGES.

*SPINDLE TAPES.

*JACQUARD LACING CARD.

**Kynnersley Roadside Industries Centre.**

# ( लहान मोठे कारखानदारांचें उद्यान केंद्र )

वरील केंद्रांत खालील नमूद केलेला माल तयार होतो व ऑर्डर्सप्रमाणें बनवून देतों:—

या मालाच्या विक्रीसाठीं प्रमुख गांवीं एजंटस व स्टॉकिस्ट नेमणें आहेत.

**माल बनविणार—**

१ लोखंडी कॉटस, खुर्च्या, पाळणें व इतर ऑफिस व हॉस्पिटलला लागणारें लोखंडी फर्निचर सामान.

२ रबरी चाकाच्या हातगाड्या, दुचाकी व चार चाकी रेल्वे प्लॅटफॉर्म गाड्या. मोठ्या अथवा छोठ्या कारखानदार व व्यापारवर्गास अत्यंत उपयुक्त व स्वस्त मालाच्या वाहतुकीकरितां हातगाड्या डनलॉप सॉलीड टायर्स व रबर गुड्स्.

३ आग व आगीपासून बचाव करण्याची उपयुक्त साधनें बनविणारे कारखानदार, म्युनिसिपालिटी, लोकल बोर्ड व सरकारी खात्यांत लागणारे फायर ट्रेलर, फायर एंजिन व इतर सामान पुरवठा करणार.

४ जुवेलरी बॉक्सेस, स्प्रे पंप्स्, इत्यादि.

५ बंगले व ड्रॉईंग हॉल डेकोरेशन सामानाचें काम.

६ रंगीत मेटल प्रिंटिंग, लेबल्स.

७ ऑटो रीपेरस व स्पेर पार्टस.

८ इलेक्ट्रीकल व रेडिओ स्पेअर पार्टस, बेकलाईट सामान.

९ साडी क्लॉथ प्रिंटिंग व रंगारी काम ( सील्क व सुती कपडे ).

१० सुतार, लोहार व वेल्डिंग काम.

**आपल्याला लागणारें वरील सामान आमचेकडे खरेदी करा व लहान कारखानदारांस व स्वदेशी उद्योगधंद्यांस उत्तेजन द्या.**

आपला पत्रव्यवहार व ऑर्डर्स खालील पत्त्यावर पाठवा:—

## किसोर सेल्स डेपो,

चोकसी कंपाउंड :— गिल्डर लेन, ताडदेव ब्रीज, मुंबई नं. ८.

# बँगलोर व म्हैसूर प्रदर्शनांत सुवर्णपदक पटकावलेला

# कर्णिक इन्डोबाम

डोके दुःखी, पाठ दुःखी, संधीवात, सूज, लचक, शिरा आंखडणें, स्नायूंच्या वेदना, छातींतील थंडी, विंचू दंश विषारी माशा चावणे इत्यादी वेदनांवर खास गुणकारी.

**मोफत :—** इन्डोबामच्या गुणाची खात्री करून घेण्याकरिता सॅम्पलसाठीं ' जवळच्या दुकानदारकडे मागणी करा व तेथें न मिळाल्यास खालील पत्त्यावर पत्र पाठवा.

---

# कर्णिक एग्यु मिक्श्चर

मलेरीया, थंडीताप, इन्फ्ल्युएन्झा इत्यादी तापासाठीं खास मुल्यवान औषधें वापरून तयार केलेले ५४ वर्षांचे जुने औषध.

## कर्णिक ब्रदर्स, मुंबई ४.

मुंबईतील कोणत्याही हॉलमध्यें लागतील असे

आकर्षक व अद्यावत पद्धतीचे

# "नाटकाचे पडदे"

बनविणार व भाड्याने देणार

## पेंटर्स एम्. बी. कोटकर ब्रदर्स.

( प्रो. :— वसंतराव डी. म्हात्रे. )

कमर्शियल साईन बोर्ड पेंटर्स,

३७३, ठाकुरद्वार, मुंबई नं. २



इंजिनिअरींग टुल्स, हार्डवेर आणि

मिलस्टोर्स सामानासाठी

## अनिल बेरींग स्टोर्स

खालील पत्त्यावर लिहा अगर भेटा :

१६३, नागदेवी क्रॉसलेन, मुंबई ३

— स्टॉकिस्ट —


बॉल आणि रोलर बेरींग्स

प्रत्येक साईजचे बॉल रोलर आणि थरस्ट बेरींग, बॉल बेरींग स्पेर आणि कंप्लीट, प्लम्बर ब्लॉक ( SKF Hoffman FAG ) वगैरे इतर माल स्वस्त भावाने मिळेल.

Telegram CHEAPSTORE.

Stusa

Kirloskar
Diesel Pump Set



Solves
IRRIGATION
PROBLEMS

Also Agri. Implements,
Sugarcane Crushers, Groundnut Decorticators,
Diesel and Electric Pumping Sets.

AUTHORISED DISTRIBUTORS FOR
BOMBAY, SURAT, THANA & COLABA DISTRICTS
W. R. TAL[illegible]LKER BROS. LTD.
LENTIN CHAMB[illegible] [illegible]AL STREET BOMBAY 1

६० वर्षांपेक्षां जास्त जनतेची सेवा करीत
असलेले मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

# सरदारगृह


● प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरुम व बालकनी ●

**लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजन पार्टीची**

**कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था**

—:० सभा सम्मेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय ०:—

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.



—: दिवाळी निमित्त भेट :—

# —: लो वा को :—

८$\frac{3}{4}$ ऑल स्टील, ऑल प्रुफ,
१७ जुवेल सेंटर सेकंद रेडियम
फॅन्सी डायल रु. १५०

गॅरंटी एक वर्ष

सर्व तऱ्हेची घड्याळें मिळतात.

## लोकमान्य वॉच कंपनी

२६ सी, गनबाऊ स्ट्रीट, फोर्ट, मुंबई

# "स्वदेशी ट्रंक फॅक्टरी अँड शॉप्स्"

**[ मालकः- इंदुलकर ]**

आमच्या कारखान्यांत बनविलेल्या स्टील ट्रंक्स "हिंदुस्तान व मद्रास केबिन्स ( रजिष्टर्ड ) कॉटस्, पाळणे, स्टँडस् वगैरे मजबूत व टिकाऊ माल त्याचप्रमाणें होल्डऑल्स, लेदर सुटकेसीस व खास दिवाळीसाठीं "**फटाके** आणि **दारूसामान**" खरेदण्यासाठीं आमच्या दुकानांस अवश्य भेट द्या.


**"सरकारी तबेला"** गिरगांव, मुंबई ४ **व** **"विजय नगर"** दादर, मुंबई २८

# 'निर्दोष दृष्टि'

"केवळ स्वस्त मिळतो अशी जाहिरात वाचून स्वस्तांत खरेदी करण्यासारखी चष्मा ही वस्तु नव्हे. चष्म्याच्या लेन्सीसची खरी योग्यता तो चष्मा बनविणाऱ्या कारागिराचें तत्संबंधीचें ज्ञान, अनुभव व प्रामाणिकपणा यावर अवलंबून असते. चष्म्यानें दिव्य दृष्टि मिळते पण केव्हां ? जर तो चष्मा डोळ्यांना लागणाऱ्या नंबरचा असेल तरच ! सर्व प्रकारच्या आधुनिक पद्धतीचे चष्मे खात्रीपूर्वक आम्ही बनवून देऊं. १२ वर्षांचा अनुभव असलेले.

## शेंडे आणि कंपनी, चष्म्यांचें व्यापारी.

बोरभाट लेन, गिरगांव मुंबई नं. ४



कुलाब्यांत गायगड ★ मुंबईंत इस्टर्न

# इस्टर्न लेदर वर्क्स

प्रो ... , मुंबई ४.

टेलिफोन:- ७ ... ऑफिस ] ७११२३ घरी

REFBK-0008821

तुमच्या कोणत्याही प्रिंटिंगच्या कामासाठीं

अवश्य भेट द्या

# मुरली प्रिंटिंग प्रेस

रानडे रोड, दादर, मुंबई नं. २८.

इंग्लिश, मराठी, हिंदी आणि गुजराथी काम केले जाईल.